# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १८/०४/२००६

आज दि. १८/०४/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची खास महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०४/०४/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २५) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २६) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २७) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २८) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २९) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३०) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३४) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३५) | श्री. म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| ३६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३७) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३८) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३९) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४१) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४२) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४४) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४५) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४६) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४७) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५१) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५२) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५५) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५६) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५७) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६२) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६४) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६८) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६९) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७०) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७१) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७२) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ६) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| ३) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार. १८ एप्रिल, २००६ ची मा. महासभा. महानगर पालिकेच्या सभागृहात सभेसाठी उपस्थित असलेले या शहराचे उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब, आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, स्थायी समितीचे सभापती तुळशीदास म्हात्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती, सभागृहात उपस्थित असलेले सभागृह नेते हॅरल बोर्जिस साहेब, तसेच, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व गटनेते, विशेष समित्यांचे सभापती, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, महानगरपलिकेचे सचिव, सन्मा. उपायुक्त व खात्याचे अधिकारी सर्व वृत्तपत्राचे प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीत उपस्थित असलेले नागरिक बंधु आणि भगिनिंनो गेल्याच मा. महासभेत राष्ट्रकुल स्पर्धेत वेट लिफ्टींग खेळात कु. सिम्पल कौर भुमरा हिने रौप्य पदक मिळवले म्हणून आपण तिचा ह्या सभागृहात सत्कार केला. जसे समुद्रामध्ये अनेक मोती असतात. परंतु, एकाच वेळी सर्व सापडत नसतात. तसेच, आपल्या माहितीपासून वंचित असा एक मोती गिता नगर, भाईंदर (पश्चिम) येथे सापडला. जानेवारी २००६ मध्ये रौप्य पदक मिळवून दिले असे श्री. मिल्टन डिसोझा ह्यांनी देखील भारतासाठी वर्ल्ड एशियन ओपन किंग बॉक्सींग स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळवून मिरा भाईंदर महानगरपालिकेची शान वाढवलेली आहे. तसेच, त्यांचे मी व आपले सर्व मिरा भाईंदर शहरवासियांच्या वतीने अभिनंदन करू या श्री. मिल्टन डिसोझा ह्यांचा सत्कार देखील आपण ह्या महासभेत करीत आहोत. त्यांनादेखील आर्थिक मदत देउ. जेणेकरून ते जास्त् मेहनत परिश्रम घेउन इर्ष्येने, स्फुर्तीने ऑलेम्पिक खेळात भारताला सुवर्ण पदक मिळवून देतील यात शंकाच नाही व पुन्हा आपणांस या होतकरु खेळाडूंचा सत्कार करण्यास आवडेल. या खेळाडूंकडून प्रमाणाने अनेकांनी स्फुर्ती घेउन अनेक उदयमुख खेळाडू या मिरा भाईंदर शहरात निर्माण व्हावे हिच सदिच्छा. नुकत्याच पार पाडलेल्या इस्टर सणाच्या सर्व खिस्ती बांधवांना हार्दिक शुभेच्छा. आजच्या मा. महासभेत महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकीकरण शिक्षण शहरातील व्यवसायिक नागरिक या सारखे जिव्हाळ्याचे असलेले जकात प्रारूप नियमांना मंजुरी देणे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची पुर्तता करणे इत्यादी महत्वाचे विषय हे आजच्या विषयपटलावर आणलेले आहे. आपण सर्वांनी एकत्र येउन खेळीमेळीच्या वातावरणात या विषयावर चर्चा करून निर्णय घेउ या. आजच्या महासभेला सुरूवात करण्यापुर्वी सर्व सन्मा. सदस्यांकडून सहकार्यांची अपेक्षा करते. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम, यांनी घोषित केल्याप्रमाणे प्रथम सभेच्या सुरूवातीच्या अगोदर श्री. मिल्टन डिसोझा ह्यांचा सत्कार करण्यासाठी मी मा. महापौरांना विनंती करतो. बॉक्सींगमये दुसऱ्या क्रमांकावर आहेत व आता त्यांना ऑस्ट्रेलियामध्ये पुढील स्पर्धेसाठी जायचे आहे व हे गिता नगरमध्ये राहत आहेत.

(मा. महापौर मॅडम ह्यांनी श्री. मिल्टन डिसोझा ह्यांना पुष्पगुच्छ देउन त्यांचे स्वागत केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहाच्या पुढील कामकाजाला सुरूवात करण्या अगोदर आज या सभागृहामध्ये आपल्या मिरा भाईंदर परिसरातील राहणारा एक युवक श्री. मिल्टन डिसोझा ह्यांने जानेवारी, २००६ च्या स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळवल्याबद्द आपण त्याला मानसन्मानाने शुभेच्छा दिलेल्या आहेत. मा. महापौर मॅडम सभागृहाच्यावतीने आपणांस मी विनंती करतो की, जुन, २००६ मध्ये जागतिक स्पर्धेसाठी हा युवक आपल्या पुर्ण भारत देशाच्यातीने प्रतिनिधित्व करत आहे. त्याने आपल्याकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे. या स्पर्धेसाठी भाग घेण्यासाठी जवळ जवळ १ लक्ष रूपयाची त्याला आवश्यकता आहे. तरी सभागृहाच्यावतीने मी आपणांस विनंती करतो की, आपल्या महापालिकेच्या वतीने आपल्या महापौर निधिचा या अंदाजपत्रकामध्ये जो निधी स्थापन केलेला आहे. सभागृहाच्या वतीने आपणांस विनंती आहे की, आपण जास्तीत जास्त रक्कम या युवकाला आपल्या मिरा भाईंदर महापालिकेच्यावतीने द्यावी जेणेकरून या आर्थिक स्वरूपाच्या मदतीचा लाभ घेउन हा युवक येणाऱ्या जुन २००६ च्या जागतिक स्पर्धेमध्ये व्यवस्थितरित्या भाग घेउ शकेल आणि सभागृहाच्या वतीने मी या युवकाला हार्दिक धन्यवाद देतो आणि शुभेच्छा देतो की, येणाऱ्या २००६ च्या जागतिक स्पर्धेमध्ये हा युवक भारतासाठी नक्कीच सुवर्णपदक जिंकुन येईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपल्याकडुन ह्या युवकाला आर्थिक मदतीसाठी पुढील आदेश व्हावेत अशी मी आपल्या सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, सभागृह नेते हॅरलजी बोर्जीस ह्यांनी ज्या पद्धतीने महापौर निधितून मदत निधी द्यायच्या संदर्भात भाष्य केलेले आहे. निश्चितच मिरा भाईंदर शहराच्या दृष्टीने एक भुषावह अशी गोष्ट आहे. ह्या बाबतीत कोणाचाही विरोध नसणार आहे. अशा पद्धतीने मिरा भाईंदर शहरामध्ये काही खेळाडू जे असतील त्यांना सुद्धा अशा पद्धतीने प्रोत्साहीत करून मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नाव अच्युतम रहावे व चांगल्या पद्धतीने मिरा भाईंदरने प्रोत्साहन द्यावे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने अशा खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे. अशी मी मा. महापौरांकडे विनंती करतो आणि महापौर निधीमध्ये जी तरतुद आहे

त्या तरतुदीच्या अनुषंगाने मा. महापौरांनी जास्तीत जास्त भरघोस मदत आपण त्यांना करावी अशी मी विनंती करतो व त्यांना या पुढील त्यांच्या यशाच्या वाटचालीस मी सर्व मिरा भाईंदरच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

(नगरसचिव ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, सभेचे कामकाज सुरू व्हायच्या अगोदर या सभागृहातील म्हणजे मिरा भाईंदर मध्ये काही हालचाली झाल्या. डेव्हलपमेंन्ट झाल्या. पक्षनिहाय संख्या किती आणि त्यांची बसण्याची आसन व्यवस्था कशी? ह्याच्यावर आपण निवेदन करावे अशी आपणांस विनंती करतो. पक्षनिहाय संख्या किती आहे?

**मा. महापौर :-**

मागील सभेमध्ये वेट लिफ्टींग खेळामध्ये कु. सिम्पल कौर भुमरा ह्यांना रौप्य पदक मिळाले होते. आपण त्यांना सन्मान दिलेला होता व महापौर निधीतून काही अर्थिक मदत ही केली होती. त्याचप्रमाणे आजच्या सभेत श्री. मिल्टन डिसोझा हा आपला मिरा भाईंदरमधला खेळाडू भारतासाठी वर्ल्ड एशियन किंग बॉक्सींग स्पर्धेत पुढील स्पर्धेसाठी प्रवेश करित आहे. या दोघांनाही आर्थिक मदत महापौर निधीतून मदत होण्यासाठी थोडासा हातभार म्हणून निधीतील मदत म्हणून आम्ही त्यांना जाहिर करत आहोत. गेल्यावेळेस कु. सिम्पल कौर ह्यांना २५००० रूपये डिक्लर केले होते. परंतु, त्या दोघांनाही समान न्याय मिळण्यासाठी महापौर निधीतून कु. सिम्पल कौर तसेच, श्री. मिल्टन डिसोझा ह्यांना प्रत्येकी पन्नास हजार रूपये आर्थिक मदत म्हणून घोषित करत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाच्यावतीने सर्व प्रथम आपणाला धन्यवाद देतो आणि आपल्याला विनंती करतो की, प्रशासनाच्या वतीने सदर खेळाडूला कारण अवधी फार कमी आहे. आता एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात आहोत आणि जूनच्या पहिल्या आठवड्यामध्ये स्पर्धा आहे. या खेळाडूला ही रक्कम अगदी वेळेवर कशी मिळवता येईल ह्याच्यासाठी आपल्याला प्रशासनाच्यावतीने आपण त्या विषयी विशेष दक्षता घ्या अशी विनंती करतो.

**मा. महापौर :-**

सचिव सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**रोहीदास पाटील :-**

मी विनंती केलेली आहे की, पक्षनिहाय संख्या आणि त्यांची बसण्याची व्यवस्था ह्याच्यावर निवेदन करावे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेबांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण सभेचे कामकाज सुरू करा. हा प्रश्न अनेकवेळा आलेला आहे. आपण ह्या प्रश्नावर नंतर निवेदन देउ शकता. सभेचे कामकाज सुरू करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**रोहीदास पाटील :-**

मी मोहन पाटील ह्यांना विनंती केलीच नाही. मा. महापौरांना विनंती केलेली आहे आणि हे प्रश्न अनेकवेळा आलेले नाही. ही पहिलीच सभा आहे. पहिल्यांदाच असा प्रश्न आलेला आहे आणि याचे सोपे उत्तर आहे ते तुम्ही द्यायचे आहे

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील ह्यांनी विचारलेला प्रश्न सत्ताधारी पक्ष उजव्या बाजुला तसेच, पक्षाच्यामध्ये समाविष्ट झालेले काही सदस्य ह्यांची संख्या जोपर्यंत आपल्या पुढे येत नाही, लेखी पत्रानुसार. तोपर्यंत आम्हाला काही खुलासा करता येत नाही. लेखी पत्रव्यवहार आपण करावा त्यानंतर आपल्याला ह्याचा खुलासा केला जाईल. सचिवजी पुढील विषयाला सुरूवात करा.

**रोहीदास पाटील :-**

आम्ही लेखी पत्रव्यवहार करायचा?

**ग्रिटा फॅरो :-**

आपण विचारले तर आपणच खुलासा करा.

**नगरसचिव :-**

११.५० मिनिटे झालेली आहेत. पहिला प्रश्न ४४ क्रमांकाचा श्रीम. शुभांगी सिताराम नाईक ह्यांच्या प्रश्नाला सुरूवात होते.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, हे जे मला आता उत्तर दिलेले आहे. ते कधीचे आहे? आताचे आहे की त्यापुर्वीचे आहे? हे उत्तर जे दिलेले आहे ते कधीचे आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. महापौर महोदया आणि सन्मा. सर्व सदस्य सध्या जे उत्तर दिलेले आहे ते आताचे प्रेझेट उत्तर आहे.

**शुभांगी नाईक :-**

आपण जो टॅक्स लावला तो किती सालापासून सर्व्हे केलेला होता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टॅक्सचा सर्व्हे मध्यंतरी २००२ ला झाला होता.

**शुभांगी नाईक :-**

नविन इमारतीला टॅक्स कधी लावला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जसजसे रहिवाशीसाठी वापरतात तसे आपण टॅक्सेशन करतो.

**शुभांगी नाईक :-**

ज्या इमारती अनधिकृत आहेत त्या इमारतींना आपण टॅक्स लावला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टॅक्स लावला आहे.

**शुभांगी नाईक :-**

तसा त्या ठिकाणी शिक्कामोर्तब केला का? अनधिकृत आहे, असा शिक्कामोर्तब त्या इमारतीवर लावला आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होय. ॲसेसमेन्ट करतो त्या ॲसेसमेन्टला शिक्का मारला जातो.

**शुभांगी नाईक :-**

ठिक आहे. असे आपल्याकडे किती इमारती आहेत? अनधिकृत बिल्डींगला आपण टॅक्स लावले आहे अशा किती इमारती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्या प्रभाग समितीबाबत सांगतो.

**शुभांगी नाईक :-**

मी प्रभाग क्र. २५ चे विचारलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

प्रभाग क्र. २५ च्या संदर्भात सांगतोय. प्रभाग क्र. २५ मध्ये जुन्या व नविन मिळून एकूण ३४७ इमारती आहेत.

**शुभांगी नाईक :-**

अनधिकृत इमारती किती आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अधिकृत आणि अनधिकृतचा येथे प्रश्न नाही.

**शुभांगी नाईक :-**

असे कसे धरायचे नाही म्हणता. अनधिकृत आहे ते अनधिकृत आहेच ना. आपण असे कसे म्हणता. मग तुम्ही त्या इमारतींना टॅक्स कसा लावला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याला टॅक्स लावता येतो.

**शुभांगी नाईक :-**

ज्यावेळी आपण टॅक्स लावतो त्यावेळी आपल्याकडे कोणते पुरावे आहेत. इमारतीला टॅक्स लावताना कोणते पुरावे घेतले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पुरावा म्हणजे आम्ही प्रत्यक्ष त्या साईटवर जातो आणि किती बांधकाम आहे व त्या एरियाप्रमाणे आम्ही त्याप्रमाणे टॅक्सेस लावतो.

**शुभांगी नाईक :-**

आपण त्यांना ओ.सी. देतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ओ.सी. चा आणि टॅक्स संदर्भाचा विषय येत नाही. फक्त टॅक्स संदर्भाचा हा विषय आहे.

**शुभांगी नाईक :-**

टॅक्स लावताना नगररचना विभागाकडे तुम्ही कळवता का? त्यांचा रिमार्क घेता का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टॅक्स लावण्याच्या बाबतीत, त्यांच्या रिमार्कचा काही संबंध नाही.

**शुभांगी नाईक :-**

असे कसे संबंध नाही म्हणता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टॅक्सेशन आणि नगररचना, अनधिकृत बांधकामचा ह्याच्याशी काही संबंध नाही.

**शुभांगी नाईक :-**

संबंध नाही. असे कसे तुम्ही म्हणता.

**रतन पाटील :-**

साहेब, संबंध कसला नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टॅक्सेशन लावण्यापुरताच ठेवलेला आहे.

**रतन पाटील :-**

संबंध नाही हे तुम्ही कसे दर्शविता ते सांगा ना. जर महापालिका टॅक्स लावताना जर असेसमेन्टकरिता आपण नळाचे कनेक्शन पास करताना आपण नगररचनेला फाईल पाठवता आणि टॅक्स लावताना नगररचनेमध्ये फाईल जायला नको का? त्याचे रिमार्क नको का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याच्यावर आम्ही शिक्का मारला. अनधिकृत बांधकामाला बाधा न येता टॅक्सेशन करतो असे आपण आम्ही.......

**रतन पाटील :-**

आपण ती फाईल पाठवता की, नाही एवढेच विचारले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

पाठवत नाही.

**रतन पाटील :-**

पाठवायला नको का? मग तुम्हाला कसे माहिती होईल की, अनधिकृत बिल्डींग आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही प्रत्यक्ष जाउन सर्व्हे करतो. इंजिनिअर पाठवतोय.

**रतन पाटील :-**

तुमचे डिपार्टमेंटच ते नाही. तुम्ही सर्व्हे कसे करणार ते आम्हाला सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आमच्याकडे सर्व्हेअर आहे. इंजिनिअर आहे. ते जागेवर जाउन.....

**रतन पाटील :-**

आपले डिपार्टमेंट हे टॅक्सचे आहे. तुमचे इंजिनिअरचे डिपार्टमेंट नाही. मग तुम्हाला ही अनधिकृत बिल्डींग आहे हे कसे समजते? तुम्ही ज्यावेळी ही फाईल नगररचनेला दिली नाही. ही जेव्हा फाईल नगररचनेला पाठवत असाल तर....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

संबंधित इमारतीच्या बाबतीत आम्ही डॉक्युमेंट मागवतो. त्यावेळेस कळवतो.

**रतन पाटील :-**

कुठली डॉक्युमेंटस दिली जातात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

विकासधारक जो बिल्डर आहे.....

**रतन पाटील :-**

ओ.सी. दिली जाते का? आपण ओ.सी. मागतो ते कशासाठी मागतो.

**शुभांगी नाईक :-**

ओ.सी. नसेल तर आपण कनेक्शन देत नाही आणि काही ठीकाणी ज्या आरक्षणाच्या जागा आहेत. ज्या ठिकाणी आरक्षित जागा आहेत त्याठिकाणी इंडस्ट्रीयल उभ्या केलेल्या आहेत. इमारती उभ्या केलेल्या आहेत त्यांना आपण टॅक्स लावला का? आरक्षण जागेमध्ये तुम्हाला त्याचा सर्व्हे क्रमांक माहिती असेल, किती आणि काय आहे. ते मला सांगायची गरज नाही. ते आपण बघा. त्यांना तुम्ही पाणी कसे दिले? कोणाच्या आधारावर दिले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा प्रश्न फक्त कर आकारणी संदर्भातला आहे. बाकीचे प्रश्न ह्या विभागाशी संबंधित नाही.

**रतन पाटील :-**

कर आकारणी व्हायला पाहिजे या मताशी आम्ही शंभर टक्के कर आकारणी झाली पाहिजे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. पण कर आकारणी करताना जे काही दाखले अन्य विभागातून

लावले जातात ते लावले जात नाही आणि तुम्ही म्हणता अनधिकृत बिल्डींग तुम्हाला माहित नसणार आहे. कारण की, प्रत्येक येणारा तो बिल्डर्स आपल्याकडे व्यवसायाकरिता येत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्मा. सदस्या शुभांगी नाईक ह्यांचा प्रश्न आहे की सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांचा आहे.

**शुभांगी नाईक :-**

आमचे गटनेते आहेत त्यांना मी परमिशन दिलेली आहे. तुम्ही बोलायची गरज नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मी तुमच्या बोलण्याला बाधा आणत नाही.

**शुभांगी नाईक :-**

सभागृहनेते तुम्हाला बोलायला आम्ही अधिकार दिलेला नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

तुम्ही बोलावे अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभा नियम जसा आम्हाला लागू आहे तसा तुम्हालाही लागू आहे. आपण खाली बसा.

**शुभांगी नाईक :-**

माझा प्रश्न शुभांगी नाईक ह्यांचा आहे. शुभांगी नाईकच्या वतीने गटनेते सुद्धा बोलतील. त्यांना अधिकार आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या चांगल्या प्रकारे वक्तव्य करत आहे. त्यांना त्या प्रश्नावर बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

नियमाचे पालन पहिले तुम्ही लोक करा.

**शुभांगी नाईक :-**

आम्हालाही समजु दे ना. काही गोष्टी आम्हाला समजत नाही. तर आमचे गटनेते बोलतील.

**हॅरल बोर्जीस :-**

तुम्ही बोला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक ह्या चांगल्याप्रकारे प्रश्न विचारत आहेत.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आम्हालाही माहिती आहे ते माझ्यावतीने बोलतील.

**मा. महापौर :-**

त्यांचा प्रश्न त्यांना विचारू द्या. पुढील प्रश्न तुमचाच आहे. आपण बसून घ्या.

**शुभांगी नाईक :-**

माझ्या वतीने गटनेते सुद्धा बोलतील.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे नियम हे सगळ्यांना लागू करा तुम्ही कशाला मधे उठून उठून बोलता.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक बोलतात की, त्यांच्यावतीने गटनेता बोलणार आणि ते बोलतात की, सभागृह नेतेला अधिकार दिलेला नाही. ॲक्च्युअली सभागृह नेत्याचे मिनिंग त्यांना माहित नाही. सभागृह नेतेला कोणाला विचारायची गरज नाही. ते आमचे नेते आहेत, सभागृहाचे. तर त्यांना स्वतःला हाऊसने मिळून त्यांना अधिकार दिलेला आहे.

**शुभांगी नाईक :-**

आरक्षणमध्ये ज्या इमारती उभ्या केलेल्या आहेत, इंडस्ट्रीयल आणि जवळ जवळ टॉवर झालेले आहे. त्या बिल्डींगला आपण टॅक्स लावला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कुठली इमारत ती सांगा? त्याबद्दल आम्ही चौकशी करतो आणि नंतर मग त्या संदर्भात सांगतो.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, तुम्हाला या गोष्टी माहिती असायला पाहिजे कुठची इमारत आहे. आरक्षणमध्ये ज्या आहेत त्या बघा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नेमके कुठल्या प्रश्नाबद्दल आपल्याला माहिती पाहिजे हे सभागृहात माहित नसते.

**शुभांगी नाईक :-**

असे कसे तुम्हाला माहित नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
आपण कुठल्याही इमारतीचे विचारणार त्याच्याबद्दल कसे सांगणार. प्रत्येक गोष्टी मला माहित नसते.
**शुभांगी नाईक :-**
आरक्षण क्र. ७५,७६ आहे ते आपण बघा. त्याचे आरक्षण आहे. इंडस्ट्रीयल बांधली गेली आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
त्याची चौकशी करू. या घडीला माझ्याकडे....
**शुभांगी नाईक :-**
इमारत बांधली गेली आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
मॅडम, तुमचा जो प्रश्न आहे त्या संदर्भात मला माहिती आहे. त्याच्या बद्दल मी तुम्हाला सागू शकतो.
**शुभांगी नाईक :-**
त्यावेळेला आपण टॅक्स लावला का, ते मी विचारते
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
चौकशी करून तुम्हाला सांगतो.
**शुभांगी नाईक :-**
चौकशी करून सांगणार.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
होय.
**शुभांगी नाईक :-**
मला एकत्रित संपुर्ण ह्याची माहिती द्या.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
माहिती देण्यात येईल. देतो.
**शुभांगी नाईक :-**
एकत्रित सर्व बिल्डींगला तुम्ही टॅक्स लावता का? टॅक्स लावायला आपल्याकडे कोण अधिकारी आहे?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
टॅक्स इन्सपेक्टर आहे. वॉर्ड अधिकारी आहेत.
**शुभांगी नाईक :-**
बिल्डर तुमच्याकडे येतो का?
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
आमच्याकडे बिल्डर येण्याचा काही संबंध नाही.
**शुभांगी नाईक :-**
संबंध कसा नाही.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
अर्ज करतात त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही करतो
**शुभांगी नाईक :-**
आपला बिल्डरशी कसा संबंध नाही. बिल्डर बिल्डींग उभी करतो आणि ज्यावेळी नागरिक येतात व ते विकत घेतात. तोपर्यंत हा भूदंड महानगरपालिकेला पडतो ना.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
संबंधित बिल्डिंगला वर्षभरात कधीपण टॅक्स लावता येतो. त्याच्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसानाचे प्रश्न नाही.
**शुभांगी नाईक :-**
साहेब, पण आज चार-चार, पाच-पाच वर्षापासून अशाच बिल्डिंग तिथे पडलेल्या आहेत.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
पडलेल्या इमारती नाही.
**शुभांगी नाईक :-**
ज्यांना टॅक्स लागला नाही. बिल्डर स्वतःची मजा मारतोय.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
तसे काय असेल तर यादी द्या.
**शुभांगी नाईक :-**
महानगरपालिकेला आपण हा भू-दंड भरतोय आपली महानगरपालिका लॉसमध्ये आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
आपण परटीक्यूलर बिल्डिंगचे नाव द्या त्या संदर्भात मी बघतो.

**शुभांगी नाईक :-**

मला नाव द्यायची गरज नाही. सर्व्हे करण्याचे काम हे तुमचे आहे. ती आमची कामे नाही. आपणच सर्व्हे करायचा, आपणच बघायचे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी सांगतोय आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर. परटीक्युलर कोणत्या बिल्डिंगबद्दल सांगता, हे मला कसे कळेल.

**शुभांगी नाईक :-**

माझ्या निर्दशनात जे आहे ते मी तुम्हाला दाखवेन. पण ह्या गोष्टी तुम्हाला माहिती असायल हव्या. तुमच्याकडे अधिकारी आहेत, ऑफिसर आहेत सगळं आहे. मग ते काय करतात?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यामध्ये मेन मुद्दा असा आहे की, फक्त वार्ड क्र. २५ चा हा मुद्दा नाही किंवा प्रशासकीय ही मुद्दा नही. परंतु, सर्व्हे किती वर्षात करायला पाहिजे?

**शुभांगी नाईक :-**

अहो मॅडम, तुम्ही गप्प बसा. प्रश्न माझा आहे.

**रतन पाटील :-**

मॅडम, प्रश्नोत्तराचा तास चालू आहे. आपण बोलू नका. आमचा वेळ घालवू नका.

**रिटा शाह :-**

तुमचा वेळ घालवत नाही. सर्व्हे किती वर्षात करायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर साहेबा, तुम्ही आम्हाला बसवले.

**शुभांगी नाईक :-**

मी माझ्या प्रभागाचा प्रश्न विचारलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टिपिकल अशा स्पेशल मोहिम करत नाही. आमचे रोजचे काम असते सर्व्हे करायचे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांना सभागृहात बोलण्याची परमिशन मिळाल्याशिवाय कोणी उठून उभे राहुन बोलण्यास सुरुवात करु नये. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक ह्यांनी विचारलेला प्रभाग क्र. २५ मधील जुन्या व नविन इमारतींची संख्या व त्यांना लागलेला टॅक्स ह्याच्याबद्दल प्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर ही तिथे दिलेले आहे. तरी संबंधित पुर्ण शहरामध्ये अशा ज्या काही इमारती आहेत की ज्यांना अजूनही टॅक्स लागलेला नाही. तरी क्षेत्रिय अधिकारी व त्या संबंधित अधिकाऱ्यांनी तेथील पाहणी करुन स्वतः जबाबदारीने टॅक्स लावला पाहिजे आणि तसे संबंधित खात्याला मी आदेश देते की, अशा शहरामध्ये असलेल्या इमारती ज्यांना टॅक्स लागलेला नाही त्यांना लवकरात लवकर टॅक्स लावून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्नात आपण भर घालण्यास सहकार्य करावे. पुढील प्रश्न घ्यावा.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ४६ श्री रतन कृष्णा पाटील ह्यांचा आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, तीन वर्षानंतर हा प्रश्न आज सभेच्या पटलावर येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे १९९५ नंतरच्या अनधिकृत झोंपडपट्टया आहेत का? असा मी प्रश्न विचारलेला होता आणि मला उत्तर दिलेले आहे. होय. जर होय तर त्याबाबत आपण काय कार्यवाही केली? महाराष्ट्र शासनाचे धोरण काय आणि या धोरणाच्या निर्णयानुसार आपण काय कार्यवाही केली आणि कशी करत आहात? त्याच्याबद्दल मला उत्तर द्या. हा जेवढा वेळ फुकट जातोय ना तेवढा वेळ आम्हाला वाढवून द्यायचा आहे.

**मा. महापौर :-**

तोपर्यंत पुढील प्रश्न घेण्यात यावा.

**रतन पाटील :-**

पुढील प्रश्न कुठला?

**मा. महापौर :-**

अधिकारी येईपर्यंत पुढचा प्रश्न घ्या.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम ह्यांनी सदरचा पुढील प्रश्न पुढे घेण्याकरिता सांगितले आहे. त्यामुळे क्रमवारीप्रमाणे श्री. दिनेश नलावडे, नगरसेवक ह्यांचा प्रश्न आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आताच शिवसेनेचे गटनेते बोलले की, तीन वर्षानंतर हा प्रश्न सभागृहापुढे आलेला आहे. तीन वर्षाने आमचा ही प्रश्न या ठिकाणी आलेला आहे. ज्यावेळेला आमचे भरपूर प्रश्न होते. पण ठिक आहे. तीन वर्षानंतर प्रश्न आल्याबद्दल मी याठिकाणी सचिवांचे आभार मानतो. मा. महापौर मॅडम, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने १७ वकीलांची आपण याठिकाणी नेमणूक केलेली आहे आणि त्याच्यासमोर आपण निर्णय देखील दिलेले आहेत. किती केसेस अजून प्रलंबित आहेत? तर आपल्या निदर्शनास येत आहे की, अतिक्रमण विभागामध्ये ७१६ अपीलांसह बाकी आहे. सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, कर विभाग, नगररचना विभाग, जकात विभाग, असे अनेक प्रश्न प्रलंबित असताना आपण या ठिकाणी १७ वकील नेमलेले आहेत. आपण स्थायी समितीमध्ये नक्की केले होते की, आपण याठिकाणी सभागृहामध्ये वकीलांची मिटींग घेउन त्या निकालाच्या बाबतीमध्ये चर्चा करायची. वकीलांची मिटींग होते किंवा नाही त्याची अजुनपर्यंत काही कल्पना नाही. परंतु, एवढे केसेस प्रलंबित असताना देखिल आपल्या महानगरपालिकेमार्फत ह्या केसेसवर आपण काहीच निर्णय घेत नाही. ह्याच्यामध्ये श्री. सुबोध परांजपे हे उच्च न्यायालय, मुंबई हे मयत वकील आपल्याला याठिकाणी दाखवले आहे. त्यांच्या जागेवर आपण दुसऱ्या वकीलाची नेमणूक केली आहे की, नाही. ह्याची कल्पना नाही. त्याचे आपण उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागाकरिता विधी अधिकारी हे पद आपल्याकडे रिक्त आहे. त्या अनुषंगाने त्याठिकाणी कायम स्वरुपी विधी अधिकारी भरण्यापुर्वी मानधनावर हे पद भरण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केली होती. मुंबई उच्च न्यायालयाचे विधी तज्ञ श्री. सपकाळे साहेब जे महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव पदावरुन रिटायरमेंट झालेले होते. त्यांची शिफारस आम्ही स्थायी समितीला केली होती. त्यांची मानधनाची मागणी प्रति माह वीस हजाराची होती. स्थायी समितीमध्ये ह्यावर निर्णय होउन त्यांचे मानधन दहा हजार रूपये प्रतिमाह करून त्यांची नियूक्ती करावी अशी शिफारस मान्य केली होती. त्या अनुषंगाने श्री. सपकाळे साहेबांना आम्ही हे संमती वजा कळविले असता त्यांनी काम करायला असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे ह्या अनुषंगाने प्रशासनाकडून हे पद कायम स्वरूपी भरण्याकरिता मा. आयुक्त साहेबांनी मान्यता दिलेली आहे आणि त्याची ॲड या दोन दिवसामध्ये मान्यता प्राप्त पेपरमध्ये देउन पूर्ण वेळ विधी अधिकारी नियुक्त करणार आहोत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आज आमच्याकडे एवढे प्रलंबित केसेस महानगरपालिकेचे असताना मी आपल्याला विचारू इच्छितो की, आपल्याकडे सतरा वकील असताना आपल्याला ह्याच्यामध्ये वकील कमी पडत आहेत का? ह्या केसेस संपवण्यासाठी आपल्याला वकीलांची आवश्यकता आहे का? की, सतरा वकील आपल्याला पुरेसे आहेत व ते हे सर्व प्रश्न संपवतील असे काय आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपल्या पॅनलवर असलेले सन्मा. अभियोक्त्यांनची संख्या कमी नाही ती पुरेशी आहे. फक्त कॉर्डीनेशन करण्यासाठी जे अधिकारी पाहिजे त्यांच्या नियुक्तीची कार्यवाही आम्ही तात्काळ करत आहोत.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आतापर्यंत आपल्या वकीलांनी किती निकाल लावलेले आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्यामध्ये मागील आर्थिक वर्षाची माहिती घेतली असता साधारणतः सर्व विभागाचे एकूण दावे बाराशे श्याहत्तर होते. त्यापैकी सहाशे एक दावे आता प्रलंबित आहेत.

**दिनेश नलावडे :-**

याठिकाणी आपण सातशे सोळा दावे प्रलंबित दिलेले आहेत. निकाल लागलेल्याचा आपण ह्या ठिकाणी आकडा दिलेलाच नाही. जे एवढे शिल्लक आहेतत्याचे फिगर आपण ह्या ठिकाणी दिलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आता जे प्रलंबित दावे आहे ते ६०१ आहेत. उर्वरित दाव्यांचे डायरेक्टली, इनडायरेक्टली निर्णय झालेले आहेत.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, हे प्रश्न मी तीन वर्षापूर्वी विचारलेले होते. पण हा त्यावेळेचा दिलेला आकडा आहे की, आताचा आकडा आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपल्याला जी माहिती दिलेली होती ती त्यावेळची आहे. पण वस्तुस्थिती खुलासा मी आजच्या परिस्थितीचा केलेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, शिक्षण विभागामध्ये काही प्रलंबित दावे नाहीत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

शिक्षण विभागामध्ये प्रलंबित दाव्यांची संख्या एक आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, मी आपल्याला शेवटचा प्रश्न विचारतोय, आपण ह्याच्यासाठी विधी अधिकाऱ्याची नेमणूक करणार आहोत किंवा काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ह्याचा मी सविस्तर खुलासा केलेला आहे आणि याबाबतची नियुक्ती आम्ही दोन महिन्याच्या आत निश्चित करु.

**दिनेश नलावडे :-**

दोन महिन्याच्या अगोदर. ठिक आहे. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांचा प्रश्न घेण्यात यावा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब आपला प्रश्न होता की, पहिला जो प्रश्न होता की, महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे १९९५ नंतरच्या अनधिकृत झोपडपट्ट्या आहेत का? आहेत. असतील त्यावर आपण कार्यवाही केलेली आहे? आपण अशा ज्या झोपडपट्ट्या स्वरूपामध्ये किंवा झोपडपट्ट्यांच्या स्वरूपामध्ये इन्स्टॉल झालेले आहे त्याच्यावरती आपण वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे आणि आज आपण दहा हजार सत्तर इतक्या झोपड्या निष्काषित केलेल्या आहेत. त्याच्यामध्ये शासकीय जागेतील ८,१२५ आहेत. मनपा रस्त्यावर ५७० आहेत. आरक्षित जागेमधील १,२२८ आहेत आणि डी. पी. रोड मधील १४७ अशी मिळून १०,०७० एकूण झोपड्या होत आहेत.

**रतन पाटील :-**

बरोबर आहे. आपण अतिक्रमणाच्या माध्यमातुन निश्चितच कार्यवाही करून सुद्धा त्या झोपडपट्ट्या आजपर्यंत तिथेच आहे. मग आपण केलेल्या कार्यवाहीचे काय? आपण ते समूळ नाश करतोय की, तोडतोय ते उभ्या राहण्यासाठी तोडत आहे. कारण जे झोपडपट्टी बांधलेले त्याचे वासे, पत्रे, सगळा माल तो आपण जप्त करतो का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण अशा झोपडपट्टीवर कार्यवाही करतो. आता अशा झोपड्यांवर कार्यवाही केलेली आहे म्हणून ४५ मिटरचा जो रस्ता आहे तो आपण डेव्हलप करू शकलेलो आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, कुठला रस्ता.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग जो आहे. त्याठिकाणी सुद्धा जे काही अतिक्रमण होते किंवा इतर ठिकाणी सुद्धा जे काही अतिक्रमण होते ते आपण रस्ता रूंदीकरणामध्ये किंवा इतर काही जागेमध्ये होते ते आपण उठवलेले आहे. काही ठिकाणी विकास कामे केलेली आहेत. ही सुद्धा फॅक्ट आहे की, उठवल्यानंतर ते लोक पुन्हा तिथे बसतात.

**रतन पाटील :-**

साहेब, आत्ताची परिस्थिती आपण पाहिली आहे का? आपण म्हणता की त्या रस्त्यावरून झोपडपट्ट्या उठवलेल्या आहेत. आपणाला त्या रस्त्यावर दोन्ही रस्त्याच्या दुभाजकामध्ये एवढी झोपडपट्टी वाढलेली आहे. मग आपण म्हणता उठवलेली आहे तर त्यांना उठवल्या आहेत व कुठे स्थलांतर केलेले आहे तेही सांगा आणि आता जे झोपड्या आहेत त्याबाबत काय?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण कुठले म्हणता?

**रतन पाटील :-**

आता आपण सुभाषचंद्र मैदानाचे सांगत आहात ना. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग. तर छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर झोपडपट्टी आहे का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपला स्पेसिफिक प्रश्न आहे.

**रतन पाटील :-**

आपण म्हणता म्हणून मी बोललो माझा प्रश्न वेगळा होता. माझा प्रश्न आहे की, तुम्ही सांगितले की आतापर्यंत कार्यवाही केली. तर आपण कार्यवाही केल्यावर त्याचे सामान जप्त करता का? की तिथेच दुसरे, कार्यवाही करायचे. नुसते दाखवायचे आणि तिथल्या तिथे तोडून टाकायचे आणि परत त्यांना उभे राहण्यासाठी

तिथे मोकळीक द्यायची. मी म्हणत नाही की आपण कार्यवाही केलेली नाही. आपण कार्यवाही केलेली आहे. पण कार्यवाही करताना परत त्याच रात्रीला लगेच तिथे झोपड्या उभ्या राहतात. याबाबत काय धोरण केलेले आहे? तिथे आपण वेगळी सेक्युरिटी नेमली आहे का? की, परत परत आपण जाउन ते परत परत तोडायचे एवढेच काम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आहे का? काय कारवाई केलेली आहे?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण वेळोवेळी झोपड्या काढतो, हे फॅक्ट आहे. आपण ते तोडून सुद्धा टाकतो. आपण जे.सी.बी.चा वापर करतो. आपण मनुष्यबळाचा वापर करतो. आपण इतर वाहनांचा वापर करतो आणि ते तोडतो. परंतु, तुम्ही जे म्हणता की, त्याठिकाणी पुन्हा पुन्हा लोक येतात, हेसुद्धा फॅक्ट आहे. त्याबाबत आपल्याला त्याच्यावर वेळोवेळी कारवाई करावी लागते.

**रतन पाटील :-**

धोरण काय आहे? १९९५ नंतरच्या झोपडपट्टीला शासनाचा निर्देश आहे. मग आपण धोरण काय ठरवलेले आहे? त्या तशाच उभ्या राहायच्या आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचा बजेट तिथे वापरायचा. सामान्य नागरिकांकडून टॅक्स रूपाने आलेला पैसा तिथेच वापरायचा? कुठले कागदपत्र बघून आपण त्यांना झोपडपट्टया देत आहोत ते कशा उभ्या राहतात? आपण काय कारवाई करता ते आपण आम्हाला आता सांगा. आपण करणार आहात ते सांगा की, आता ह्याच्यापुढे आम्ही करतोय आणि अशा ह्या ज्या झोपडपट्टया आहेत......

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपली ॲक्शन चालूच असते. आपण कुठेही ॲक्शन थांबवत नाही. आपण त्याच्यासाठी स्टॉल तयार केलेले आहेत. त्याच्यासाठी आपण झोनल ऑफीसर नेमले आहेत. इतर अधिकारी वर्ग दिलेला आहे आणि अनस्केल्ड स्टाफ दिलेला आहे. त्यामुळे आपण काय कारवाई करत नाही असेही नाही. परंतु, तुम्ही जे म्हणता की, आपण एखाद्या ठिकाणी कारवाई केल्यानंतर लोक येतात, परत त्याठिकाणी येतात. पुन्हा त्यांना उचलायला लागते, हे फॅक्ट आहे. त्यामुळे आपण कार्यवाही करत नाही असे म्हणणे योग्य नाही.

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, आपल्याला भोला नगर आणि आंबेडकर नगरचा ज्यावेळी रस्ता रुंदीकरण करणार होतो. त्यावेळी संपूर्ण झोपडपट्टया तेथून उठवल्या होत्या आणि त्या झोपडपट्टया उठवून सुद्धा सुभाषचंद्र बोस मैदानाच डिव्हायडरमध्ये झोपड्या कशा झाल्या ह्याचे उत्तर आपण पहिल्यांदा द्या. त्यांना प्रोत्साहन कोणी दिले? त्याच वेळेला जर त्या झोपड्या उठवल्या गेल्या असत्या तर डिव्हायडरमध्ये झोपड्या आल्या नसत्या. त्याला अधिकारी जबाबदार नाही तर कोण जबाबदार आहे?

**रतन पाटील :-**

एका ठिकाणी चांगला रस्ता, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एक असे चांगले काम आपण दाखवतो आणि एका बाजूला अशी झोपडपट्टी.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेब, आपण जो डिव्हायडरचा विषय उपस्थित केलेला आहे. त्यामध्ये झोपड्या वसलेल्या आहेत ही फॅक्ट आहे. त्याच्यामध्ये काही १९९५ पूर्वीच्या आहेत व काही १९९५ नंतरच्या आहेत. त्यावर आम्ही काहीवेळा ॲक्शन घेतलेल्या आहेत.

**अनंत पाटील :-**

रस्ता रुंदीकरणाच्या वेळेला सर्व्हे केला गेला. सर्व्हे केल्यानंतर १९९५ पुर्वीच्या लोकांना आपण पुर्नवसन करण्याचे आश्वासन दिले होते आणि पूर्नवसन करताना तुम्ही तिथे झोपड्या होतात कशा आणि त्याठिकाणी श्री. केळकर साहेब उपायुक्त असताना त्यांनी आम्हाला लेखी स्वरूपामध्ये दिलेले आहे की, पुर्नवसन केलेले आहे. तर पुर्नवसन नक्की कुठे केलेले आहे. ह्याचा आपण खुलासा कराल का? म्हणजे पुर्नवसनच्या नावाने अधिकारी वर्ग आम्हाला फसवतो का? ह्याचा खुलासा करा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

अद्याप पुर्नवसन करण्यात आलेले नाही.

**अनंत पाटील :-**

मला लेखी पत्र दिलेले आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

पुर्नवसनासाठी आपण शासनाकडे जागेची मागणी केलेली आहे.

**अनंत पाटील :-**

पुर्नवसनासाठी सर्व्हे नं. २३३ घोडबंदर येथे आपण एरिया बघितला होता तिथे तिकडच्या लोकांना घेउन जायचे, तिथे ही झोपड्या बांधायच्या. इथे ही झोपड्या बांधायच्या म्हणजे मधल्या मधल्या येथे जे सामान्य नागरिक येतात त्यांना उगीच त्याचा त्रास होतो.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण म्हणता ती फॅक्ट आहे. सर्व्हे नं. २३३ जे आहे ती शासनाची जागा आहे आणि ती जागा आपल्याला पुर्नवसनासाठी शासनाने आपल्या ताब्यात द्यावी असा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवलेला आहे. परंतू, अशा जागा आपल्या ताब्यामध्ये आलेली नाही.

**अनंत पाटील :-**

शासनाकडे आपण प्रस्ताव पाठवलेला आहे ह्याला साडे तीन वर्षे झाली. पुर्नवसन केलेले आहे. अशातऱ्हेचे प्रश्न आपण नगरसेवकांना देता. मग पुर्नवसन नक्की कुठे केलेले आहे की, पुर्नवसन करायच आहे आणि १९९५ नंतरसुद्धा तिथे झोपड्या वाढत आहे ते काढायचे कोणी?

**अजीज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

१९९५ पुर्वीची जी लोक असतील त्यांना प्रस्तावित पुर्नवसनामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे. कारण तो शासनाचा कायदा आहे. तसा शासनाचा नियम आहे. त्यामुळे आपल्याला त्यांना तसे वाऱ्यावर सोडता येणार नाही. परंतु, १९९५ नंतरच्या ज्या झोपड्या आहेत त्यावर आपण वेळोवेळी कारवाई केलेली आहे. आता मध्यंतरी साधारणतः एक महिन्यापूर्वी एप्रिल महिन्यामध्ये आम्ही तिथे कारवाई केली होती. पण दुर्दैवाने पुन्हा ती लोक तिथे आलेली आहेत. हे फॅक्ट आहे.

**अनंत पाटील :-**

साहेब, दुर्दैवाने आले आहेत असे म्हणण्यापेक्षा अधिकाऱ्यांचे त्यांच्याकडे लक्ष नसावे. झोपडपट्टया हलवायचे, पुर्नवसन करायचे असे आश्वासन देता. लोक तुमच्या आशेवर जगतात आणि तरीसुद्धा त्यांचे पुर्नवसन होण्यासाठी टांगती तलवार ठेवत असाल तर लोकांनी बघायचे कुठे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भामध्ये मी थोडक्यात खुलासा करतो की, झोपडपट्टीच्या बाबतीमध्ये जे रस्ता रुंदीकरणामध्ये झोपड्या काढल्या असतील किंवा काही आरक्षणावरच्या झोपड्या काढल्या असतील आणि त्या झोपड्या १९९५ च्या आधीच्या असतील. उदाहरण द्यायचे झाले तर सुभाषचंद्र बोस मैदानाच्या समोर डिव्हायडरमध्ये ज्या झोपड्या आहेत त्या संदर्भामध्ये मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्याठिकाणी सुद्धा काही १९९५ नंतरच्या झोपड्या वसलेल्या आहेत. परंतु, त्या बाबतीमध्ये उद्यापासून जे क्षेत्रीय अधिकारी आहेत त्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सक्त सुचना देण्यात येतील की १९९५ नंतरच्या जेवढ्या झोपड्या झालेल्या असतील त्या झोपड्या त्वरीत निर्ष्कषित कराव्यात अशाप्रकारची सुचना मी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उद्यापासून देत आहे. त्याच प्रमाणे मागच्या महिन्यामध्ये सुद्धा आपण त्या ठिकाणच्या झोपड्या काढलेल्या होत्या हे पण आपल्याला माहिती असेलच.

**अनंत पाटील :-**

त्यावेळी आपण जी कारवाई केली. त्यावेळी तिथे राहणाऱ्या काही ठरावीक लोकांना तिथे ठेवायचे आणि आपल्या ओळखीच्या माणसाला तेथून काढायचे असा प्रकार तिथे घडला जात आहे आणि १९९५ पूर्वीची जरी झोपडी असली तरी शासनाच्या निर्णयानूसार ९५ पूर्वीच्या लोकांना पुर्नवसन करण्याचा अधिकार आहे. असे नियमामध्ये आहे आणि त्यापद्धतीने त्यांना पुर्नवसन केल्यानंतरच हटवा आणि हटवा म्हणजे तुम्ही जे लोक १९९५ पूर्वी राहतात त्यांच्यावर पण अन्याय करता आणि जे आता नुकताच राहायला गेले आहेत त्यांना तुम्ही काढण्याचे निव्वळ नाटक करता. हे प्रसंग होतात. तिथे डिव्हायडर पूर्णपणे सुरक्षित राहायला पाहिजे म्हणून तुम्ही त्यांच्या पुर्नवसनाची जागा त्वरीत करावी आणि तिथे डिव्हायडरमध्ये असलेल्या लोकांना तिथून हटवा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीमध्ये मी फक्त एवढे म्हणालो की १९९५ च्या आधीच्या ठिकाणी ज्या झोपड्या असतील त्याबाबतीमध्ये सर्व्हे करण्यात येईल आणि १९९५ नंतर ज्या झोपड्या झाल्या असतील त्यामागे ताबढतोब काढण्यात येतील.

**अनंत पाटील :-**

म्हणजे पुर्नवसन होत नाही तोपर्यंत त्यांना या डिव्हायडर मध्ये ठेवणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

शासनाकडे आपण पुर्नवसनासाठी जी जागा मागितलेली आहे आणि पुर्नवसनासाठी आपण एक प्लान तयार केलेला आहे. जवळ जवळ माझ्या माहितीप्रमाणे अडीचशे पावणे तीनशे घरकुलाची योजना आपण तयार केलेली आहे व ते आपण शासनाला सादर केलेले आहे.

**अनंत पाटील :-**

साहेब, सर्व्हे क्र. २३३ मध्ये आपण त्यावेळेला बोलला होता व अतिक्रमण ज्यावेळी तोडले होते त्यावेळी आम्हीपण तिथे होतो आणि २३३ मध्ये तिथे हलवलेले आहेत. त्याच्या नंतर जवळजवळ दोन महिन्यानंतर त्या डिव्हायडरमध्ये झोपड्या वसल्या गेल्या.

**मा. आयुक्त :-**

त्याच संदर्भामध्ये मी आपल्याला सांगतो की, ९५ आधीचे त्याठिकाणी जे स्थलांतरीत केलेले आहे त्याच्या व्यतिरिक्त जे नविन झालेले असतील ते आपण त्यानंतर निष्कर्षित करू या.

**अनंत पाटील :-**

त्या तिथे आहेतच. पण १९९५ पूर्वीच्याही तिथे वसलेल्या आहेत. पण १९९५ पुर्वीच्या सर्व्हे नं. २३३ मध्ये गेलेल्या नसतील हे कशावरून? कदाचित तिथे १९९५ पूर्वीचे पुरावे तिथे ही सादर केलेले असतील.

**मा. आयुक्त :-**

सर्व्हे नं. २३३ हा पुर्नवसनासाठी जिल्हाधिकारी साहेबांकडे मागितलेला आहे. पण तो अजुनपर्यंत आपल्याला मिळालेला नाही. त्याचा पाठपुरावा आपल्याकडे सतत चालू आहे.

**रोहीदास पाटील :-**

बघायच्या आधीच संपूर्ण झाले आहे. तिथे आता दहा फूट ही जागा नाही. तुम्ही मागून तुम्हाला हॅन्डओव्हर करायच्या आधी त्या जागेचे तुमच्याकडून सर्व्हेक्षण झाले पाहिजे होते. त्या झोपड्या शिफ्ट करायच्या आहेत. एवढीच नोंद झाली. पण त्यांचे खरोखरच पुर्नवसन करायला पाहिजे होते. बंदरवाडी झोपडपट्टी तशीच फिरते रस्त्यावर त्यांना कुठेही जागा मिळालेली नाही. १२७ झोपड्या आहेत.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते की, आत्ताच दोन महिन्यापुर्वी तिथे अधिकाऱ्यांना फोन करून सांगितले की, झोपड्या तोडा आणि दुसऱ्या दिवशी जाउन लगेच तिथे काही नगरसेवकांनी सांगितले की, आता बांधायला सुरूवात करा. म्हणजे पहिले तोडायला सांगायचे आणि नंतर बांधायला सांगायचे आणि त्यातिथे झोपड्या ९५ पुर्वीच्या नाही. आंबेडकर नगरमध्ये ९५ पुर्वीचे काहीकांचे पुरावे नसताना तिथे टॅक्स लागले गेलेले आहेत. ते आपण तपासून पहा.

**अनंत पाटील :-**

याविषयी काय डिसीजन दिले?

**मोहन पाटील :-**

रेल्वेच्या जागेत ज्या १२७ बंदरवाडी झोपडपट्टया होत्या. त्या झोपडपट्टीवाल्यांना आपण फोटोपास दिले आहेत आणि फोटो पास देउन त्यांना राहायला कुठे जागा दिली नाही. आंबेडकर नगरमधल्या ज्या झोपड्या आपण रस्ता रुंदीकरणाच्या वेळी हलवल्या त्यांना आपण पुन्हा तिथे वसवले. परंतु, ज्यांना कुठे जायला जागा नाही. त्यांचे काय करायचे? हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

म्हणून मी सभागृहाला सांगितले की, मा. जिल्हाधिकाऱ्यांकडे आपण जो प्रस्ताव पाठवलेला आहे सर्व्हे क्र. २३३ चा तो अजूनपर्यंत प्रलंबित आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, सर्व्हे क्र. २३३ मध्ये अजिबात जागा नाही.

**रोहीदास पाटील :-**

साहेब, आकारणी एकदा मार्गी लागली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य सांगतात त्याप्रमाणे जर समजा, पुर्नवसित जागेवर जर अशाप्रकारे अनधिकृत झोपडपट्टया होत असतील किंवा झाले असतील तर ते ताबडतोब काढण्यात येतील.

**रतन पाटील :-**

झालेले आहेत. एक वीत सुद्धा जागा नाही.

**रोहीदास पाटील :-**

जे झालेले आहे, शेख साहेबांनी निवेदन केल ते असे कुठे ही सांगू शकत नाही की, आम्ही त्या खात्याचे अधिकारी आहोत. त्यांची रोजनिशी असे बोलते की, या ठिकाणचे पंचवीस काढले. त्या ठिकाणच्या पाच झोपड्या काढल्या. त्याठिकाणच्या दोन हजार झोपड्या काढल्या. त्याठिकाणच्या दोनशे काढल्या. अशी त्यांची रोजनिशी नाहीच आहे. पण झोपड्यांची त्यांची संख्या वाढत आहे. ते कार्यरत आहेत. ते अतिक्रमण विभागाचे अधिकारी म्हणून रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून काम करत आहे. झोपड्या कुठेच निघत नाही. झोपड्या वाढत चाललेल्या आहेत. ही चिंतेची बाब आहे. त्यांचे अधिकारी सगळे काम करतात.

**मोहन पाटील :-**

पण त्यांच्याकडे फोटोपास आहे ना.

**रोहीदास पाटील :-**

आपण या सभागृहाने अधिकाऱ्यांना कधीही नाकारले नाही. त्या त्या डिपार्टमेंटने मागितली ती ती सगळी मदत दिलेली आहे. ह्याच सभागृहाने ठराव केलेला आहे की, त्यांना पोलिस फोर्स पाहिजे. स्वतंत्र पोलीस असावे असा ही ठराव एकमताचा आहे. कोणाचा विरोध नव्हता. ते पी.आय.ए. आले नाही पी.एस.आय ही आले नाही. हवालदार आले नाही. महिला हवालदार कोणीही आलेले नाही. म्हणजे सभागृहाला तुम्ही फक्त एवढेच समजून घेता की हे होय म्हणतात की नाही. नाही म्हटले तर तुमचे फावले, होय म्हटले तर पुढचे काही करायचे नाही. ठराव करून ठेवायचा असे अनेक ठराव जे तुम्ही केले आणि ते बासणात बांधून ठेवलेले आहेत. त्याचा उपयोग काही नाही. शहराच्या विकासासाठी तुम्ही जी मागणी केली ती अतिक्रमण

विभागाला किंवा आयुक्तांना म्हणून. महापौरांनी सगळ्यांनी एकमताने दिलेले आहे. त्याची कारवाई होत नसेल, खर्च होत असेल. आस्थापनेचा खर्च वाढत चालला आहे. पण कृती काही नाही. कृती काय असेल त्याच्यावर निवेदन करावे. कृती काही नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी विचारलेला प्रश्न, पुर्ण शहरामध्ये........

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, झोपडपट्टी बाबत बोलतोय, शिवनेरी नगर राई मुर्ध्याला आहे. त्या शिवनेरी नगरच्या पाठीमागे नगरपालिका असताना झोपड्या कमी होत्या. महापालिका झाल्यानंतर झोपड्या वाढल्या गेल्या. समुद्रकिनारा हा संपूर्ण ओपन लॅन्ड आहे. तिथे संरक्षण भिंत बांधली असती तर कदाचित तिथे अतिक्रमण झाले नसते. तिथे अगोदर संरक्षण भिंत बांधा. नाहीतर, अतिक्रमण हे वाढत वाढत जाईल आणि तिथल्या स्थानिक नागरिकांना नाहक त्रास होत जाईल. म्हणून संरक्षण भिंत बांधावी अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या झोपडपट्टीच्या विषयावर बोलतो झोपडपट्टीसाठी खास करून याठिकाणी बरेचसे लिडर आहेत. जे झोपडपट्ट्या वाढवायचे काम करतात. आयुक्त साहेब, त्यांच्यावर तुम्ही कायदेशीर कारवाई करा. झोपडपट्टी वाढवणारे लोक आहेत जे लिडर आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा. आम्ही आयुष्य राजकारणात घालवत आहोत. पण कोणी सांगितले की, झोपडं बांधले असले कुठल्या एरियामध्ये.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब नाव द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जे बोलतोय ना तेच झोपडे बांधतात. असा माझा दावा आहे. म्हणून अशांवर आपण कडक कारवाई करा.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण नाव सांगा ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नाव सांगायला वेळ लागणार नाही आणि आम्ही घाबरत ही नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, नाव सांगायची. चांगले आहे ना. त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. एकदम चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हे सांगायची गरज नाही. ती मोठी प्रसिद्धी आहे.हे आपण लक्षात घ्या.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता साहेबांनी बोलले की डिव्हायडरमध्ये ९५ च्या अगोदरचे ते लोक आहेत. त्यांना ठेवणार आणि बाकीच्या लोकांना काढणार. पण साहेब, आपण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये टॅक्स भरणाऱ्या लोकांचे पैसे गोळा करतो आणि ते पैसे लोकांचे आहे आणि लोकांच्या पैशातून आपण लाखो रूपयाचा तो रोड बनवून सुशोभिकरण करून घेतलेले आहे आणि मधेच त्या झोपडपट्टया आहेत. ९५ च्या आधीचे असू दे कि नंतरचे असू दे. पण हे शोभा वाटते का? लोकांच्या पैशांचा गैरवापर आपल्याला वाटत नाही का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या आम्ही आपल्याला सांगू इच्छितो की, मी असे म्हणालो नाही की त्याठिकाणी ९५ आधीची झोपडपट्टी ठेवायची. परंतु, मी फक्त एवढेच म्हणालो की ९५ नंतर ज्या काही झोपड्या झालेल्या आहेत व त्याठिकाणी संपूर्ण डिव्हायडर तो भरून गेलेला आहे. तर मागच्या महिन्यामध्ये सुद्धा आपण कारवाई केलेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, माझा मुद्दा असा आहे की, तिथे तुम्ही बघा जर आपण तिथे गाडी घेउन गेलो की........

**रतन पाटील :-**

त्याच्या अपरोक्षसुद्धा त्या झोपडपट्टीमध्ये राहणारे महिला त्या रस्त्यावर धुणी पाणी सगळ करत आहेत. लहान मुले त्या रस्त्यावरून धावता आणि दोन्ही बाजूने वाहतुक जोराने चालू आहे आणि जर यदाकदाचित तिथे जर एक्सीडंट झाला तर त्याजा जिम्मेदार कोण? महापालिका प्रशासन राहील की, त्या विभागाती नगरसेवक राहतील? कोण जबाबदार राहील?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी विचारलेला प्रश्न, अनधिकृत झोपड्याबद्दलचा आहे. सुभाषचंद्र बोस मैदानावरील डिव्हायडरमध्ये असलेल्या झोपड्या त्या गेल्या महिन्यामध्येच पूर्णपणे हटविल्या होत्या. या

झोपड्या हटवल्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी गस्त घालणे फार गरजेचे आहे व दुसऱ्या दिवशी जर झोपडी होत असेल तर लगेच ती हटवली गेली पाहिजे आणि अशा प्रकारे मी प्रशासनाला निर्देश देते की, पूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये १९९५ नंतरच्या झोपड्या काढून टाकण्यात याव्यात आणि डिव्हायडरमधल्या पूर्ण झोपड्या हलवण्यात याव्यात.

**मिलन पाटील :-**

मॅडम, टाउन पार्कशिप आहे तिथल्या सुद्धा झोपड्या मी अनेकवेळा तक्रार केली असताना त्या आपल्या आरक्षणामधल्या कितीतरी झोपड्या आज वाढलेल्या आहेत. त्या टाउनशिप पार्कमधल्या ही झोपड्या काढण्याचे तुम्ही निर्देश द्या. ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपल्या संपूर्ण शहरातल्या झोपडपट्टया हटविण्यात यावे. सन्मा. सदस्य आपल्या सुचना नमुद करून घेतल्या जातील.

**हंसुकुमार पांडे :-**

मॅडम, मा. महासभेमे हर विषय आता है पर उसके उपर कार्यवाही नही की जाती है। खाली आश्वासन दिया जाता है। लेकिन कार्यवाही कोई भी नही होती है। यह सर्व्हिस रोड के बारे मे क्या बात हुआ था लेकिन सर्व्हिस रोड का आजतक कुछ हुआ ही नही।

**मा. महापौर :-**

अगर इसबार कार्यवाही न होगी तो हम उस अधिकारी के उपर कार्यवाही करेंगे।

**हंसुकुमार पांडे :-**

ठिक आहे. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर महोदया, आपण या सभागृहामध्ये रुलिंग दिली होती की, जे जे तबेले आहेत ते ताबडतोब उचला. पण आज ही जे तबेले आहेत त्यांचा मालक तुमच्या शब्दाचा मान करत नाही ही गंभीर बाब आहे. मागच्या सभेमध्ये तुम्ही आदेश दिले होते आणि आजही तिथे तबेले उभे आहेत ते आपण जाउन बघा. तिथे गाई उभ्या आहेत. मग मा. महासभेचा काय अधिकार आहे? फक्त आदेशच द्यायचे आहे का?

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मानाने बोलला होता की, ह्या एका रोडसाठी या शहराचे नाव वाढले. काशीमिरा ते उड्डाणपुल. त्या रोडच्या सर्व्हिस रोडबद्दल आयुक्त साहेबांकडे ही होय म्हटले. आपण सभागृहात होय म्हटले. त्यातली एक वीट तुम्ही काढू शकला नाहीत. आताही त्या सर्व्हिस रोडमध्ये काम चालू आहे. काय करायचे आहे ते सांगा. ह्याला बळकटी येण्यासाठी आम्ही सोळा नगरसेवकांनी सही केलेले पत्र आयुक्त साहेबांच्या हातात दिले आणि आयुक्त साहेबांनी सांगितले की, काका हे खरोखरच भुषणावह नाही. हे अनधिकृत बांधकाम आहे ते काढायला पाहिजे. आता ही नविन जें पुटींग निघते ते सर्व्हिस रोडमधुन निघत आहे. महापालिका कार्यरत आहे की, नाही? प्रशासन कार्यरत आहे की, नाही? आम्ही मा. महापौरांना काय विचारायचे. आम्ही अपमान करु इच्छित नाही. आम्ही अपमान करत नाही. तुम्हाला कोंडीत पकडत नाही. पण प्रशासन तिथे जे काम करतात ते अधिकारी काय करतात हे ८४ नगरसेवक येतील आणि सभागृहात बसून जातील अशी ह्यांची भावना आहे का? सर्व्हिस रोडबद्दल तुमचा नीट निर्णय सांगा की, आज सर्व्हिस रोडमध्ये असलेले चालू बांधकाम, झालेली बांधकाम. सर्व्हिस रोड हा कोणाचा व्यक्तीगत नाही. एका व्यक्तीबद्दल कोणी तक्रार करत नाही. जे डिमार्केशनमध्ये येईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. सचिवजी पुढील विषयाला सुरूवात करा.

**रोहीदास पाटील :-**

म्हणजे सर्व्हिस रोडमध्ये बांधकाम चालू राहू द्या असेच तुम्हाला म्हणायचे आहे का? तुम्हाला काय म्हणायचे आहे? सबजेक्ट नाही असे म्हणायचे आहे का? आपण सांगा की, हा विषय महत्वाचा नाही असे सांगा. संपला विषय.

**मोहन पाटील :-**

आता झोपडपट्टीचा विषय नसून प्रश्नोत्तराचा तास चालू होता व मधेच प्रश्न सन्मा. सदस्यांनी काढलेला आहे. त्यानंतर त्यांना बोलू दिले आहे.

**रोहीदास पाटील :-**

मोहन पाटील तुमचे बांधकाम त्याच्यामध्ये नाही. सर्व्हिस रोडमध्ये तुमचे बांधकाम नाही. तुम्ही चिंता करू नका.

**मोहन पाटील :-**

बांधकामाचा प्रश्न नाही. विषयपटलावर इतर विषय महत्त्वाचे आहेत ना.

**रोहीदास पाटील :-**

सर्व्हिस रोडबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहामध्ये मॅडम रूलिंग देतात त्या रूलिंगचे पालन होत नाही. मग सभाच कशाला पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. आपल्याला बोलायची परमिशन दिलेली नाही.

**रतन पाटील :-**

त्याचप्रमाणे भारतीय भारतरत्न बाबासाहेबआंबेडकारांचा जो नविन पुतळा टेलिफोन एक्सेंजच्या बाजूलाही झोपडपट्टी उभी राहिलेली आहे. ती सुद्धा काढून टाकण्यात यावी. माझा प्रश्न बाकी आहे. तो पुढच्यावेळेला घेण्यात यावा. माझा प्रश्न पुर्ण झालेला नाही. तो आटोपलेला नाही. फक्त झोपडपट्टी झाली. बाकीचे अजून बाकी आहे. मा. महापौर मॅडम पुढच्यावेळेला माझा प्रश्न आला पाहिजे.

**मा. महापौर :-**

निर्देश देण्यात आलेले आहे की, पुढच्या वेळेला आपला प्रश्न येणार नाही.

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०१ चे वाचन केले.)

**अशोक ब. पाटील :-**

सचिव साहेब, दि. १८/११/०५ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. ३२ वर माझे जे संभाषण आहे त्याच्यामध्ये आपण कंट्रोल हा शब्द दिला आहे. तर कंटरमॅप पाहिजे आणि असे वाक्य आहे की, २६ जुलै रोजी ची जी अतिवृष्टी झाली त्या अतिवृष्टीमुळे प्रशासनासहित लोकप्रतिनिधींची सुद्धा झोप उडाली. त्याच्यामध्ये पुढचे वाक्य असे आहे की, नैसर्गिक नाले जे कंटरमॅपमध्ये दर्शविण्यात आलेले आहे ते अस्तित्वात आहे किंवा नाही असे ते वाक्य आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिवजी पान क्र. ३६ वर ठराव क्र. ६६ जो आहे. भाईंदर पश्चिम येथील नाले त्यामध्ये सन्मा. सदस्य जेन्वी आल्मेडा ह्यांनी काही प्रस्ताव उत्तन भागातील सुचवलेले होते. ते ठरावामध्ये अंतर्भूत झालेले नाही. ते कृपया अंतर्भूत करून घ्यावे. त्याच्या आदल्या पानावर वक्तव्य आहे. त्यांनी जे जे प्रस्ताव अंतर्भूत करण्यासाठी बोलले होते ते सर्व आलेले आहे.

**अशोक ब. पाटील :-**

त्याचप्रमाणे सचिव साहेब, त्याच्यामध्ये आणखीन एक मुद्दा मी ही उपस्थित केला होता की, रेवाकर येथील नाला तो सुद्धा ह्याच्यामध्ये अंतर्भूत करण्यात यावे.

**रोहीदास पाटील :-**

ह्या इतिवृत्तांताला मंजुरी देतेवेळी त्याची काय कार्यवाही झाली किंवा नाही ते विचारण्याचा अधिकार आहे का? आहे ना. मग ते द्या. आम्ही जेवढे प्रश्न विचारले आहे त्याच्यातले एक दोनचे तरी निवेदन करा. आम्ही त्या इतिवृत्तांताबाबत काय कार्यवाही झाली तेवढे विचारतो आणि आपण ठराव मांडता.

**मा. महापौर :-**

ठराव मांडल्यानंतर आपल्या प्रश्नाचे उत्तर संबंधित अधिकारी देतील.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०१ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानूमते मंजुर.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. १८/११/२००५ व दि. १७/१२/२००५ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. १८/११/२००५ व दि. १७/१२/२००५ रोजीचे मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०२ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने आज सभागृहामध्ये आयुक्त साहेबांच्या वतीने आणि प्रशासनाच्या पूर्व परवानगीने जाहिरनाम्याचा विषय आलेला आहे. आपल्या महापालिकेमध्ये तळमजल्यावर

करोडो रूपये खर्च करून नागरी सुविधा केंद्र उपलब्ध करून दिलेले आहे. पहिली गोष्ट तर आमच्याकडे दिलेली जी कागदपत्रे आहेत त्यामध्ये येथून क्रमांक ४ डायरेक्ट सुरू होतो. पुढचे २ काय ३ काय ते कळायला मार्ग नाही. म्हणजे आपण नागरिकांना जाहिरनामा देत असताना प्रशासनाच्यावतीने म्हणा किंवा यापुढे म्हणा आपण पहिलीच चुक करतोय की, पुढे १, २, ३ हे माझ्यातरी कागदपत्रात आलेले नाही. तर पुढचे काय आहे ते मला माहिती नाही व १३, १, २ हा प्रकार काय आहे? १३, १, २ परत खाली १ आहे. हे जे दिले आहे १२ तर १३ बरोबर आहे. पण १, २, १ असे काही तरी दिले आहे. म्हणजे उद्या हे कागदपत्र तुमचे फायनल होणार आहे. ह्या क्रमानुसार आम्ही मंजुरी देणार आणि हे जे तुम्ही दिले आहे संपुर्णपणे जाहिरनामा ह्याचे जो उल्लंघन करेल त्याच्यावर आपण काय कार्यवाही कराल प्रशासन म्हणून व आम्ही काय करू शकतो किंवा जनतेने काय करावे? ह्याचा कुठेही उल्लेख नाही. आता मी पान नं.१ पासून वाचतोय, सिरियल नं. ९ पाणी पुरवठा नलिका फुटणे आणि तुंबणे. ४८ तास तुमचे बाकी आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, सगळ्यांकडे ही पुस्तिका आहे. आपल्याला ज्या सुचना सुचवायच्या आहेत त्या थोडक्यात आणि दोन मिनटात सुचवा. कारण इतर ही सदस्यांना आपल्या सुचना मांडायच्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला सुद्धा सुचना मांडायचा अधिकार आहे. ते आम्ही मांडतोय आणि एवढ्याला माझे तीन पॉईंट झाले असते. पान क्र. १ मध्ये, ९ मध्ये पाणी पुरवठा नलिका फुटणे आणि तुंबणे ४८ तास एवढे आपल्याला नको. कारण आता गॅस्ट्रो, कावीळ वगैरे या साथी प्रार्दुभाव जोरात वाढलेले आहे. एकतर तक्रारी दिल्यानंतर माणसे नसतात. येथे त्वरीत लिहावे. कारण आपल्याला ज्या साथी रोकता येत नाही. पण कुठेतरी त्याला आपण पुर्णविराम घातला पाहिजे. ४८ तास द्यायची काय गरज नाही. तक्रार मिळताच त्वरीत असा उल्लेख इकडे करावा. जलनलिका दुरूस्त करणे, तक्रार दिल्यापासून तीन दिवस म्हणजे तोच प्रकार आहे. हे कधी होते. एखादी माझ्या घराची पाईप लाईन जेव्हा सडते, कुजते, फुटते व बाहेरचे पाणी त्याच्या आतमध्ये जाते. ह्याला तीन दिवस वर ४८ तास ते दोन्ही कट करून त्वरीत असे तिथे लिहिले पाहिजे. कारण ह्याच्यातुन रोगाचा प्रार्दुभाव वाढतो. म्हणून माझी ही विनंती आहे. त्यानंतर १४ मध्ये पाण्याचे नमुने घेणे. ह्याच प्रकारे खाली आहे. तिथे प्रति दिन लिहले आहे. नमुने घ्यायला काही गरज नाही. आपण तात्काळ घेतले पाहिजे तर त्याच्यामध्ये कुठे काही रोगराई होण्यासारखे असेल तर आपण प्रतिबंधक घालू शकतो. तिथे तात्काळ लिहावे. प्राथमिक परवानगी, गैर कृषी वापरासाठी परवानगी देणे सुधारित नकाशांचे बांधकाम परवानगी देणे. हा संपूर्ण जो नगररचनेचा चॅपटर आहे. म्हणजे नागरिकांच्या तक्रारीचे निवारण आणि १ ते ८ या मध्ये तक्रारीचा सदरच नाही. म्हणजे नगररचनेचा कारभार आपला रामराज्यासारखा चालू आहे. असे आपल्याला म्हणायचे आहे. नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतर त्याचे तक्रार निवारण किती दिवसात? १,२,३ तास वगैरे काही नाही. त्याचा उल्लेख करावा आणि हे जे दिलेले आहे सात दिवस, आकृषित परवानगी ह्याच्यात सेपरेट कॉलम करून तक्रार हा सेपरेट विषय घेउन त्याची सुरूवात ही कधी करायची आणि कोणी करायची ह्याचा कॉलम आपण बनवून घ्यावा. त्यानंतर मुख्य पाण्याच्या नलिकेतील गळती बंद करणेस तीन दिवस. परत तेच आले. आपण एकीकडे ४८ दिवस तिथे परत तिन दिवस, पुढे ३ दिवस देत आहोत. आपल्याला गळती एकतर वॉटर ऑडीट झालेले नाही. मागच्या मा. महासभेमध्ये आम्ही हा विषय घेतलेला आहे. तर ते ३ दिवस न करता तक्रार मिळताच क्षणी तात्काळ असे पाहिजे. त्यानंतर पाणी दुषित असल्या बाबतच्या तक्रारी ४८ तासाच्या आत परत तोच विषय आहे. म्हणजे सगळीकडे आपण २ ते ३ दिवस देत आहोत. आपल्याकडे जर दुषित तक्रारी आल्या तर नमुना घ्यायला आपले अधिकारी गेले पाहिजे. त्यांनी तात्काळ सेवा केली पाहिजे. आम्ही हे जे बोलतोय ते ह्याच्यामध्ये नोंद करून घ्यावी. तसेच, बिलाबाबत, देयकाबाबत, मिटर तपासणी करून पाणी वापरलेली कार्यालयाची नोंद घेणे. या संपूर्ण क्लॉजमध्ये १ ते ४ मध्ये बंद मिटरबाबत आपण काहीच बोलत नाही. सोसायट्यांची सहा सहा महिने बिल बंद असतात आणि सहा महिन्यानंतर आपण हजारोने बिल पाठवतो. बंद मिटरबाबत आपण काही बोलत नाही. बंद मिटरबाबत सुमोठे घेउन गेले पाहिजे. लोक फुकट पाणी वापरतात. बऱ्याच ठिकाणी मिटरच नाही. परवा, गेल्या आठवड्यामध्ये पाणी विभागातून आमच्याकडे सहा टॉवरला कनेक्शन, मिटर बंदच. आपल्या कार्यालयातल्या कर्मचाऱ्याने त्याची तक्रारही केलेली नाही. म्हणजे हे मीटर जे पाणी वापरतात. मग आपण त्यांना रक्कमा फुगवटा करून द्यायची आणि त्याच्यामधून मग वाद निर्माण होतात. हे जे बंद मिटरचे दिलेले आहे ते त्वरीत करावे. कारण ह्याच्यामध्ये आपली पाण्याची गळती होत आहे. त्यानंतर संकीर्ण मध्येतीन नंबर दिलेले आहे. थकबाकी नसल्याचा दाखला देणे. आम्ही जे ८४ नगरसेवक येथे बसलेले आहोत आम्हाला थकबाकी नसल्याचा दाखला दर तीन महिन्यामध्ये प्रशासनाने त्वरीत द्यायचा आहे. असा महापालिकेचा अधिनियम आहे. पण इकडे आपण तीस दिवस लिहिले आहे. कसली थकबाकी, काय करणार आहात तुम्ही? म्हणजे मी तुम्हाला अर्ज द्यायचा आणि ऑलरेडी तूम्ही मला एक महिना देत आहात आणि मग परत नोटीस काढणार पंधरा दिवसात भरायचे म्हणजे ४५ दिवस झाले. हे ३० दिवस न देता तुमचे हे काम आठवड्यामध्ये झाले पहिजे किंवा दोन दिवसात झाले पाहिजे. आपण संगणक कशासाठी बसविले आहेत हे आम्हाला दोन दिवसात कळले पाहिजे आणि महापालिकेकडून त्याची वसुली

झाली पाहिजे. त्यानंतर सार्व. बांधकाम विभाग. विशेष दुरूस्ती. नियोजित वेळेप्रमाणे उपलब्धतेनुसार, तरतुदीनुसार हा नियम आणि कायदा नाही. जी परवानगी आपण साठ दिवसात देऊ शकलो नाही, ती परवानगी ग्राह्य धरली जाते. जिथे साठ दिवसात होय किंवा नाही असे उत्तर दिले नाही. तर ती परवानगी दिली असा नियमानुसार समज होतो. त्यामुळे साठ दिवस हे कंम्प्लिशन पिरियड पाहिजे. त्याचा जो पिरियड आहे तिथे साठ दिवस म्हणून असे काहीही लिहिलेले नाही. विशेष दुरूस्ती. कर्मचारी निवास स्थाने. तिथे सुद्धा दिलेले नाही. तिथे साठ दिवस असे क्लिअर कट पाहिजे. त्यानंतर बऱ्याचशा ठिकाणी ब्लॅक ठेवलेले आहे. म्हणजे कालावधी काहीच नाही. झोपडपट्टी सुधारणा विभाग. १) झोपडपट्टयातील पुर्नबांधणी योजनेसाठी झोपडपट्टी धारकांची पात्रता निश्चित करणे. कालावधी काहीच नाही. म्हणजे वर्षभर तुम्ही पात्रता निश्चित करत राहणार. तो १/१/९५ च्या अगोदरचा आहे किंवा नंतरचा आहे् का हे सगळं तुम्ही वर्षभर करत राहणार. येथे कालावधी टाका आणि एक आठवड्याच्या अगोदर त्यांना कळवले पाहिजे. तुम्ही त्याची पात्रता ठरवता आहात. तुमच्याकडे सगळे रेकॉर्ड असले पाहिजे आणि त्या रेकॉर्डनुसार तुम्ही त्यांना एक आठवड्याच्या आत कळवले पाहिजे. त्यानंतर दोन नंबर महिला बालकल्याण कार्यक्रमाच्या योजना राबविणे. यामध्ये सुद्धा हा कार्यक्रम कधी राबवायचा, कधी सुरूवात करायची त्याचे मुहूर्त स्वरूप कधी आले पाहिजे ह्याचा कुठेही उल्लेख नाही. पुर्ण ब्लँक शेड्यूल दिलेले आहे. तिथे आपण हा कार्यक्रम राबविण्याची जी पुर्तता आहे ती सात दिवसात सुरू करावी असे पाहिजे. ते दाखविलेले नाही आणि शेवटच्या पानावर कायदेशीर नोटीस बजावून नोटीस मुदत संपल्यानंतर फौजदारी गुन्हा दाखल करणे. येथे वीस दिवस दिलेले आहे म्हणजे आपली नोटीस जाते पंधरा दिवसाची सोळाव्या दिवशी तक्रारदार तक्रार करण्यास पात्र आहे का, आपात्र आहे हे क्लिअर होते. त्यामुळे येथे सोळा दिवसाचा अवधी टाकावा. वीस दिवस आहे म्हणजे मग ते त्या नोटीसवर जाऊन स्थगिती घेउन येणार आणि नंतर सांगतील की, न्यायप्रविष्ठ जर प्रकरण झाले त्यामुळे गुन्हा दाखल करता येत नाही. त्याकरिता तिथे वीस दिवसाच्या ऐवजी सोळा दिवस करावे. नोटीस कायदेशीर मुदत संपल्यानंतर अनधिकृत बांधकाम दूर करणे. पाच दिवस म्हणजे सगळी सेटींग लावायला मोकळे. ते त्वरित झाले पाहिजे. तुमची नोटीस क्लेरीफाय होते की, हे अनधिकृत आहे. कोर्टाचा आदेश नसेल तर त्वरीत तुम्ही रात्रीपण जाउन तोडू शकता. २४ तासात त्याच्यामध्ये तुम्हाला कसलेही बंधन नाही. त्या तिथे पाच दिवसाच्या ऐवजी दोन दिवस करावे. त्यानंतर कर आकारणीबाबत केलेली तक्रार तीस दिवस. हे कशासाठी? तुमच्या नोटीशी आतापर्यंत पंधरा दिवसाच्या नियमाप्रमाणे निघाल्या आणि आता तुम्ही तीस दिवस मागता म्हणजे पंधरा दिवस ते आणि पंधरा दिवस आणखीन म्हणजे प्रत्येक वेळा नागरिकांनी एक एक महिना तुमची वाट बघायची दोन अडीच करोड आपले वाया घालवून सुद्धा लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या पत्रांना व्यवहार उत्तर देणे हा व्यवहार काय प्रकार आहे हे मला कळत नाही. व्यवहार झाल्याचे उत्तर देणार का कसले? ह्याच्यामध्ये तीस दिवस. मी नगरसेवक आहे. एखादा महत्त्वाचा विषय आला व आपत्कालीन जर काही घडले, मी तुम्हाला पत्र दिले तर तीस दिवसांनी कमिशनर उत्तर देणार. लोकप्रतिनिधींना त्वरीत उत्तर मिळाले पाहिजे. एक दिवसात आम्हाला पत्राचे उत्तर मिळाले पाहिजे आणि तो व्यवहार काय आहे ते आपण बघा. काळा व्यवहार, गोरा व्यवहार, लेनम, देनम काय असेल ते क्लिअर करून घ्या आणि शेवटचे आहे......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण आपल्या पद्धतीने बोलावे. आपण सभागृहात आहात त्याचे भान ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, मी अगदी लॉफुल भाषा बोलत आहे. व्यवहार हा शब्द लिहिलेला आहे. व्यवहार हे मी वाईट बोलत नाही.

**मा. महापौर :-**

आपण कायद्याच्या बाहेर जाऊन बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

मी कायद्याच्या बाहेर बोलत नाही, मॅडम. आपण ह्याच्यावर लॉ डिपार्टमेंट कडून ओपिनियन मागवा.

**मोहन पाटील :-**

त्यांच्या सुचना आहेत त्या सुचना त्यांनी क्रमव्हाईस द्यावे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, या विषयावर आम्हालासुद्धा बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्या सुचना क्रमव्हाईज लेखी स्वरूपामध्ये पाठवा.

**मिलन म्हात्रे :-**

एक राहिलेले आहे. एक नंबरमध्ये सर्व प्रकारचे दाखले, परवाने इत्यादींचे नुतनीकरण याकरिता तीस दिवस दिले आहेत. ते तीस दिवस न देता फक्त पंधरा दिवस द्यावे. या सर्व गोष्टींचा आपण ह्याच्यामध्ये उल्लेख करावा अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय......

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आम्हालाही या विषयावर समर्थनार्थ बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, या चांगल्या जाहिरनाम्याच्या संदर्भामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या अनंत सुचना आल्या त्यापैकी एका सुचनेशी मी सहभागी आहे. फक्त शेवटच्या सुचनेमध्ये तीस दिवसांच्या ऐवजी पंधरा दिवस करणेत यावे. परंतु, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी या सभागृहात ह्या जाहिरनाम्याच्या संदर्भात वक्तव्य करताना. अशा स्वरूपाचे एक भयंकर चित्र निर्माण केले की, ह्या जाहिरनाम्यामध्ये फार मोठी कोणाची तरी एक मोठी गल्लत होत आहे. महापालिका काहीतरी फार मोठे चुकीचे करत आहे, असे नाही. मा. महापौर साहेब आपण या प्रारूपाच्या सुरूवातीचे जर भाष्य पाहिले तर खरोखरच अत्यंत चांगले वाटत आहे चांगले अशासाठी वाटत आहे की, अत्यंत समर्पकपणे ह्याच्यामध्ये शब्दरचना करण्यात आलेली आहे. एवढे चांगले शब्द या जाहिरनाम्यामध्ये वापरलेले आहेत. भूमिका स्पष्ट आहे की, या शहराचे प्रशासन अत्यंत चांगले होउन या प्रशासनाला शासकीय पुरस्कार मिळाला पाहिजे. केंद्र सरकारची बक्षिसे मिळायला पाहिजे. अशा स्वरूपाचे धोरण यांच्यामध्ये व्यक्त झालेले आहे म्हणून मी ज्या मंडळीने अत्यंत परिश्रम पूर्वक जाहिरनामा तयार केला त्यांना धन्यवाद देतो. त्यांचे मी मुद्दामून शब्द वाचून दाखवतोय की सक्षमपणे, समर्थपणे, नियोजनबद्धरित्या, विनासायास, सुटसुटीत आणि त्याच्यामध्ये आपण एक शब्द वापरलेला आहे की, कामाचा विडा उचलणारा व फडसा पाडणारा आहे. परंतु, हे होताना मा. महापौर साहेबा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी ज्या काही सुचना मांडल्या आम्ही त्या सगळ्याच कन्डम करणार नाही. परंतु, हा जाहिरनामा अत्यंत नियोजनबद्धरित्या तयार केलेला आहे. त्याठिकाणी तासांचा उल्लेख केलेला आहे. ४८ तास, ३६ तास, हा बरोबर आहे. त्यांची जी सुचना आहे त्या सुचनेशी आम्ही सहमत नाही, की तात्काळ करावा, लगेच करावा. या अशा शब्दांची या सभागृहाला काही आवश्यकता वाटत नाही. जो जाहिरनामा दिलेला आहे तो शब्दशः बरोबर आहे म्हणून......

**मिलन म्हात्रे :-**

ही नागरिकांची समस्या आहे. नागरिकांना ह्याची आवश्यकता आहे तुम्हाला नाही. आम्ही नागरिकांच्या बाजूने बोललो आहोत.

**लिओ कोलासो :-**

या जाहिरनाम्याला आमच्या सर्वांचे समर्थन आहे. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

हे प्रशासन असेच चालले आहे. म्हणून व्यवहारपुर्ण हा शब्द लिहिलेला आहे. व्यवहाराबद्दल आपण काय बोललो नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण जेव्हा बोलत होते तेव्हा सभागृह शांत बसून आपले ऐकत होते. तेव्हा आपण तशी हिंम्मत आणि धैर्य ठेवा की, दुसरे सन्मा. सदस्य बोलत असताना आपणही शांतपणे ऐकून घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, प्रकरण क्र. २ नागरिकांच्या जाहिरनाम्याला मंजुरी देणेबाबत.

**रतन पाटील :-**

मा. महापौर साहेबा, अगोदर बोलायला मी उठलो होतो त्याच्या नंतर ह्यांना बोलायला द्या. मी बोलायला उठलो आहे त्यांना आपण बसवा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा आपले आणि त्याचप्रमाणे सन्मा. आयुक्त साहेब आपले दोघांचे मी याठिकाणी खरोखरच अभिनंदन करतो व धन्यवाद देतो की, आपण खरोखरच याठिकाणी प्रशासनाचा कारभार कसा निटनेटकेपणे सुरू आहे. स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासन देण्याचे काम याठिकाणी आपण केलेले आहे आणि नागरिकांना.......

**रतन पाटील :-**

मॅडम, मी अगोदर परवानगी मागितली होती आणि आपल्याला त्यांचे बोट दिसले आणि माझा हात दिसला नाही का?

**जेन्वी आल्मेडा :-**

ते बोलत आहे ना. तर आपण बसा.

**शुभांगी नाईक :-**

बसा कशाला? पहिल्यांदा बोलायला उभे राहिले होते तेव्हा मॅडमनीच त्यांना बसायला सांगितले होते. आपण असे कसे म्हणता? ते बोलायला उभे राहिले होते ना. तर बसा, का म्हणून बसायचे? न्याय द्यायचा तर सगळ्यांना सारखाच न्याय द्या ना. एकाला बसवता आणि एकाला उठवता.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, आपण सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांना बसवले होते.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) ते बोलत आहे त्यामुळे तुम्ही उभे राहायची गरज नाही असे मला वाटते. काका आता तरी आग लावणे बोलणे बंद करा.

**आसिफ शेख :-**

महापौरांनी मला परवानगी दिलेली आहे. कृपया आपण खाली बसावे.

**मा. महापौर :-**

त्यांचे बोलणे झाल्यानंतर आपल्याला संधी देते. आपण बसून घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम आपण सभागृहाचे कामकाज हेतू पुरस्कार बिघडवत आहात.

**आसिफ शेख :-**

सभागृहाचे कामकाज सकाळ पासून तुम्हीच बिघडवण्याचा प्रयत्न केला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) आपण सभागृहाचा वेळ वाया घालवता. आपण बसून घ्या. त्याच्यानंतर ते बोलतील.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, हा विषय आपण या ठिकाणी ज्या पोटतिडकीने आणला त्याबद्दल मी आपला आणि सन्मा. आयुक्त साहेब ह्यांना धन्यवाद देतो की, खरोखरच चांगला विषय आपण याठिकाणी आणलेला आहे. नागरिकांच्या तक्रारी तातडीने, सक्षमपणे, प्रभावीपणे सोडवण्यात यासाठी आपले प्रशासन चांगले काम करित आहे आणि आपण जो जाहिरनामा याठिकाणी सभागृहापुढे विषयपटलावर विषय आणलेला आहे खरोखरच एक चांगले काम आपण लोकांसमोर मांडणार आहोत आणि संबंधित जेवढे विभाग आपल्याकडे आहेत तर सर्व विभागाच्या विभाग प्रमुखांना आपण जो अवधी दिलेला आहे की लोकांच्या ज्या तक्रारी आल्या त्या तक्रारी अमुक अमुक अवधीमध्ये आपण ती पूर्ण करायला पाहिजे. ह्याच्या उपर मला वाटत नाही अजून काय पाहिजे. आपण स्पष्ट आणि पारदर्शक असा जाहिरनामा तयार केलेला आहे आणि त्याउपर मला वाटत नाही की, कोणत्याही सुचना ॲड कराव्यात. खरोखरच याठिकाणी आपण चांगला निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देतो. फक्त एकच सुचना याठिकाणी करतो की, संबंधित जे विभाग प्रमुख आहेत त्या विभाग प्रमुखांना जो अवधी दिलेला आहे. त्या अवधीप्रमाणे आपण काटेकोर आणि तंतोतंतपणे पालन करायला पाहिजे. नागरिकांना चांगल्या पद्धतीने आपल्याला येथून पुढे सेवा द्यायची आहे. चांगला जाहिरनामा याठिकाणी आणल्याबद्दल पुन्हा एकदा आयुक्त साहेब आणि मा. महापौर साहेबा ह्यांना धन्यवाद देतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, सार्वजनिक विद्यूत व्यवस्था म्हणून महापालिकेने कार्यपद्धतीनुसार सदर कामासाठी सात महिन्याचा कालावधी लागेल अशा पद्धतीने दिलेले आहे. तर एवढ्या सात महिन्याचा कालावधी न करता त्याला कमीत कमी तीन महिन्याचा कालावधी करावा. जेणेकरून मिरा भाईंदरमध्ये आज सर्व विभागामध्ये विभाग वाढत आहेत. पण सात महिन्याच्या कालावधीमध्ये तिथे किती अंधारात आहात. आज जिथे तिथे महापालिकेचे डी.पी. रोड झालेले आहे. त्याला सात महिन्याचा कालावधी लागणार तोपर्यंत त्या संपूर्ण रस्त्यावर अंधारच राहिल का? सात महिन्याची जी कालमर्यादा आहे ती तीन महिने करावी. आपण समजू शकतो त्याला वेळ लागतो. मी म्हणेन एक महिन्याचा कालावधी पाहिजे. पण तीन महिन्याचा कालावधी करावा. अशी मी सुचना करतो. त्याचबरोबर सार्वजनिक जागेतील रस्त्यावरील दिवा बंद असणे किंवा बिघडल्यामुळे आज मिरा भाईंदर मध्ये बऱ्याचशा जागेवर दिवे बिघडलेले आहेत. महापालिकेने ते पाहण्यासाठी काही कर्मचारी नेमले आहेत पण पंधरा पंधरा दिवस तिथे ते कर्मचारी जात नाही. पाहणी करत नाही आणि महापालिकेच्या बिलामध्ये रिपेरिंग केले नाही तर रिलायन्स कंपनी त्याचे बिल घेणारच आहे. म्हणून आपल्याला मी एक सुचना मांडतो की, त्वरीत आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत असे बंद झालेले दिवे किंवा स्ट्रीट लाईट शोधून त्वरीत दोन दिवसाच्या आत चालू करण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे. मा. आयुक्तांनी चांगला जाहिरनामा आज मा. महासभेमध्ये आणलेला आहे. त्याचे आम्ही निश्चितच स्वागत करत आहोत. पण त्याचबरोबर सदर जाहिरनाम्या संदर्भात ज्या पद्धतीने आपण दिलेले आहे. त्यापद्धतीने व्यवस्थित चांगली कार्यवाही सुद्धा जर कुठलाही अधिकारी कामामध्ये निश्चितच हेळसांड करत असेल तर त्याच्यावर

कार्यवाही करण्याचा अधिकार सुद्धा मा. आयुक्तांनी आपल्याकडे ठेवावा आणि तशा पद्धतीने जनतेचा हा जो जाहिरनामा आहे तो निश्चितच चांगले आहे. मी आयुक्त साहेबांना परत एकदा धन्यवाद देतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमनी परमिशन दिल्याबद्दल धन्यवाद. मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आपणजो जाहिरनामा आम्हाला दिलेला आहे, नागरिकांना दिलेला आहे. साडे तीन वर्षानंतर नागरिकांसाठी एक चांगली सुविधा आपण उपलब्ध केल्याबद्दल आपले ही धन्यवाद. शेवटचा हेड आहे, महापालिका इमारती भाड्याने देणे. शाळा, इमारती, सांस्कृतीक हॉल वगैरे त्याच्या खाली आपण जे लिहिलेले आहे. अर्ज, टपाल स्विकारणे संबंधित पोच देणे. नविन कर आकारणी निर्धारण करणे. हे हेड त्याला उपलब्ध होतो की, दुसरा हेड पाहिजे होता की, प्रशासनासाची चुकी झाली आहे ते आपण बघा. आम्हाला हा हेड चुकीचा वाटतो महापालिका इमारती भाड्याने देणे. आपण महापालिकेच्या इमारती भाड्याने देत आहोत. त्याला हेड दुसरा पाहिजे होता आणि ह्याला हेड दुसरा पहिजे होता. आपण कर संकलनासाठी हेड द्यायला पाहिजे होता. ज्या कराबद्दल तुमच्या तक्रारी असतील या एवढ्यात भरा. हा हेडच दुसरा दिलेला आहे. मॅडम, तरीही दुरूस्ती करून घ्यावी आणि हेड काय आहे ते सभागृहाला कळवावे कर संकलनाबाबत आहे किंवा मालमत्ता कराबाबत आहे. प्रशासनाने ह्याच्यावर खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

मालमत्ता कर आकारणी.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, हॉलच्या संदर्भात खाली काय दिलेच नाही. भाड्याने देणेबाबत. किती दिवसात मिळेल, स्क्वेअर फिटचा भाव किती? हे आपल्याला नको पण किती दिवसात देणार ते तरी पाहिजे ना. जो हेड दिला आहे त्याच्या खाली काहीच नाही ना, किती दिवसात दिला जाईल, त्या पत्राचा विचार केला जाईल का, नाही असे.

**मा. महापौर :-**

सर्व मुद्दे अंतर्भुत आहेत.

**शशिकांत भोईर :-**

कसे काय अंतर्भूत आहेत? हॉलचे भाड्याने द्यायचे त्याबद्दल काहीच नाही.

**रोहीदास पाटील :-**

प्रभाग कार्यालयामध्ये हॉल मिळत आहे. तिकडेच मैदान हॉल प्रभाग कार्यालयातर्फे मिळते. तसा स्पष्ट उल्लेख नाही.

**शशिकांत भोईर :-**

ते प्रभाग कार्यालयाचे अधिकार आहेत की कोणाच्या अंडरमध्ये आहे ते काहीच नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी या जाहिरनाम्यामध्ये जी त्रुटी निर्दशनास आणून दिलेली आहे. त्याप्रमाणे त्याच्यामध्ये महापालिका इमारती भाड्याने देणे हा जो हेड दिलेला त्याऐवजी मालमत्ता कर आकारणीचे हेड त्याठिकाणी नमुद केले जाईल आणि शाळा, इमारती, सांस्कृतीक हॉलच्या बाबतीमध्ये ॲडीशनल नमुद केले जाईल.

**शशिकांत भोईर :-**

एक नंबर, दोन नंबर, तीन नंबर तेही निश्चित करा.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हॉल इमारती याचा ह्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख व्हायला पाहिजे. प्रभाग कार्यालयातूनच ते मिळत आहे. त्याचा उल्लेख असावा नाही तर, परत गफलत होईल. त्यात दुरूस्ती करून घ्या की, त्या त्या प्रभागातले हॉल, मैदान किंवा शाळेची इमारत ही त्या प्रभाग कार्यालयात मिळते.

**मा. महापौर :-**

त्या त्या क्षेत्राच्या प्रभाग कार्यालातूनच दिले जातील आणि सात दिवसात निर्णय घेतला जाईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते अतिशय चांगली अशी बाब आपण आणि आयुक्त साहेब ह्यांनी नागरिकांसाठी समोर आणली आहे. त्याबद्दल मी आपले विशेष कौतुक आणि आभार मानते. आजच्या नवशक्तीमध्ये सुद्धा एक अशी नोटीफिकेशन प्रसिद्ध झाली आहे की, समान कर प्रणाली बाबत आमचे शासन आणि आपले प्रशासन नागरिकांच्या सोयी आणि सुविधांसाठी जर इतकी महत्त्वाची पावलं उचलत असेल तर निश्चितपणे या सभागृहात बसलेल्या प्रत्येक नगरसेवकांचा आणि बाहेर उपस्थित असलेल्या नागरिकांचा रूढ अभिमानाने भरून येईल असे आपण यापुढे देखील नागरिकांच्या हिताची कामे ह्याच्यापुढे आणखीन जोराने करत रहाल अशी अपेक्षा आहे. मला त्याच्यामध्ये एकच सुचवायचे आहे की, पाणी पुरवठा विभागासाठी जे तुम्ही दिलेले आह त्याच्यामध्ये बऱ्याचदा लोकांचे मिटर बंद असतात आणि मीटर बंद असताना ते मीटर दुरुस्त करुन आपल्याकडे त्याचे अर्ज आलेले असतांनासुद्धा दोन-दोन, तीन-तीन महिने आपली पुन्हा सरासरी बिल दिली जातात. पण मीटर दुरूस्तीचे रिपोर्ट आपल्याकडे सादर केल्यानंतर आपण किती दिवसांनी

कार्यवाही करणार ह्याबद्दल कृपया त्याच्यामध्ये नोंद करावी. कारण आपण दिल्यानंतर ही त्यांना परत परत सरासरी बिल जात असतात. त्याचा उल्लेख ह्याच्यामध्ये करण्यात यावा ही माझी एक सुचना आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, आता ज्याठिकाणी महापलिका इमारती भाड्याने देण्याचा विषय आहे तिथे कर सांगितला आहे. त्यामध्ये अकरा नंबर जो आहे लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या पत्रांना उत्तर देणे. तीस दिवस मुदत दिलेली आहे. लोकप्रतिनिधींच्या पत्रांना उत्तर द्यावे अशी मुदत आठ दिवसाची करावी.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण ह्याच्यामध्ये कर विभागामध्ये फ्लॅट किंवा दुकान ट्रान्सफर करून घेतो. विकून झाल्यानंतर. त्याच्यामध्ये आपा ट्रान्सफर करून झाल्यानंतरही संगणकामध्ये फिड होत नाही आणि पुढच्यावर्षी परत मागच्या नावावर येते. ते त्याच दिवशी फिडींग व्हायला पाहिजे अशापद्धतीने काम करावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पाणी पुरवठा विभागामध्ये आपण पाणी मीटर लावणे आणि पाणी मिटर दुरूस्त करून मिटरप्रमाणे बिल पाठविणे. या पाणी मीटर विभागामध्ये आपण कार्यशाळा दाखवलेली नाही. म्हणजे मीटर लावायचे नाही असे म्हणणे आहे का? कारण कार्यशाळा असली तर मीटर दुरूस्ती होणार आहे. त्यामध्ये एक हेड आला पाहिजे की, कार्यशाळा आपण लवकरच उघडणार आहे, मीटर दुरूस्तीची. त्याची ही नोंद झाली पाहिजे. ते मीटर तपासणी करून किंवा दुरूस्ती करून त्याचा रिपोर्ट सात दिवसात दिला पाहिजे. कारण हा पाण्याचा मोठा विषय आहे. त्यामध्ये उल्लेख झालेला नाही. पाणी डिपार्टमेंटमध्ये आपण जे मीटर लावणार आहोत किंवा आपले नागरिक जे मीटर लावतात त्यांना दुरुस्ती करुन त्याच्या रिपोर्ट सात दिवसात दिला पाहिजे. तरी आपल्याकडे तशी कार्यशाळा नाही. आज नाही तर उद्या आपण कार्यशाळा उघडणार आहोत. तरी त्याचा उल्लेख हा झाला पाहिजे ना? ह्या सर्व गोष्टी चांगल्या आहेत. पण महापालिकेच्या अधिनियमामध्ये स्पष्ट नोंद आहे की, जे जे कार्य ज्या ज्या डिपार्टमेंटचे ज्या ज्या कालावधीमध्ये करायचे आहे. त्याची नोंद त्या कार्यालयाच्या समोर तळ पटलावर असली पाहिजे. आपण हा जाहिरनामा तयार केलेला आहे. मा. महासभेने या ८५ लोकांनी ह्याला संमती दिलेली आहे. पण नागरिकांना ह्याची माहिती होत नाही. म्हणून हा अख्खा जाहिरनामा आपण एक महापालिकेच्या कार्यालयापुढे किंवा संबंधित खात्याच्या समोर लावा. त्यामुळे अधिकाऱ्यांना माहित पडेल की, मला असे काम चार दिवसात मिळणार आहे. नाहीतर, फक्त प्रस्तावना झाली. जाहिरनामा पास झाला, ८५ लोकांना माहित पडले. अशी गोष्ट म्हणजे जाहिरनामा पाहिजे, जाहिरनामा मंजूर झाल्यानंतर त्याची संबंधित खात्यामध्ये ठळक बोर्ड आणि महापालिकेच्या मुख्य कार्यालयात त्याची नोंद झाली पाहिजे. ही आपण नोंद घ्यावी.

**प्रभात पाटील :-**

या जाहिरनाम्यामध्ये महिला बालकल्याण कार्यक्रम अगदी ब्लँक ठेवला आहे तिथे आपल्याला काय कार्यक्रम नाही का? साहेब, आपल्या काही योजनाच नाही का?

**मा. आयुक्त :-**

ते हेडींग आहे.

**प्रभात पाटील :-**

पण त्याच्यामध्ये महिला बालकल्याण अंतर्गत महिला व बालकल्याण ह्यांच्याबाबत काहीही सुद्धा नाही. म्हणजे बरेचसे कार्यक्रम महिला व बालकल्याण योजनेसाठी आहे. बरेचसे आपल्याकडे प्रशिक्षणार्थी येतात. लाभार्थी येतात. त्याची पुर्तता आपण किती दिवसात करणार किंवा काय? त्या गोष्टींचा कुठे काहीसुद्धा उल्लेख नाही. म्हणजे अगदी तो हेड आपण कोरे ठेवले आहे असे झाले आहे. झोपडपट्टीच्या बाबतीत त्याच्यामध्ये आहे ते तुम्ही लिहीले आहे. परंतु, मी या विभागा संदर्भामध्ये बरेचशी कार्यप्रणाली आहे.

**मा. महापौर :-**

पत्रव्यवहार झाल्यापासून सात दिवसाच्या आतमध्ये....

**मा. आयुक्त :-**

महिला बालकल्याण ही हेडींग आहे आणि त्याच्याखाली अ आणि ब असे नमुद केलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, त्याच्यामध्ये ज्या विविध योजना आहेत त्याचा पर्टीक्यूलरली उल्लेख केला असता तर बरे वाटले असते. आता असे वाटते की आपण तिथे निल ठेवले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, मा. महापौर मॅडम ह्याच्यामध्ये दिले आहे की सार्व. बांधकाम विभाग किरकोळ दुरूस्ती म्हणजे काय येईल? कारण की, माझ्या प्रभागामध्ये कमीत कमी २५ ते ३० झाकणं चोरीला गेलेली आहेत आणि त्याचे मी दोन महिन्या अगोदर पत्र दिलेले आहे तरी अजून त्याच्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही. तसेच आरोग्य विभागात असे दिलेले आहे की, गटारे उघडी व तुंबणे, भरून वाहणे ते एकदिवसात काम केले जाते आणि कचरा साफसफाई सोमवार ते शुक्रवार. तर आजही आमच्या जय

अंबे प्रभागामध्ये इंडस्ट्रीमध्ये कचऱ्याच्या ढिगा पडलेल्या आहेत. म्हणजे आपण ह्याच्यामध्ये फक्त टाईम पिरियड दिलेला आहे तो असाच.

**मा. आयुक्त :-**

असे होणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

जी उघडी गटारे आहेत. ज्याची झाकणं चोरीला गेलेली आहेत. ती किती दिवसात बसवून देणार? आम्ही ह्याचे पत्र देउन दोन महिने झाले आहे.

**मा. आयुक्त :-**

झाकणांच्या बाबतीत उपलब्धतेवर जास्त अवलंबून आहे कारण त्याला तयार व्हायला वेळ लागतो

**प्रेमनाथ पाटील :-**

पत्र देउन दोन महिने झाले आहेत. झाकणे बनवायला वेळ लागतो ही खरी गोष्ट आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण असे ग्राह्या धरत नाही की, झाकणं चोरीला जाईल म्हणून आपण ते.......

**प्रेमनाथ पाटील :-**

आता आपण सी.सी. ची झाकणं बनवलेली आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपल्या सुचनेप्रमाणे जर त्याच्यामध्ये काय सुधारणा करता येत असेल तर आपण नक्की करू या.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, मॅडम ह्याच्यामध्ये शिक्षण विभागाचा काय उल्लेख नाही. त्यांना कधी कुठल्याही पत्राचे उत्तर देण्याची गरज नाही असे आहे का?

**मा. आयुक्त :-**

शिक्षण विभागाचा उल्लेख केला जाईल.

**मुक्ता रांजणकर :-**

कुठल्या पानावर?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या मुक्ता रांजणकर शिक्षण विभाग या जाहिरनाम्यामध्ये अंतर्भूत केला जाईल. आपल्या शिक्षण विभागाबाबत ज्या सुचना असतील त्या सुचना मांडाव्यात.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, अंतर्भूत करावे आणि ते किती दिवसात उत्तर देतील तेही नमुद करावे.

**मा. आयुक्त :-**

ते नमुद करणार. इतर विभागांना जसे आपण समाविष्ट करून घेतले आहे त्याप्रमाणे शिक्षण विभागालाही समाविष्ट केले जाईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मॅडम, शेवटच्या पानावर दिलेले आहे. उद्यान व वृक्षप्राधिकरण....

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस आपल्या सुचना मांडा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, नागरिकांच्या जाहिरनामाच्या बद्दल प्रशासनाला सन्मा. सभागृहाने धन्यवाद दिलेलाच आहे. तीन ठिकाणी मी दुरूस्ती सुचवित आहे. सन्मा. सदस्यांनी प्रशासनाला पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांना उत्तर देण्याचा जो अवधी आहे तो सात दिवसाचा करावा आणि जाहिरनाम्यामध्ये बंद मिटरच्या बाबतीमध्ये कुठेही उल्लेख नव्हता. तर बंद मिटरच्या बाबतीमध्ये एक स्पेसिफीक पंधरा दिवसाचा अवधी आपण त्यावर कार्यवाही करण्यासाठी द्यावा आणि जाहिरनाम्याच्या शेवटच्या पेजवर सर्व प्रकारचे दाखले व परवाने ह्याच्यामध्ये तीस दिवसाचा जो अवधी दिला होता त्याच्या जागी पंधरा दिवस करावा. अशा तीन ज्या अत्यावश्यक दुरूस्त्या आहेत त्या ह्या जाहिरनाम्यामध्ये अंतर्भूत करून घ्याव्यात आणि त्याप्रमाणे सदर जाहिरनाम्यांचा ठराव प्रकरण क्र. ०२....

**मदन उदितनारायण सिंग :-**

सन्मा. सभागृह नेते, माझी एक सुचना आहे. मा. महापौर मॅडम, उद्यान व वृक्षप्राधिकरण मे दिया है। महानगरपालिका रस्त्यावरील धोकादायक सुकलेली वाकलेली झाडे जर ती झाडे धोकादायक असतील तरी साठ दिवस थांबायचे का? अवधी साठ दिवस दिला आहे. धोकादायक असेल तरी साठ दिवस थांबायचे का?

**मा. महापौर :-**

धोकादायक वृक्षाबद्दल सुचना आल्यानंतर त्वरीत ती पाहणी करून लगेच काढण्यात यावी.

**रोहीदास पाटील :-**

साहेब, आम्ही अतिक्रमणाच्या अधिकाऱ्याकडे गेलो ते बोलले की, आमच्याकडे खाते नाही. आरोग्याकडे गेलो तर खाते बदललेले असते. ह्याचा उल्लेख कसा करायचा ते योग्य शब्द वापरून ते बंधनकारक करा. त्याची माहिती नगरसेवकाला, नागरिकाला मिळाली पाहिजे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग आहे. त्याच्यामध्ये ७ नं. च्या मृतजनावरांची विल्हेवाट. साहेब, मृत जनावरांची विल्हेवाट २४ तास जर एखादे जनावर किंवा कुत्रा मेलेला रस्त्यावर दिसले तर त्या कुत्र्याची २४ तासात काय हालत होईल.

**मिलन म्हात्रे :-**

व्यवस्थित केले. सरांनी सांगितलेले बरोबर केले अगदी त्वरीत बोलायचे नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याकडे एखादा नागरिक येतो. तर त्याच्यासाठी चौकशी कक्ष द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

चांगले अधिकाऱ्याने चांगले बोलायचे. त्वरित करायचे नाही. सर बोललेले आहेत.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, मेलेल्या कुत्र्यांची विल्हेवाट आपण टाकलेल्या कुत्र्यांचे काय झाले? जीवंत असलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करायला पाहिजे.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मुक्ता रांजणकर :-**

सदर ठरावाला माझ अनुमोदन आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ह्या गोष्टीला माझे अनुमोदन आहे. पण मला एकच सांगायचे आहे की, ह्या सर्व गोष्टी हेड केलेल्या आहे. याठिकाणी एखादा बाहेरुन येणारा नागरिक त्याच्यासाठी चौकशी करण्यासाठी एक चौकशी कक्ष नेमावा. कारण जेणे करून ह्याठिकाणी एखादी व्यक्ती रिक्षाला किंवा ट्रकला खर्च करून येतो आणि कुठले खाते कुठे आहे. कॅश डिपॉझीट कुठे आहे. वसुली डिपार्टमेंट कुठे आहे. सर्व इन्क्वायरीसाठी जेव्हा तो व्यक्ती येतो तेव्हा तो येवून परत जातो. वसुलीचे काही लोक पैसे भरण्यासाठी तसेच ज्यांनी जास्त पैसे भरलेले आहेत येतात. सगळ्या गोच्या आहेत. वसुलीचा फार अर्थ आहे. त्यासाठी आपण एक कक्ष नेमावा. असे ह्याच्यात नोंद करून घ्या.

**मा. महापौर :-**

नागरिकाचा जाहिरनामा नविन महानगरपालिकेत नागरिकांची कुठल्याही प्रकारे अडचण किंवा गैरसोय होवू नये म्हणून प्रशासन तसेच मा. महासभेपूढे हा विषय आणून पारदर्शकता, गतिमानता येण्यासाठी नागरिकांची सोय, सुविधा, कामे तत्परतेने होण्याच्या दृष्टीने नागरिकांचा जाहिरनामा तयार करण्यांत आलेला तसेच सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सुचना तसेच पाणीपूरवठा नलिका फुटल्यानंतर त्वरित दुरूस्त करणे पाण्याचे नमुने आरोग्याच्या दृष्टीने २ ते ३ दिवस तपासणीसाठी न लावता ते ही त्वरित हे प्रकरण निकाली काढण्यात यावे. मुख्य पाण्याच्या लाईन फुटल्यानंतर तक्रार आल्यापासून किंवा क्षेत्रिय अधिकाऱ्याने पाहणी केल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यावेळी काम त्वरित करण्यात यावे. बंद मिटरच्या बाबतीत बंद मिटरची तक्रार आली किंवा एखाद्या सदस्याने तक्रार केली, नागरिकांनी तक्रार केली किंवा प्रशासनाला तसे आढळून आल्यास बंद मिटर सुद्धा लवकरात लवकर दुरूस्त करून ते ही निकाली काढण्यात यावे. रस्त्यावरिल अतिक्रमण त्वरित एक दिवसांत किंवा तक्रार आल्यानंतर हालविण्यात यावे. रस्त्यावरिल धोकादायक वृक्ष, झाडे आपल्या पाहणीत आल्यानंतर नागरिकांनी तक्रार केल्यानंतर ही त्वरित अतिक्रमणाने ते झाडे लवकरात लवकर झाडे काढण्यात यावी. करामध्ये असलेल्या त्रूटी व नागरिकांच्या आलेल्या तक्रारी या लगेच नमुद करून संगणकावर फिडिंग करून त्याची नोंद घेवून त्याच्यामध्ये बदल करून योग्य तो नागरिकांना न्याय देण्यात यावा. तसेच महानगरपालिकेच्या आवारात ४ ठिकाणी हा जाहिरनामा डिजिटल व्दारे प्रसिद्ध केला जाईल आणि पूर्ण शहरभर ह्या जाहिरनाम्याची प्रसिद्धी होण्यासाठी प्रभाग कार्यालयात याची प्रसिद्धी करण्यासाठी माध्यमाव्दारे प्रसिद्धी करण्यात येईल. तसेच मुख्य सूचना म्हणजे बाहेरून येणाऱ्या नागरिकांना महानगरपालिकेत कुठल्या विभागात एखाद्या खात्यात काम असेल तर त्याच्यासाठी चौकशी कक्ष जनसंपर्क कार्यालय उभारण्यात यावा. अशा प्रकारे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रगतीचा विकास लक्षात घेता जाहिरनामा ही आवश्यक गरज असून, हा जाहिरनामा केवळ नगरसेवकांचे सहकार्य जर ह्यांच्याकडे असेल तर प्रशासनाची सुद्धा ह्याच्यात फार मोठी जबाबदारी आहे. जर नगरसेवक एखादी तक्रार निदर्शनास आणतात. तेव्हा अधिकाऱ्याने त्याच्यावर त्वरित कारवाई करण्यासाठी त्यांना सहकार्य करायला पाहिजे. कारण हे शहर पुर्ण टॅक्समधुन कर विभागाच्या ह्याच्यातुनच आपल्या मिरा भाईंदर शहराचा विकास होत असतो आणि ह्याच्यामध्ये मुख्य हे आरसे आहेत. ते नगरसेवक नागरिक आणि प्रशासन ह्या तिघांनी मिळून ह्या जबाबदाऱ्या

उचलल्या पाहिजेत आणि ह्याच्यासाठी हा जाहिरनामा आम्ही जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध करत आहोत. हा ठराव सर्वानूमते मंजुर. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ०२ :-**

नागरीकांचा जाहिरनामा मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका ही नव्याने स्थापन झालेली आहे. नव्याने स्थापन झाल्याने शहरातील नागरीकांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत. नागरिकांच्या दैनंदिन गरजा, अडचणी, प्रभावीपणे सोडविण्यासाठी महानगरपालिकेने माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे महानगरपालिकेचे मुळ नियम, उपविधी शासनाकडून वेळोवळी मार्गदर्शक तत्वे या बाबती विचारात घेऊन तसेच नागरीकांच्या अडचणी समयबद्ध वेळात निकाली काढण्यासाठी प्रशासनात पारदर्शकता, गतिमानता येण्यासाठी, नागरीकांच्या सोयी, सुविधा, कामे तत्परतेने होण्याच्या दृष्टीने नागरीकांचा जाहिरनामा तयार केलेला आहे. याबाबत सभागृहात चर्चा होऊन नगरसेवकांनी सुचविलेलया दुरुस्त्यांसह नागरीकांचा जाहिरनामा तयार करणेंत येऊन सदर ''जाहिरनाम्याची अंमलबजावणी'' प्रभावीपणे करणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे. याबाबत प्रशासनाने लवकरात लवकर जाहिरात देऊन जाहिरनाम्याची तातडीने अंमलबजावणी करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- सौ. मुक्ता रांजणकर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०३ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहीदास पाटील :-**

ह्याची सविस्तर टिपणी निदर्शनास कोणी आणली ह्याची माहिती सभागृहाला यायला पाहिजे. प्रशासन हे प्रशासन राहते. हे सभागृह अशाच पद्धतीने चालत राहणार. वर्षानुवर्षे हे जरी सदस्य गेले, सर्व अधिकारी गेले तरी या सभागृहाची एक शान आहे. या सभागृहात त्यावेळी पारित केलेला ठराव तो नियम बाह्य होता. हे कोणी लक्षात आणले. कधी लक्षात आणले किंवा त्या पद्धतीने पारित करावा. असा कोणी मांडला होता. ह्याची चर्चा व्हायला पाहिजे. त्याचा खुलासा व्हायला पाहिजे. एकदा, दोनदा, तिनदा किती शहराची अब्रू घालवायची आहे. आजचा महाराष्ट्र टाईम्स पेपर वाचा. आजच्या महाराष्ट्र टाईम्स पेपरमध्ये काय आलेले आहे ते तुम्ही वाचा ह्या शहरात नुसता रंग लावून शहराबद्दल लोक चांगले बोलणार नाही, शहराच्या कामकाजाबद्दल आपल्या नितीमत्तेबद्दल. आपली नितीमत्ता एकदम ढासळत चाललेली आहे. आपण बहुमताच्या जोरावर हे ठराव करतो, याचा हा परिणाम आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, २२ जानेवारी मध्ये प्रशासनाला माझ्याकडून पत्र प्राप्त झालेले सचिव साहेबांकडे असेल. आपणाला सुद्धा आम्ही पत्र दिले होते आणि सदर विषय आगामी एप्रिलच्या सभेसाठी घ्यावा. असा मी त्यावेळेला आपल्याकडे विनंतीपत्र दिलेले होते.

**रोहीदास पाटील :-**

बोर्जीस साहेब, तुमच्या विषयी घेण्याबद्दल आमची तक्रार नाही. ह्या समित्या बेकायदेशीर नियम बाह्य इतके दिवस चालले. त्याचे कामकाज त्याच्यावर झालेला खर्च ह्याला जबाबदार कोण आहे. की, त्या दिवसाची सभा सुचक अनुमोदक की, ज्यांना ते अधिकार होते ते अधिकारी हे काय आहे? ह्याच्यावर काही व्हायला पाहिजे की नाही. मोहन पाटील साहेब, तुम्ही आता ए.जी. चा रिपोर्ट वाचला ना. ज्यावेळी तुम्ही असे जबरदस्ती करून घेतात ना. तेव्हा ते अधिकारी कसे रखडतात ते त्यांना माहिती पडते. आम्ही नेहमी सांगत असतो की, नियमानुसार करा. पण त्याचा अर्थ तुम्ही असा लावता की विरोधक विरोध करतात. तुम्हाला थांबायला धीर नसतो. जसे आता गुरूजींनी आता सांगितले की, तुम्ही प्रत्येक वेळी विडा उचलतात आणि मग विडा खाणात्याहून तुमची परिस्थिती होते. आजचा ही तोच प्रकार आहे. ज्यावेळी आम्ही चार समित्या करतो आणि ते झाले. तो तुम्ही विडा उचलला होता. ४ समिती ४ सभापती उभे करायचे आणि तुम्ही त्यांना तुम्हीच मागे घेतले. आम्ही नाही घेतले. अजुन त्याचा जवाब द्यायला लागेल की, त्या समितीच्या आस्थापनेच्या दिवसापासुन जो-जो काही कार्यक्रम चालला, त्या समितीवर झालेला खर्च जर ती समिती बेकायदेशीर होती तर त्यात खर्चाचाही प्रश्न येणार. त्याचे उत्तर ठेवा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सदरच्या समित्या स्थापन झाल्यानंतर विषय पटलावर ३० अन्वये समिती करायचा असा हा विषय होता आणि ह्या सभागृहामध्ये ३१ अन्वये ठराव संमत करुन घेतला. त्याच्यानंतर प्रशासनाने त्याबाबतीत आपल्याला सुचना दिल्या. ती समिती कार्यवाही करण्या अगोदर या ठरावामध्ये जे दोष होते. सन्मा. आयुक्त साहेबांनी ही बाब निदर्शनास आणली की, ३० अन्वये तुमचा विषयपटलावर विषय असतांना ३१ अन्वये ठराव आपण करू शकत नाही. हे आणल्यानंतर आपण त्या सभागृहामध्ये पून्हा तो विषय आणला. त्याला किमान ३ महिने असावे लागतात आणि त्यावेळी ह्या सन्मा. सभागृहामध्ये सर्व सदस्य याठिकाणी उपस्थित होते आणि त्यामुळे ३० अन्वये या ठरावात विषय असताना ३१ अन्वये ठराव होवू शकत नाही म्हणून त्या समित्या यापुढे कार्यान्वीत झालेल्या नाही आणि माझ्या माहितीप्रमाणे त्याच्यावर कोणताही खर्च झालेला नाही. म्हणून हा ठराव ह्या ठिकाणी आणलेला आहे आणि ह्याठिकाणी कोणताही हट्टात हा विषय नाही. सर्व लोकशाही पद्धतीने या ठिकाणी ठराव आणले जातात. आणि लोकशाही पद्धतीने ठराव सहमत केले जातात. कोणाच्या हट्टापूर्ती कोणाच्या हट्टाने ठराव होतात. असे जे वाक्य आहे आणि अशी संबोधन जे सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी केलेले आहे हे चूकीचे ह्या ठिकाणी वक्तव्य के लेले आहे. याठिकाणी मा. सभागृहामध्ये हा विषय आणलेला आहे. सभागृहाच्या बाहेर हा विषय झालेला नाही म्हणून आज ह्या ठिकाणी विषय आणलेला आहे. आणि त्या विषयाचा विषयाप्रमाणे त्या समिती विस्थापित करण्याचा ठराव या ठिकाणी सहमत झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या विषयावरती संपूर्ण पणे काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचे आपसातली मारामारी कारणीभूत आहे. काँग्रेस पक्षाला......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण बसून घ्या. आपल्याला बोलण्याची परमिशन दिलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही बोलणार.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम चा तुम्ही अपमान करत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

इथे मानच नाही तर अपमानाचा प्रश्न कुठे आहे. मान असते तर असे ठराव तुम्ही केले नसते.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेला सभागृहाच्या बाहेर काढा.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

सरकार आपल्या महानगरपालिकेच्या आर्थिक खर्चात पडलेली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इसका जवाब मा. उपमहापौर साहब देंगे तो अच्छा होगा।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडमचा अपमान करतात त्यांना माफी मागायला लावा.

**मिलन पाटील :-**

त्यांना ही सवय पडलेली आहे. दोन पक्षांमध्ये भांडण लावायची.

**मा. महापौर :-**

ज्या सदस्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध मांडून घेतला जाईल.

**मोहन पाटील :-**

एका वेळी सन्मा. सदस्यांनी असे बोलावे की, काँग्रेसच आणि ह्याच्यामध्ये अंतर्गत बाब झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जनतेला उत्तर काय देणार? तुमच्यामुळे महापालिका नुकसानात गेंली. पैशाचा अपवय केलात. आज वर्षभरात पैसे आलेले आहेत त्या पैशाबद्दल बोला.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

३ आदमी को संभाल नही पाये ये अपने महापालिका को क्या संभालेगा। मा. महापौर महोदय देखीए वो अपनी बात इस्तमाल काँग्रेस और.....

**मिलन म्हात्रे :-**

तुम तुम्हारा देखो। हमलोग लाचारी नही दिखाते तुम्हारी तरह।

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही मिलन म्हात्रेला माफी मागायला लावा.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही कशा बद्दल बोलता. ३ नगरसेवकाला सांभाळत नाही म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही आमचे शेठ आहोत. आमचा कोणीच शेठ नाही.

**आसिफ शेख :-**

त्यांनी त्यांच्या पक्षाची काळजी करावी.

(सभागृहात गोंधळ)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये कधी कधी अगदीच खालच्या शब्दाचा सन्मा. सदस्य उल्लंघन करतात. तरी त्यांचे ते शब्द इतिवृत्तांतामधून वगळून पुढील कामकाजास सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी वापरलेले अपशब्द कामकाजातुन वगळून टाकण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

वर्तमानपत्राच्या बातमीचे काय झाले?

**मा. महापौर :-**

तुम्हाला परमिशन न देता......

**मिलन म्हात्रे :-**

आजच्या वर्तमानपत्रात आलेली ही गोष्ट आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढच्या विषयाला सुरूवात करा.

**मिलन पाटील :-**

वर्तमानपत्रातील बातम्या सत्य असतात असे नाही.

**प्रकरण क्र. ०३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये दि. २०/०९/२००५ रोजी ठराव क्र. ४१ नुसार स्थापन केलेल्या विशेष समित्यांचे विसर्जन करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि. २०/०९/२००५ रोजी ठराव क्र. ४१ अन्वये विशेष समित्या स्थापन केलेल्या होत्या. सदर समित्या स्थापन करतांना मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विषयपत्रिकेवर विषय आलेला होता. परंतु, महासभेचा पारित केलेला ठराव व विषय हा विसंगत झाला असल्या कारणाने सदर विशेष समित्या स्थापन करणेंस तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. तरी सदर समित्या कलम ३० अन्वये विसर्जन कराव्या असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ४ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आपण इथे महाराष्ट्र प्रादेशिक नियम कलम ३०(२) जरा वाचून दाखवले तर बरं पडेल.

(नगरसचिवांनी कलम ३० चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

दोन तृतीअंश म्हणजे किती संख्या?

**नगरसचिव :-**

महापौर जेवढे सदस्य आहेत त्याचे दोन तृतीअंश....

**रतन पाटील :-**

किती संख्या किती? किती पाहिजे? ते आकडेवारी सांगा ना.

**नगरसचिव :-**

५६ होते.

**रतन पाटील :-**

५६ संख्या आहे का?

(नगरसचिवांनी कलम ३० चे पुन्हा वाचन केले.)

**नगरसचिव :-**

समित्यांचे कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले जाईल.

**रतन पाटील :-**

समित्याच झाल्या नाही. तर कामकाजाचे क्षेत्र आपण कसे निश्चित करायचे?

**नगरसचिव :-**

कामकाज आपण ह्यापुर्वी निश्चित केलले आहे.

**रतन पाटील :-**

म्हणजे असायलाच नाही पाहिजे समित्या कामकाज क्षेत्र रहावे.

**नगरसचिव :-**

कामकाज क्षेत्र आपण निश्चित केलेले आहे आणि आज समित्या ऐवजी करतो.

**रतन पाटील :-**

समित्या नेमण्यासाठी ह्याला संख्या लागत नाही का?

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, आज विषय पत्रिकेवर जो विषय आहे. हे दोन्ही विषय एकदम चमत्कारिक आहेत. स्वतः आपण विषयाचे वाचन करा. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत. तुम्ही प्रकरण २ म्हटलेले आहे. तुम्ही सगळेच त्याच्यात उपकलम लिहिले नाही ना? ३० अन्वये समित्या स्थापन, गठन करण्याचे म्हणता. तेव्हा......

**नगरसचिव :-**

आपल्या पालिका सदस्यामधुन महिला व विशेष समित्या नेमण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते लिहायला पाहिजे ना. जेव्हा संपूर्ण कलम ३० लिहीतात. तेव्हा तिथून सर्व कलम तुम्हाला लागू होतात.

**नगरसचिव :-**

ह्या समित्या एकप्रमाणे झालेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही कलम एकप्रमाणे म्हणा.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही काय करता? त्यांनी जी नावे घोषीत केली. तुम्ही समितीची घटना तयार करतात, समिती स्थापन करतात की नावे देवून त्यांच्या परत विषयांतर करणार आहात. नक्की काय घेणार आहात?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, कलम ३० अन्वये....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेब, यापूर्वी समितीचे विषय स्तुती गेल्यावेळेस जानेवारीच्या मिटींगमध्ये झालेले आहे.

**रोहीदास पाटील :-**

काय?

**मा. महापौर :-**

समिती घटीत होण्याच्या अगोदर कामकाजाच्या रूपरेषा सभागृहाला दिलेल्या आहेत. फक्त आता नावे डिक्लेअर करायची होती.

**रोहीदास पाटील :-**

काय?

**मा. महापौर :-**

३० प्रमाणे समितीची नावे सभासदांची डिक्लेअर करायची होती.

**रोहीदास पाटील :-**

वाचन करा की, त्यामध्ये ठरलेले असे-असे नाव आहे. ह्या समितीचा कालावधी एवढा आहे. सदस्य एवढे आहे. त्यात तुमच्या आवडीचे एवढे आहे. असे बोला ना. आमची काही तक्रार नाही. खेळीमेळीत सभागृह चालावे. आम्हाला काही विरोध नाही. पण त्याची कार्यप्रणाली तुम्ही नीट लिहून घेणार की नाही घेणार? सचिव साहेब, तुम्ही काय करता? कशासाठी करता? मा. आयुक्त साहेब, ह्या तुमच्या वृत्तीने महापौरांना तुम्ही उगाच बनवाबनवी करतात आणि शहराची अब्रू जाते. म्हणून मॅडम, मी तुम्हाला सांगितले होते की, जे शिक्षक आहेत ते चारही शिक्षक निट शिकवत नाही, ह्या मतावर बोललो होतो. तुम्ही पुन्हा बोलायची वेळ आणली. नियमानुसार नीट घ्या ना. ५ मिनिटे जातील ना. आपण जी तयारी केली होती त्याची संख्या एवढी आहे. मुदत एवढी आहे. त्यांचे अधिकार एवढे आहेत आणि त्याच्यासाठी ही समिती घटीत होते. त्याचे हे सदस्य आहेत. आम्ही कुठे नाही म्हणतो.

**मोहन पाटील :-**

ह्या पुर्वी ह्या ठरावामध्ये जे कार्यक्षेत्र मागच्या ठरावामध्ये २० केले. त्यांची अमाउन्ट ३ लाख रूपयाची. ती अमाउन्ट आहे आणि जे कार्यक्षेत्र नीट केले ते समाविष्ट करून घ्यावे.

**मा. महापौर :-**

ठराव बहूमताने मंजुर. सचिव साहेब, पुढील विषय घेण्यात यावे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये स्थापन करावयाच्या विशेष समित्यांवर पुढीलप्रमाणे सदस्यांची नांवे घोषित करण्यांत येत आहेत.

**समिती क्र. १** | **समितीचे नांव :- क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | सौ. अनिता जयवंत पाटील |
| २. | श्री. नितीन ठाकुर |
| ३. | सौ. ग्रिटा फॅरो |
| ४. | सौ. ज्युडी डिसोझा |
| ५. | सौ. उर्मिला भामरे |
| ६. | सौ. गिता जैन |
| ७. | सौ. उमा सपार |
| ८. | सौ. संगिता म्हात्रे |
| ९. | श्री. जयंत पाटील |

**समिती क्र. २** | **समितीचे नांव :- माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | सौ. हेलन गोविंद |
| २. | श्री. याकुब कुरेशी |
| ३. | सौ. जेन्वी आल्मेडा |
| ४. | श्री. मिलन पाटील |
| ५. | श्री. परशुराम म्हात्रे |
| ६. | सौ. रिटा शहा |
| ७. | सौ. मुक्ता रांजणकर |
| ८. | सौ. सुधा गोयंका |
| ९. | श्री. हंसुकुमार पांडे |

**समिती क्र. ३** | **समितीचे नांव :- आरोग्य परिरक्षण समिती**

| अ.क्र. | प्रस्तावित सदस्य |
|---|---|
| १. | श्री. रोहिदास आत्माराम पाटील |
| २. | श्री. महेंद्रसिंग चौहाण |
| ३. | श्री. सुर्यकांत भोईर |
| ४. | सौ. जयाबाई भोईर |
| ५. | श्री. ध्रुवकिशोर पाटील |

| | |
|---|---|
| ६. | सौ. सय्यद नुरजहॉं |
| ७. | ॲड. श्री. एस्. ए. खान |
| ८. | श्री. दिनेश नलावडे |
| ९. | श्री. चंद्रकांत मोदी |

| **समिती क्र. ४** | **समितीचे नांव :- गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती** |
|---|---|
| **अ.क्र.** | **प्रस्तावित सदस्य** |
| १. | श्री. चिंतामण पाटील |
| २. | श्री. रविंद्र माळी |
| ३. | सौ. ज्योत्स्ना हसनाळे |
| ४. | सौ. जिवी वाडे |
| ५. | श्री. हरेश गावंड |
| ६. | सौ. शानु गोहिल |
| ७. | सौ. लीला पाटील |
| ८. | श्री. अशोक पाटील |
| ९. | सौ. सुनिता पाटील |

याप्रमाणे सदस्यांच्या नावाच्या यादीसह विशेष समित्या स्थापन करणेबाबत ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०५ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सदस्य उठून उभे राहतात आणि बोलतात की, मला परवानगी द्या ना. तरी आपली परवानगी घ्यायला पाहिजे ना.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, मी तुमची परवानगी घेतलेली आहे. मला तुम्ही आधी बोलू द्या.

(सन्मा. सदस्या श्रीम. हेलन गोविंद यांनी पत्राचे वाचन केले.)

**हेलन गोविंद :-**

मला अजुनपर्यंत याचा खुलासा दिलेला नाही. आधी माझे उत्तर देवू द्या. नंतर तुम्ही बोला. मला अजुन उत्तर भेटल नाही. संबंधिताने ह्याचा खुलासा करावा. मला उत्तर भेटल्या शिवाय मी खाली बसणार नाही. आधी मला बोलू द्या.

**जेन्वी अल्मेडा :-**

सदस्या हेलन मॅडम उठलेल्या आहे. त्यांचे उत्तर दिल्यानंतर त्यांना बोलण्याची परवानगी द्यावी.

**जोजफ गोन्सालवीस :-**

पाली डोंगरी शाळेचा पण उल्लेख नाही. तर तो उल्लेख का नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या हेलन गोविंद मॅडम यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा संबंधित अधिकाऱ्याने करावा.

**जोजफ गोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, पाली डोंगरी शाळेचा पण उल्लेख केलेला नाही. मी हा प्रश्न गेल्या सभेला सुद्धा उपस्थित केला होता. तिथे आता पावसाळ्यात मुले बसु शकणार नाही. एवढे तिथे गळती वगैरे झाले खाली गेले. हे सगळ असताना ह्याच्यामध्ये उल्लेख नाही. तरी सर्व्हे झाला नाही का? त्यांनी आम्हाला उत्तर द्यावे.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आढावा तक्त्यामध्ये नमुद करायचे राहून गेले. मात्र सर्वेक्षणामध्ये चौक शाळा घेतलेली आहे. तिथे १ लॅब प्रस्तावित केलेली आहे. १२९ पट संख्या आहे वर्ग उपलब्ध आहेत. लॅबसाठी प्रस्तावित केलेले आहे.

**हेलन गोविंद :-**

वर्गाचा उल्लेख कुठे आहे? वर्गामध्ये की शाळामध्ये तिथे वर्ग उपलब्ध नाही. आम्हाला नविन वर्ग बांधावे लागेल कारण त्या शाळेमध्ये मुले बसतात. उत्तन, पाली, चौक आणि डोंगरी या सर्वांचा उल्लेख सुद्धा ठरावामध्ये करा.

**जोजफ गोन्सालवीस :-**

साहेब, पाली, डोंगरी शाळेचा उल्लेख आहे का? ह्याच्यामध्ये उल्लेख नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, यामध्ये मिरा भाईंदर महापालिकेच्या मालकीच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कॉम्प्युटराईज एज्युकेशन देण्यासाठी हा प्रस्ताव आहे.

**हेलन गोविंद :-**

मी बोलते ना. त्यांना सांगितले ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

या प्रस्तावामध्ये दोन बाबी आहेत.

**हेलन गोविंद :-**

सांगितले ना पाली, उत्तन, चौक ह्या शाळांचा उल्लेख ......

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्ही कशाला बोलता? मॅडम, बसवतीलच. त्याच्यात तसदी कशाला घेता.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, मी उठली ना. आता त्यांना खाली बसायला सांगा. मी तुमच्या आधी परमिशन घेतलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, हा प्रश्न माझा पण आहे. जरा उत्तर देऊ द्या ना. तर त्याच्यात माझा उल्लेख पण समाविष्ट करा ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

या प्रस्तावामध्ये दोन बाबी आहेत. आपल्या शहरातील सर्व शाळेमध्ये एका पध्दतीने कॉम्प्युटरायझेशन फॅसिलीटी एज्युकेशन उपलब्ध करणे त्यासाठी कोणताही प्रशासकीय खर्च आपण न करता दर्जेदार संस्थेकडून निविदा मागवून सदरची शिक्षण पध्दती कार्यन्वित करणे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुसुविधा, लॅब्स, ज्या शाळेमध्ये रुम ॲवेलेबल नाही अशा बाबतचा बांधकाम विभागापासून अभिप्राय घेऊन ज्या शाळेमध्ये सरप्लस रुम नाही अशा शाळेचा हा प्रस्ताव आहे. त्याठिकाणी हे रुम बांधून त्या फॅसिलिटी कार्यन्वित केले जाणार आहे.

**हेलन गोविंद :-**

आमच्याकडे रुमसाठी भरपूर मोकळी जागा आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही अर्ज देणार आहोत.

**हेलन गोविंद :-**

असे असतानासुध्दा आमची शाळा बदलण्यात आली. तुम्ही सर्व शाळेचा सर्व्हे केलेला आहे. मग आमच्या उत्तन, पाली, चौक शाळेचा उल्लेख का केलेला नाही?

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासन चांगले चाललेले आहे.

**हेलन गोविंद :-**

उत्तन, पाली, चौक, डोंगरी या चार शाळांचा का उल्लेख केलेला नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

पूर्ण शाळांमध्ये संगणक एज्युकेशन प्रणाली आपणाला कार्यान्वीत करावयाचे आहे. ज्या शाळेमध्ये सदर कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. काही अडचणी आहेत.

**हेलन गोविंद :-**

कुठल्या जागा उपलब्ध नाहीत. कुठल्या शाळचे तुम्ही बोलता. तुम्ही आमच्या शाळेमध्ये जाऊन या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

त्याचा सविस्तर सर्व्हे केलेला आहे आणि ज्या शाळेमध्ये तशी फॅसेलिटी उपलब्ध करण्यासाठी अडचणी आहेत. अशाचा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केलेला प्रस्ताव आहे. ही एक बाब आहे. पण ज्या शाळेचा ह्याच्यात उल्लेख नाही. त्या ठिकाणी सर्फलेस रुम आहेत. असा त्याच्यातला अभिप्राय आहे.

**हेलन गोविंद :-**

आमच्या शाळेमध्ये जागा उपलब्ध आहे. हे तुहाला माहिती होते. मग तुम्ही आमच्या शाळेचे नाव का घेतले नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

२९ शाळेमध्ये आपल्याला हे कार्यन्वित करायचे आहे. फक्त त्याच्यासाठी आपण ठेका पध्दतीने कारवाई करतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण आमचा आग्रह होता. आमच्या शाळेचा इथे उल्लेख........

**हेलन गोविंद :-**

तुम्ही आधी बसून घ्या. मला बोलू द्या. नंतर तुम्ही बोला. माझे बोलणे झाल्यानंतर तुम्ही बोला.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, मी आधी तुमची परवानगी घेतलली आहे. त्यांना नंतर बोलू द्या. मा. महापौर मॅडम, सभागृहाची शिस्त दिलेली आहे. आधी मला बोलू द्या. नंतर त्यांना बोलायला परवानगी द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

शाळेचा सहभाग आहे. नाही, असे नाही.

**हेलन गोविंद :-**

त्या ठरावामध्ये माझ्या शाळेचा उल्लेख करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

उत्तन मराठी शाळा क्र. १ उत्तन उर्दू शाळा क्र. २ ह्या दोन्ही शाळांचा उल्लेख आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी गफलत होत आहे. एक चांगला विषय महापालिकेने धोरणात्मक निर्णयाद्वारे की, शहरातल्या तळागाळातल्या समाजातले जे मुले आहेत. त्यांना संगणकाचे ज्ञान घेता यावे म्हणून ही फॅसिलीटी आपण निर्माण करत आहोत. परंतु, सन्मा. सदस्या हेलन गोविंद यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे डोंगरी, चौक, पाली, उत्तन-पाली, उत्तन-मराठी, उत्तन-उर्दु ह्या चार शाळा खरं तर आपण ब्रॉडली घेतलेले आहे. परंतु, ह्यांचे नामोल्लेख या पत्रिकेमध्ये आलेला नाही. परंतु करायला पहिजे अशी आमची आपल्याकडे आग्रहाची मागणी आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, माजी आमदार सिताराम भोईर यांनी घोडबंदरच्या मराठी शाळेमध्ये ३ संगणक प्रशिक्षणासाठी दिलेले होते. त्या संगणकापैकी २ संगणक मा. माजी आमदार सिताराम भोईर साहेब, यांनी परत नेले.

**रतन पाटील :-**

परत नेले. म्हणजे दिले कसे?

**केशव घरत :-**

हे कोणाला विचारून नेले?

**रतन पाटील :-**

दिले कसे?

**केशव घरत :-**

द्यायचे दिलेले संगणक परत नेण्याचे कारण काय?

**रतन पाटील :-**

गेले तर कसे गेले? भोईर साहेब, संगणक न्यायला आलेले होते का?

**केशव घरत :-**

याची चौकशी व्हावी. हे नेण्यासाठी परवानगी कोणी दिली? एखादी वस्तु कोणालाही दान दिल्यानंतर ती परत घेतली जाते का?

**रतन पाटील :-**

कोणी नेले?

**केशव घरत :-**

आमदारांनी नेले. आमदारांच्या परवानगी शिवाय जावू शकतील का?

**रतन पाटील :-**

कोणी नेले ते सांगा ना.

**केशव घरत :-**

मी तुम्हाला विचारले का?

**रतन पाटील :-**

प्रशासनाने सांगावे. प्रशासनाकडे दिलेले. प्रशासनाने खुलासा करावा ना. प्रशासनाने दिलेले आहे का? मा. महापौर मॅडम, आम्ही आरोप ऐकून घेणार नाही. प्रशासनाने खुलासा करावा. प्रशासनाला विचारून नेले का?

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, हा प्रश्न सन्मा. सदस्य रतन पाटील यांचा आहे का? हा प्रश्न सिताराम भोईर यांचा आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या प्रशासन खुलासा करेल. आपण खाली बसून घ्या.

**रतन पाटील :-**

त्यांच्यावर केलेला आरोप मागे घ्यावा.

**शुभांगी नाईक :-**

आमदाराने नेलेले नाहीत. आमदारांच नाव घेवू नका. आमदाराने नेलेले नाहीत.

**रतन पाटील :-**

प्रशासनाशी बोला.

**शुभांगी नाईक :-**

मग तुम्ही प्रशासनाला विचारा.

**रतन पाटील :-**

जर आमदाराने संगणक नेलेले असेल तर प्रशासनाने खुलासा करावा.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, अगोदर त्यांना खाली बसायला सांगा. मग प्रशासनाला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यायला सांगा.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. प्रशासन खुलासा करेल.

**ए. एस. सुर्यवंशी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. शाळा क्र. ९ आणि १४ या दोन शाळांना २००३ च्या या शैक्षणिक वर्षामध्ये संगणक पुरवठा केलेला होता. त्या संदर्भात घोडबंदर आणि पेणकर पाडा हे आमदार निधीतून झालेले आहेत. तर त्यांच्यापैकी पेणकर पाड्याच्या संगणकाची जी सन्मा. सदस्यांनी माहिती मागितली. सध्या पेणकर पाड्याचा संगणक आहे. तिथेच आहे. परत कोणी नेलेला नाही. घोडबंदर विषयी माहिती घेवून मी तुम्हाला सांगतो.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना तो शब्द मागे घ्यायला सांगा. मा. महापौर मॅडम, त्यांनी आपला शब्द मागे घेतला पाहिजे. या सभागृहाला............

**अनंत पाटील :-**

प्रशासनाला सर्व बरोबर पाहिजे की, आमदाराने दिलले जे संगणक होते. त्यांना प्रशिक्षण देण्याची कुवत नाही. तुम्हाला कुवत नाही. प्रशिक्षक नेमले नाही. तुम्ही का नेमले नाही? तुम्ही एक प्रशासक नेमू शकत नाही.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. तुम्ही एका एकाने बोला.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्न मी विचारलेला आहे.

(सभागृहात गोंधळ.)

**अनंत पाटील :-**

एखादा आमदार किंवा खासदार तुम्हाला देणगी देतात किंवा वस्तुच्या रूपाने देतात. त्याचे प्रशिक्षक नेमण्याचे काम प्रशासनाचे आहे. आजपर्यंत तुम्ही प्रशिक्षक का नेमले नाही. प्रशासन हे तुमचे आहे. प्रशासकाने आपले काळजी दायक जे काही ठरवले होते. तुम्ही सदरबाब मध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान करायला लागले. दिलेल्या वस्तु तुम्ही दिले नाही. आता तुम्ही तसे आरोप करू नका. आमदारांवर आरोप करण्याचा तुमची नैतिक अधिकार नाही. तो नैतिक अधिकार तुम्ही गमावलेला आहे. प्रशासनाने प्रशिक्षक तिथे नेमलाच नाही.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या माहितीप्रमाणे आमदारसाहेबांनी पत्र दिले होते. ते पत्र महापालिकेचे मा. आयुक्त आर. डी. शिंदे साहेबांच्या सहीनिशी वाटल्यास मी तुम्हाला त्याची प्रत उद्या आणून दाखवू शकतो किंवा पुढच्या मिटिंगला दाखवू शकतो. ते पत्र मा. आयुक्त साहेबांना आणून दाखवू शकतो. कारण तेव्हा मी

चौकशी केली होती. आमदार साहेबांचे पत्र आणले ते पत्र मा. आयुक्त साहेबांना दिले आणि त्या पत्राच्या आधारे घोडबंदर शाळेच्या मुख्याध्यापिकाने ते संच त्यांना दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

बरोबर आहे. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे कारण तुम्ही सांगताय तुम्ही पत्र दाखवा. तुम्ही अद्यापी महापालिकेचे.........

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील मी प्रशासनाला प्रश्न विचारतोय तुम्हाला विचारत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील त्यांचे पहिले बोलणे होवू द्या.

**केशव घरत :-**

मी प्रशासनाला प्रश्न विचारला.

**रतन पाटील :-**

असे बोलता तर पत्र दाखवा ना. पत्र दाखवा आणि मग बोला.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, आपण शांत रहा. त्यांनी सांगितले की, आमदार साहेबांच्या पत्राची प्रत त्यांच्याकडे आहे. या शाळांविषयी........

**रतन पाटील :-**

महापालिकेत असेल.

**मिलन पाटील :-**

ह्यांच्याकडे पण आहे तर प्रशासन अधिकाऱ्याकडे पण असायला पाहिजे ना. शिक्षण अधिकाऱ्याकडे पण ती प्रत असायला पाहिजे. त्यांना उत्तर द्यायला सांगा.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहाने शांत व्हावे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील २९ शाळांविषयी आपल्या सगळ्यांना माहित आहे. आपल्या शहरामध्ये एकुण १५३ शाळा मान्यता प्राप्त शाळा आहेत. महापालिकेच्या शाळांची संख्या आता जी दिलेली आहे. त्या संख्ये प्रमाणे आपण संगणकीकरण करायचे आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणेचा दर्जा वाढला पाहिजे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण नंतर बोला. मी पहिले बोलून घेतो आपल्याकडे फक्त एकच शाळा अशी आहे की जी १ ते २ वर्ग असणारे दोन शाळा हे महापालिकेची आहे. १ ते ३ इयत्ता पहिली ते तिसरी पर्यंतची एक शाळा आहे. इयत्ता १ ते ४ पर्यंतच्या पाच शाळा आहेत. इयत्ता १ ते ५ पर्यंतच्या ३ शाळा आहेत आणि इयत्ता १ ते ७ पर्यंतच्या १८ शाळा आहेत या १८ शाळांमध्ये इयत्ता १ ते २ च्या विद्यार्थ्यांना अशा दोन शाळांना आपण संगणकाचे पुर्णपणे ज्ञान काय देणार? ७ वी चा विद्यार्थी जेव्हा पास होतो. त्याला देखील एक पुस्तक व्यवस्थित वाचता येत नाही. हा आपल्या शिक्षणाचा दर्जा आहे. ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये वारंवार आपण सुचना करत असतो. मी आता नुकतेच सन्मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केली. सन्मा. सभागृहाला सुचना करू इच्छितो की, कोणीही मी स्वतः जिल्हा परिषदेच्या शाळेमधून शिकलो. परंतू, माझ्या मुलांना मी जिल्हा परिषदेच्या शाळेत का टाकले नाही किंवा महानगरपालिकेच्या शाळेत का टाकले नाही. कारण, मला वाटते माझ्या मुलांचे भवितव्य हे उज्वल असावे आणि तसा प्रयत्न आपण करत असतो. ह्याच सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व गटनेत्यांना मी विनंती करतो की, आता शाळेच्या परिक्षा संपलेल्या आहेत. सुट्टया पडलेल्या आहेत. तर शैक्षणिक दर्जा उंचावला पाहिजे. महापालिकेच्या विद्यार्थ्यांचे काहीतरी भवितव्य असले पाहिजे. म्हणून आपण शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी काय सुचना करू शकलो जसे आपण विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके मोफत देत असतो, खिचडी पाठवित असतो, कपडे मोफत देत असतो. कुठल्याही प्रकारची फि घेत नाही आपण, साधारण १५ इमारती महापालिकेच्या बांधल्या. या महापालिकेच्या शाळेमध्ये एकूण २१० शिक्षक असलेल्या या महापालिकेच्या शाळेमध्ये सध्या १९१ शिक्षक आहेत. या शिक्षण अधिकाऱ्यानी सांगितले सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणू इच्छितो की, गेल्या वर्षी भाईंदर सेकंडरी स्कूल मध्ये ४ थीच्या वर्गावरती मिश्रा नावाचा शिक्षक हा ४ थी च्या मस्टरमध्ये सही करून यायचा आणि महापालिकेच्या कार्यालयात बसायचा. ते विद्यार्थी पास कसे झाले. शिक्षक शाळेमध्ये नसल्याने ते मुले पास कसे झाली आणि जरी मुले पास झाली तरी ती पटावर संख्या असते. ती फक्त नउ हजाराच्या आसपास असते आणि अशा वेळेला मी सर्व गटनेत्यांना आवाहन करतो किंवा जे-जे इच्छूक आहेत त्यांनी आपल्या सुचना मा. महापौर मॅडम यांना किंवा मा. आयुक्त साहेबांना द्याव्या आणि हा शिक्षण अधिकारी नकोच. ह्याच्यामध्ये कोणाला प्रेम असायचे कारण नाही.

**मिलन पाटील :-**

ठराव मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या मिटिंगलाच हे बोललो होतो.

**मा. उपमहापौर :-**

कारण हा शिक्षण अधिकारी या दालनामध्ये कमी आणि शाळेमध्ये जास्त असतो.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या मिटिंगला आम्ही ही सुचना दिली होती. तुमच्या मास्तराने फेटाळली.

**शुभांगी नाईक :-**

तुमचे अधिकारी कुठच्या ऑफीसमध्ये असतात, विचारा. तुमचे अधिकारी कुठच्या शाळेत असतात याची चौकशी करा.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी आमच्यावर टिका केली.

**शुभांगी नाईक :-**

त्यांना फक्त दोनच माणसे दिसतात का?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या संपुर्ण मताशी आम्ही सहमत आहोत.

**मा. उपमहापौर :-**

इथे बसलेले बरेच सदस्य शैक्षणिक संस्थांशी संबंधित आहेत आणि प्रत्येकाने आपल्या सुचना महापालिकेला दिल्या.......

**मिलन म्हात्रे :-**

पण आमच्या सुचनांवर तुमच्या मास्तरांनी टिका केली. प्रशासन चांगले चाललेले आहे. मी तर बोललो की, ॲन्टी करप्शनने पकडलेला अधिकारी आणलेला आहे. आपल्याच महापालिकेमध्ये ॲन्टी करप्शन हे पकडले जातात.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मी पर्टिक्युलरली शिक्षण क्षेत्राबद्दल बोलतो. शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या सुचना या महापालिकेतल्या येणाऱ्या वर्षात ज्या शाळा सुरू होतील.....

**मिलन म्हात्रे :-**

पण अधिकारी नाराज होणार. आजच्या मिटिंगमध्ये ठराव घ्या. आम्ही अनुमोदन देतो.

**मा. उपमहापौर :-**

त्यांना नाराज होण्याचा प्रश्न नाही. ते ठराव करू शकणार नाही, हा माझा ठाम विश्वास आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग, आमच्या मताला ठराव.........

**मा. उपमहापौर :-**

अधिकारी या शहराला काहीच देवू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मताला घ्या. तुम्ही मतदान करा.

**मा. उपमहापौर :-**

त्यांना..........

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना नाराज करू नका, त्याला विरोध असेल तर ते करा.

**शुभांगी नाईक :-**

अधिकारी सक्षम नसेल तर त्यांना ठेवू नका. आपल्याला असे अधिकारी हवे तरी कशाला?

**मा. उपमहापौर :-**

आपली आपली मत तुम्ही ठेवू शकता. परंतु, एक एकने ठेवा तर ते चांगले राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

भाषण कमी कृती जास्त. आज आपण कार्यमुक्त करायचे. विषय संपला.

**मा. उपमहापौर :-**

संगणकाच्या माध्यमातून शैक्षणिक दर्जा उचलण्याचे एक पाउल आहे. अशा सुचना आपल्या कडून देखील याव्यात आणि आजच्या मा. महासभेसमोर मी मा. आयुक्तसाहेब यांना विनंती करतो की, सध्या शिक्षण मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून ते आहेत त्यांनी आजच्या सभेच्या माध्यमातून सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून सन्मा. शिक्षण अधिकाऱ्यांना त्यांच्या त्यांना मागच्या मागे पाठवून द्यावे असे विनंती करतो. आणि जे शिक्षक इथे बसले आहेत त्या शिक्षकांना इथून कार्यमुक्त करून त्यांनी शाळेवरच बसावे आणि शिक्षण समन्वये म्हणून शिक्षा सर्व शिक्षा अभियंतार्गत समन्वय आहेत म्हणून आपल्या महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या शाळेमधून रिटायर झालेले शिक्षक आहेत किंवा इतर रिटायर शिक्षक असतील तर त्यांच्या अनुभवाचा फायदा या शहरातील शाळांना व्हावा म्हणून त्यांना नियुक्त्या द्याव्या आणि इथे बसणारे शिक्षण समिती आपण तातडीने

त्यांना त्यांच्या तिथे चार्ज द्यावा आणि त्यांना तिथे पाठवून द्यावे आणि साहेब, शिक्षण अधिकाऱ्यांना कसे पाठवता येईल ह्या विषयी आपण तातडीने निर्णय घ्यावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता मा. उपमहापौर साहेब यांनी अगदी पोटतिकडीने अधिकाऱ्यावर........

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, कृपया सभागृहामध्ये एका सदस्याला बोलायची विनंती करा. एक सदस्याने बोलत असताना कृपया इतरांनी खाली बसावे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर वैती साहेबांनी या अधिकाऱ्याचा विषय इतक्या पोटतिडकीने मांडलेला आहे. मॅडम, गेल्या महासभेमध्ये तुम्ही आदेश दिले होते. असे रूलिंग दिले होते. ह्याच अधिकाऱ्याला की, आमच्या भाईंदर सेकंडरी स्कूल करिता २ रूम मागितले होते आणि त्याचे आम्ही भाडे भरणार होतो तुम्ही तेव्हाच ऑर्डर ८ दिवसामध्ये केली होती. त्याला तुम्ही लेटर द्या. ह्या महासभेमध्ये सन्मा. अधिकाऱ्याने अजुनपर्यंत, आजच्या मिटींगला सुद्धा......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सब्जेक्ट पर बोलिए।

**लिओ कोलासो :-**

सब्जेक्ट छोडके क्यो जा रहे है। सब्जेक्टवरच बोलायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

विषयाला अनुसरुन बोलू द्या ना.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या मिटिंगला........

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सुचना ले आये उनकी निधीतक कोई.......

**मिलन पाटील :-**

निधी हे निधी.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सब्जेक्ट क्या है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निधी है।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या मिटिंगला एक महिना झालेला आहे. अजुन......

**मा. महापौर :-**

सर्वांनी खाली बसुन घ्या. विषयाला धरून बोला.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही रूलिंग देवून सुद्धा या अधिकाऱ्याने अजुन सुद्धा आजच्या घडीला आम्हाला लेटर दिलेले नाही. मी असा ठराव मांडतो, की, हा भ्रष्ट अधिकारी आम्हाला नको पाहिजे आणि हा अधिकारी ज्या डिपार्टमेंन्टमध्ये आला असेल मा. आयुक्त साहेबांनी त्याची त्वरित बदली करावी.

**मिलन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम, विषय ही नही उसपर क्यो चर्चा करते है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी शांत बसावे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, अजुन माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

**मा. महापौर :-**

त्यांच्या प्रश्नाचे उत्तर पूर्णपणे होवू द्या. बसून घ्या.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझा दुसरा प्रश्न आहे की, सध्या आपले ठाण्याचे पालक मंत्री मा. ......

**अनंत पाटील :-**

त्याचा खुलासा पहिला पाहिजे. त्यासंदर्भात आमदारांबाबतच खुलासा होवू द्या.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, आपले जे पालक मंत्री आणि आपल्या विभागाचे आमदार मा. गणेशजी नाईक यांनी २७ प्राथमिक शाळांना संगणक दिलेले आहे. ते संगणक प्रत्येक शाळेमध्ये आहेत. त्या संगणकाचे काय करणार आहात?

**रतन पाटील :-**

त्यांनी सांगितले की, हे पत्र महापालिकेमध्ये दिलेले आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, सब्जेक्ट के उपर बोलने दिजीए। अननेसेसरी बोलना.........

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, अगोदर यांना खाली बसवा.

**मा. महापौर :-**

तुम्ही शांत रहा.

**अनंत पाटील :-**

उलट तुम्ही अर्थाचा अनर्थ करता.

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, एक-एक नही दो-दो जन बोलते है तो किसका सुनेंगे।

**मा. महापौर :-**

एक-एक जण बोला.

**रतन पाटील :-**

प्रशिक्षक नेमले नाही. आपला फरक आहे तो.....

**अनंत पाटील :-**

.आपण कमी करतो म्हणून.

**रतन पाटील :-**

आपण स्वतः कमी पडले. आपण एक प्रशिक्षक नेमू शकत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आम्ही नगरसेविका होण्याच्या अगोदर संगणक घेवून गेलेले होते.

**रतन पाटील :-**

घेवून गेलेले आहेत. दिलेले नाही. विचारा.

**मा. महापौर :-**

पत्र व्यवहार सुद्धा केलेला आहे. आमच्याकडे पत्र व्यवहार आहे. आपण सतत ह्या सभागृहामध्ये चुकीचे शब्द वापरू नका आणि आपण आपले शब्द मागे घ्या.

**रतन पाटील :-**

मी काय बोललो.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आमदारावर डायरेक्ट आरोप केलेले आहे. तुम्हाला हे सहन होते का? आमदारावर आरोप केलेला तुम्हाला सहन होते का?

**केशव घरत :-**

मी पत्र मागवतो. तुम्हाला पत्र देतो ना. पत्र घेवून येतो.

**अनंत पाटील :-**

तुम्ही कायद्याचे शब्द मागे घ्या. तुम्ही जे शब्द बोललात ते शब्द मागे घ्या.

**मा. महापौर :-**

सदस्य आपण बसुन घ्या आपण सर्वांनी बसा परिक्षण करणार आहेत. आपण सगळे बसा.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, की, तुमच्या सभेजागी असती तोपर्यंत माझा......

**मा. महापौर :-**

आपण खाली बसुन घ्या.

**रोहीदास पाटील :-**

त्यांना हे बोलायला लागेल.

**अनंत पाटील :-**

असे होवू शकत नाही.

**याकूब कूरेशी :-**

आपण जे बोललात ते बोलायला द्या अशी बोलायची काही गरज नाही.

**रोहीदास पाटील :-**

कशाला नाही म्हणता? ते पुढच्या सभेत काय....

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, यांनी आपल्याला बसायची रूलिंग दिलेली आहे. तर आता बसा ना.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, यांनी आपल्याला रूलिंग दिलेली आहे. चौथी वेळ देणार नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम आम्हाला बोलतील ना.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांनी रूलिंग दिलेली आहे ना.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, रूलिंग देतील तुम्ही बसा ना

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या जेव्हा आपल्याला बोलायची संधी मिळेल, तेव्हा परमिशन घेवून एक एक जण बोला.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मा. सदस्य केशव घरत यांना सल्ला द्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. पहिले सहा जण बसून घ्या. नंतर मी परमिशन देते. तुम्ही आता बसा.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या शब्दाचा मान ठेवून आम्ही सय्यम बाळगतो परंतु, आपल्या सदस्यांना आमदारांवर आरोप करताना त्यांना समज द्या. ही तुम्हाला विनंती आहे. या सभागृहाचा सम्मान.....

**केशव घरत :-**

आरोप काय केला मी? सन्मा. सदस्य रतन पाटील.......

**शुभांगी नाईक :-**

आमदाराने संगणक नेले म्हणून आरोप तुम्ही केला. तुम्ही आमदारांवर.........

(सभागृहात गोंधळ.)

**अनंत पाटील :-**

त्यांनी संगणक घेवून गेले असे म्हणतात.

**शुभांगी नाईक :-**

आमदारांनी नेले असे म्हणतात. आमदार काय न्यायला आलेले की काय?

**केशव घरत :-**

संगणक गेले कसे?

**शुभांगी नाईक :-**

संगणक गेले कसे त्याचा जबाब प्रशासनाला विचारा.

**केशव घरत :-**

तसे त्यांना विचारा प्रशिक्षक का नेमले नाही.

**शुभांगी नाईक :-**

तुम्ही प्रशासनाला बोला.

**केशव घरत :-**

मी तुम्हाला विचारत नाही. मी प्रशासनाला विचारतो.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आमदारांच नाव का घेतले?

**शुभांगी नाईक :-**

आमदारांच नाव तुम्ही घेतलत का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सन्मा. सदस्य केशव घरत........

**केशव घरत :-**

मी पत्र घेवून येतो.

**हॅरल बोर्जीस :-**

यांच वक्तव्य सुरू असताना त्यांनी........

**प्रियांका करंबळे :-**

पत्र घेवून या आणि मग बोला.

**रतन पाटील :-**

महापालिकेत पत्र आहे ते बोललेत ना.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. विधान सभेच्या तटस्थाबद्दल अनुभवाने जर काही चुकीचे वाक्य निघाले असेल तर सन्मा. या सभागृहाच्या कामकाजातुन सदर वाक्य आपण वगळावे हेतू पुरस्सररित्या सन्मा. सदस्य केशव घरत यांनी अशा प्रकारे बोलले नव्हते. कदाचित चूक झाली असेल. समजुन घ्या.

**प्रियांका करंबळे :-**

बोललेच.

**प्रकाश दुबोले :-**

मा. सभागृह नेते साहेब, मा. आयुक्त साहेब यांना लेखी पत्र दिलेले आहे. आमदारांनी संगणक नेले म्हणून. सभागृह साहेब, मा. आयुक्त साहेब यांनी त्यांना लेखी पत्र दिलेले आहे. की, आमदार निधीने दिलेले संगणक परत आमदाराने नेले असे त्यांच्याकडे लेखी पत्र आहे. योग्य बोललेले आहे. मा. आयुक्त साहेब यांच्या सहीनिशी पत्र आहे. कामकाजातून त्यांचे वाक्य वगळू नये.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य केशव घरत यांनी मांडलेला प्रश्न याची त्या-त्या विभागामार्फत चौकशी करून पुढील महासभेत अहवाल ठेवण्यात यावा. आपण सगळ्यांनी खाली बसून घ्या. आपल्याला आता मा. महासभेमध्ये बोलण्याची संधी मिळणार नाही. आपण बसून घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सन्मा. उपमहापौर यांनी अत्यंत ज्वलंत तसेच शिक्षण क्षेत्राच्या बाबतीमध्ये या ठिकाणी कथन केलेले होते. साहेब, तुमच्या भावनांशी पुर्ण सभागृह सहमत होता. म्हणजे दूमत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये आम्ही जे बोलतो ना.  तो ठराव ठेवा ना.  शिक्षण अधिकाऱ्यांना घालवण्याचा ठराव ठेवा आम्ही अनुमोदन दिले.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मी बोलता ना. मा. महापौर मॅडम, शिक्षणाच्या बाबतीमध्ये फक्त शिक्षण अधिकाऱ्यांना बदलुन शिक्षण क्षेत्रामध्ये आपण फार अमुलाग्र बदल घडू शकत नाही. त्यांच्या उपरान्त जावून. मा. उपमहापौर साहेब यांनी सांगितले की, सर्व सन्मा. गटनेत्यांनी याच्यावर कुठेतरी गांर्भीयाने विचार केला पाहिजे असे मला वाटते. अंदाजपत्रकामध्ये पुरेशी अशी शिक्षणाच्या बाबतीमध्ये आपण तरतुद उपलब्ध केलेली आहे. परंतु, शिक्षणाच्या बाबतीमध्ये मुळ जागा आहे. आज आपण महापालिकेच्या शाळेबद्दल अतिशय तिव्र प्रतिक्रिया सदस्यांच्या, नागरिकांच्या असतात आणि ह्याच्यामध्ये कुठेतरी बदल घडावा. यादृष्टीने मा. उपमहापौर यांनी जेव्हा सुचना केलेल्या आहेत सर्व सन्मा. गटनेत्यांना विनंती करतो या शिक्षणाच्या बाबतीमध्ये ह्या काही सुचना असतील. प्रशासनाच्या माध्यमातुन मा. महापौर यांच्या माध्यमातून आपण प्रशासनाकडे मांडाव्यात आणि त्याच्यावर कुठेतरी अमुलाग्र बदल घडेल आणि भविष्यांमध्ये महापालिकेच्या शाळांचा दर्जा वाढेल अशी अपेक्षा आपण याठिकाणी व्यक्त करू.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभागृह नेता साहेब, आम्हाला सुचना मांडायची आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

वाचून झाल्यानंतर बोला ना.

**मिलन म्हात्रे :-**

आमची सुचना ५ मिनिटांची आहे आणि तुमच्या फेवरला आहे. गेल्या मिटींगमध्ये जो ठराव पास झालेला आहे. त्यामध्ये जो १ करोड रूपयाचा निधी तुम्ही अन्य शाळांकडे वळवला होता. नियमानुसार ७० लाख रूपये त्या निधीमधले आणि नियमानूसार तो निधी ३० लाख रू. पर्यंत वापरता येतो. ७० लाख रू. ॲक्सेस राहणार आहे. ही माझी सुचना आपण ॲड करून घ्यावी.

**मिलन पाटील :-**

हा विषय संगणकाचा आहे.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ७० लाख रू. चे काम केले. ते ॲड करून घ्या ना. ३० लाख रू. च्या वर तुम्ही देवू शकत नाही.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आज एका चांगल्या विषयाला सुरुवात आहे. सभागृह नेते हॅरल बोर्जीस साहेब यांनी ठरावही मांडलेला आहे. बोर्जीस साहेब आम्ही कोणत्याही ठरावाला विरोध करण्यासाठी उभे राहत नाही. तुम्हाला आम्ही बहूमताचा एकमताचा कोणताही ठराव देवू शकतो. पण या शैक्षणिक बाबीच्या बाबतीत जो संगणकाचा विषय आलेला आहे. त्या विषयावर या सभागृहामध्ये निटनेटकी चर्चा होणे गरजेचे आहे. ते रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. ज्यावेळी मिरा भाईंदर नगरपरिषद होती किंवा जिल्हा परिषद नंतर नगरपरिषद. नगरपरिषदेमध्ये शाळा असताना. जिल्हा परिषद बोलतच नाही. नगरपरिषदेच्या शाळा हस्तांतरीत होते वेळी या शाळांची पटसंख्या २९ आणि मुलांची पटसंख्या १२,१५० होती. त्यावेळी अशी पटसंख्या होती. ज्यावेळी शहराची लोकसंख्या होती फक्त सव्वा तीन लाख. आज आपण साडे सात, आठ लाख संख्या जेव्हा बोलतो, शाळांची संख्या तेवढीच राहिली पण आजची पटसंख्या ९३२० आहे. म्हणजे ३ हजाराने संख्या कमी झाली. त्यावेळी संख्या कमी झाली ह्याच्यावर आपण करोडो रूपयाचा खर्च केला. आधी मुले पाटावर बसत होती. सारवण करून बसत होती, गोणपाटावर बसत होती. ज्या शाळेमध्ये लाईट नव्हती, पंखा नव्हता, कोणतेही साधन नव्हते. त्यावेळी मुलांची पटसंख्या होती आणि आता शहराची वस्तु आणून आपली पटसंख्या घसरली. आता मा. उपमहापौर साहेब जे बोलले ते काही बोलले माहित नाही. म्हणजे उशीरा बोलले असे आमचे म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व सामान्याने रजा मांडल्या.

**रोहीदास पाटील :-**

त्यांना जे समजले ते पण त्यांना ४ वर्षे हे करायला कोणी थांबवल नव्हते. त्याच्या आधी ही होते. त्याच्या आधी ही ते पदाधिकारी होते. त्यावेळी हा त्यांचा आकर्षण पणा आहे. हे आम्हाला सांगायचे आहे आणि म्हणून आम्ही बोलतो की, आताच्या प्रशासनाच्या कामकाजाची काय पद्धत आहे. मा. उपमहापौर साहेब जे सांगतात की, ते बाया केबिनमध्ये बसलेल्या असतात. इथे कोण शिक्षण अधिकाऱ्याच्या बदलीचा असे नुसते ठराव बोट वर करून होत नाही. त्याला नियमानुसार त्याचे पेपर तयार असतील तर ते करता येईल. अन्यथा भावनात्मक बोललो आणि सर्वांना बांधून घेतले. अशा ठरावाला भारतीय जनता पार्टीचा सदस्य म्हणून, गटनेता म्हणून आम्ही कधीही हो म्हणणार नाही. तुम्ही तुमचे परिक्षण करावे. सत्ताधारीने परिक्षण करावे की, ज्यावेळी तुम्ही त्या पद्धतीने वागतात. त्याची ही फळे आहेत. ४ वर्षामध्ये कोट्यावधी रू. खर्च करुन सगळ्या शाळांवर ९ शाळा नविन बांधल्या तर त्या नविन इमारतीमध्ये पैकी कोणत्याही खाजगी शाळा पेक्षा किती सुंदर ह्या शाळेमध्ये लाईट नाही. पाणी नाही. ह्या सुविधा कोणी द्यायच्या आहेत. ह्या सुविधा देण्यासाठी महापालिकेतल्या कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही नगरसेवकाने कधीही विरोध केलेला नाही. पण आपले लक्षच नाही. आपण फक्त बजेट संपवायचे काम करतो. आता ही घेतेवेळी मा. आयुक्त साहेब यांना आणि मा. महापौर मॅडम यांना आणि मा. उपमहापौर साहेब यांना विनंती करतो तुमची गटाची बैठक झाली असेल ना मग गटाची बैठक होते वेळी २९ शाळाच्या ऐवजी २४ शाळा आल्याच कशा. ज्या शाळा येणे गरजेचे होते. त्याठिकाणी संगणक देणे गरजेचे आहे. टिपणी यायला पाहिजे होती की, ह्या शाळेत जागा नाही. अशी आली नाही. एकूण संख्या २४ हे सगळे होकार देतील अशी तुमची अपेक्षा आहे की, तुमच्याकडून काय अपेक्षा करायची? काहीच नाही. कशासाठी सभागृहाने संमती दिलेली नाही. आपण सगळा जाहिरनामा दिला. आमचे त्याच्यावरचेही मत आहे की, तुमच्या डुट्या कंम्प्लसरी आहे. पण तरीही लोकांना बर वाटावे ही महापालिका काहीतरी नविन करते असे दिसावे. म्हणून तुमच्या हो ला आम्ही हो म्हणतो. आता ह्याच्यातले जे आहे की, आज शिक्षक आहेत किंवा शिक्षक नाही. शिक्षण आणण्यासाठी कोणी प्रयत्न केले. प्रयत्न करून येत नसेल तर मा. सभागृहाने सत्ताधारीला सांगावे की, आम्हाला यश येत नाही. आमची मदत घ्या. आम्ही तुम्हाला मदत देतो. शिक्षक येतील, सगळे येतील त्यातला दर्जा सुधारेल.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे काय चाललेले आहे. प्रत्येक वेळा तुमच्यामध्ये डिर्स्टब व्हावा. हे विषय नाही. सत्ताधरी बी.जे.पी. पक्ष हे कशाला इथे आलेले आहेत. याचा अर्थ काय? बजेट शहराच्या विकासासाठी लागते. कोणाच्या घरासाठी नाही आणि मा. उपमहापौर अकार्यक्षमतेत आहे का? तुम्ही मघाशी बोललात की, मा. उपमहापौर अकार्यक्षम आहेत.

**रोहीदास पाटील :-**

मा. उपमहापौर नाही. तुम्ही सगळे सत्ताधारी अकार्यक्षम आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

हे सत्ताधारी मागे घ्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील आपण यामध्ये वक्तव्य करताना सन्मा. उपमहापौर साहंबांच्या वक्तव्यामध्ये या भाषेचा.......

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या रोहीदास पाटील यांना माफी मागायला सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांच्याकडून अशा प्रकारचे वक्तव्याचे आम्ही अपेक्षा केलेली नाही.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही अकार्यक्षम आहे. हा शब्द त्यांना मागे घ्यायला सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, विरोधकाचे ते कामच आहे. सगळ्यांवर आरोप करायचा.
(सभागृहात गोंधळ)

**मोहन पाटील :-**

आम्ही काम करत नाही. आम्ही काम करत नाही.  कारण आम्ही अकार्यक्षम आहे का?

**रोहीदास पाटील :-**

बरोबर आहे.
(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

प्रायव्हेट शाळेचे शिक्षण दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खाली आणि वर काय आहे?

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांनी शब्द मागे घेतल्या शिवाय आम्ही खाली बसणार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

राजनिती करनी है तो इलेक्शन के टाईम मे क्यो नही की।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपका निती नही है। डरो मत आपका निती नही। पालिकाका है।

**जेन्वी आल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना शब्द घेण्याची परवानगी द्या.

**मोहन पाटील :-**

आम्ही सभागृहामध्ये कोणतेही प्रस्ताव आणताना सत्ताधारी पक्षाचा हा प्रस्ताव नाही. सर्वाचे शहराचे सन्मा. सदस्यांचे नागरीकांची अशी धारणा आहे. त्यामुळे जास्त अन्य पक्षाची आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना शब्द मागे घ्यायला लावा?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

**मा. महापौर :-**

शब्द मागे घ्या.

**महेंद्रसिंग चौहान :-**

जीतना हमलोग पारदर्शकतासे काम करते है उतनाही ये लोग गलत काम करते है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी वापरलेले अपशब्द मागे घेण्यात यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अपशब्दाचा प्रश्न नाही. आरोप .......

**ग्रिटा फेरो :-**

आरोप करताना काहीतरी विचार करायचा.

**महेंद्रसिंग चौहान :-**

मा. महापौर मॅडम, इनको बोलिए की, अपशब्द वापस लेनेको वरना हम लोग नही बैठेंगे।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे चालणारच नाही असे टोचून आरोप कोणालापण करता येणार नाही. हे बेछूट आरोप आहेत आमची कार्यक्षमता सिद्ध करण्याची गरज नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही शिवी दिलेली नाही. आरोप करणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. तुम्ही काहीही दाखवा.

**प्रभात पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब यांच्यावर तुम्ही आरोप करणे हे चूकीचे आहे. सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी.......

**मोहन पाटील :-**

विरोध केला. विरोधात करा ना..........

**महेंद्रसिंग चौहान :-**

धीरे धीरे विश्वास होते कारण.......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चौहान साहब अभी आपकी जिन्दगी है। माजी नगराध्यक्ष हमारे गिल्बर्ट शेट की मेहरबानी है। की, आप सभागृह मे हो। नही तो आप सभागृह मे नही रहते । आप सभागृह मे भी नही होते थे।

**आसिफ शेख :-**

गिल्बर्ट शेठ हमारे साथ थे ना।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपको भुलना नही चाहीए। माजी नगराध्यक्ष गिल्बर्ट शेठ की मेहेरबानी से आप सभागृह मे है। नही तो आपका भी पत्ता साफ हो गया था।

**शशीकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम, यहापर पल्ला घुमानेकी बात है। यहापर इसके लिए अपना टाईम गवाने की बात है और कुछ नही।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाची वेळ जाते. सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना आपण विनंती करा. सभागृहामध्ये जे चूकीचे शब्द वापरलेले आहेत ते शब्द मागे घेण्यांस सांगावे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अकार्यक्षमता सिद्ध करण्याचे आम्ही सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) साहेब, यांचा आम्ही रिस्पेक्ट करतो. सगळे सदस्य त्यांना काका म्हणून बोलतात. त्यांचा आदर करतात. परंतु, चार वर्षे हे सभागृह चालले अत्यंत धाडसी निर्णय आणि धडाडीचा निर्णय इथे घेतले गेले. हे शहर चांगल्या पद्धतीने चालले सुनिरळीत पद्धतीने चाललेले आहे. आत्ता जर तुम्ही जाहिरनामा बघितला असेल तर लोकांना चांगल्या सोयी आणि सुविधा देण्यासाठी आपण एक एक प्रगतीचे पाउल उचलत असताना हे इथे झालेले आहे. हे काम प्रतिनिधींचे आहे, सभागृहाचे काम आहे. या सभागृहामध्ये आम्ही तुम्हाला सहकार्य करतो परंतु, कोणीही उठून अकार्यक्षम म्हणणे हे इथे जर आम्ही अकार्यक्षम असतो तर हे शहर सुनिरळीत पद्धतीने चालले नसते हे शहर विकासाच्य दृष्टीने चालले नसते आणि त्याच्यामुळे आम्ही ह्या शब्दाचा निषेध करतो आणि सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी आपले शब्द मागे घ्यावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, या सेक्शनमध्ये आपण स्वतः देखिल येता. मा. महापौर मॅडम ह्यांनी जे शब्द वापरलेले आहे त्याच्यामध्ये आपण देखील येता. म्हणजे मा. महापौर मॅडम, देखील असक्षम आहे असे नेहमी येते.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप यहापर इस तरह की बात नही कर सकते.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सत्ताधरी पक्ष अकार्यक्षम आहे हे सांगणे आमचे काम आहे. ह्याच्यात तुम्ही शिक्षिका आहात त्यामुळे........

**हॅरल बोर्जीस :-**

आपण समाजामध्ये ४६ दिवसांचे पदाधिकारी होते.

**रोहीदास पाटील :-**

मा. सभागृह नेता साहेब, मी मा. उपमहापौर साहेब यांना मुद्दामून बोललो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) आपण आता बोलला आहात.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) आम्ही असक्षम आहोत हे कशावरून सांगू शकता. कुठल्या कारणास्तव आम्ही असक्षम आहे. काका शैक्षणिक आम्हाला सांगू शकता की आम्ही असक्षम आहे. या शहरामध्ये येता जाता हेच चाललेले आहे. असे आम्हाला असक्षम सांगता.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे डायसवर बसलेत त्या डायसवरून........

**केशव घरत :-**

आपण स्वतःची खरी आहे आणि आम्ही असक्षम कशाला होवू शकतो.

**रोहीदास पाटील :-**

त्यांना ती परवानगी नाही. तुम्ही सभाशास्त्र समजून घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. उपमहापौर साहेबांचे वक्तव्य केलेले आहे. सन्मा. उपमहापौर साहेबांचे वैयक्तीक मत आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आपको समझाने की जरूरत नही है। सभागृहमे सभासद को समझ आती है।

**रोहीदास पाटील :-**

ते भाषण अधिकाऱ्याबद्दल केलेले भाषण........

**आसिफ शेख :-**

त्यांच ते वैयक्तीक मत आहे.

**रोहीदास पाटील :-**

या महापालिकेच्या ज्या शिक्षिका आहेत त्याही सन्मानित आहे. त्याच शिक्षिका, पद शिक्षिका....

**मोहन पाटील :-**

या शहराचे कोणतेही विकास काम होत नाही असे तुम्ही बोलता आणि आपण सभेत आल्यापासून या शहराचा विकास का झाला?

**आसिफ शेख :-**

ते निदान झाले. आत्ताच झाले.

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) ज्यादा टाईम मत निकालो और शब्द वापस लो।

**मोहन पाटील :-**

आपल्या शहराचे रस्ते भरणार आहेत का? आपले गटार भरणार आहेत का? सर्व कामे विकास कामे दिले आहेत का?

**आसिफ शेख :-**

इनके लिए दिल्ली अभी बहुत दुर है।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाचा नाहक वेळ वाया न जाता विषयपत्रिकेवरती इतर विषय सुचतात. सन्मा.सदस्य रोहीदास पाटील यांना पुन्हा एकदा मा. सभागृहाच्या वतीने विनंती करतो की, चूकीचे पद्धतीचे जे शब्द वापरले ते कृपया त्यांनी मागे घ्यावे आणि सभागृहाच्या पुढील कामकाजाला सुरूवात करावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील आपण बोललेले चूकीचे शब्द मागे घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सत्ताधारी पक्ष आमदारावर आरोप करतात सभागृहाला काय वाटते?

(सभागृहात गोंधळ)

**याकूब कूरेशी :-**

मा. महापौर मॅडम, अशामुळे हे शब्द वगळण्यांत यावे आणि कामकाजाला सुरूवात करावी. हे लोक एवढेच बघतात की, कुठेतरी अपशब्द वापरून सभागृहाचा वेळ वाया घालवायचा आणि विषयांतर करून सभागृह चालू द्यायचे नाही. म्हणून सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी मांडलेले शब्द वगळून घ्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी सभागृहामध्ये नेहमीच चुकीचे वक्तव्य करायचे आणि आपण नेहमीच अपशब्द कामकाजातुन काढत रहावे का?

**आसिफ शेख :-**

माफी मागायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

आत्ता आम्ही जे काही बोलत होतो, तेसुद्धा कामकाजातून काढून टाका.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. नगरसेवक रोहीदास पाटील साहेब, या शहरामध्ये महानगरपालिका झाल्यानंतर छातीवर हात ठेवून कोणीही सांगेल की ह्या शहराचा विकास किती झपाट्याने झालेला आहे. असे झाले असताना या शहराचा इतका झपाट्याने विकास होत असताना आम्ही ज्या भावना व्यक्त केल्या वारंवार या गोष्टीचा फॉलोअप केला. तूम्ही मोठ्या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष आहात संस्थापक आहात. आपल्याला शिक्षणाची कळकळ आहे. हे शिक्षण जर विद्यार्थ्यांना मिळावे. समाजातल्या तळागाळातल्या लोकांना मिळावे. या भावनेने आम्ही बोललो की, आम्ही कमकुवत नाही. आपण आपले शब्द कामकाजातून काढून घ्यावे. स्वतःच आपण

मागे घ्यावे आणि सभागृहाचे इतर कामकाज सुरळीत व्हावे या दृष्टीकोनाने आपल्याला विनंती करतो. आपण कृपया शब्द मागे घ्यावे.

**मिलन पाटील :-**

साहेब, म्हणून तर मी बोललो की, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना फक्त मोठ्या मुलांचीच हे आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, संगणक का विषय कबसे चला है। मै उनके लिए बोल रही हू की, मै १५ साल से इस महानगरपालिका, नगरपालिका मे कन्टीन्यू चूनके ३ बार आई। ऐसे ही सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहब बी.जे.पी. के वरिष्ठ नेता है......

**हेलन गोविंद :-**

शिक्षण समितीचे मा. सभापती पण......

**रिटा शहा :-**

इस बीस साल के पॉलिटिकल कॅरिअर के साथ साथ मे कदम से चले हमारे साथ मे। तो इस नगरपालिका से, नगरपरिषदसे महानगरपालिका तक का जो हमने सफर तय किया इसमे हमने साथमे बैठ के अच्छे काम किए की, बुरे काम किए। इसमे सारे सहभागी वो भी है।

**हेलन गोविंद :-**

शिक्षण समितीचे सभापती पण होते त्याच्यावर गिल्बर्ट शेटची मेहरबानी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एकदम बरोबर आहे.

**हेलन गोविंद :-**

गिल्बर्ट शेटची मेहरबानी आहे की, शिक्षण समितीने सभापती सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) यांना बनविले.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपले शब्द मागे घेण्यासाठी सन्मा. सदस्य रोहीदास पाटील उठून उभे राहिलेले आहे. परत आपण काही बोलू नका सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) उठलेले आहेत. ते त्यांचे शब्द मागे घेतात ना. सन्मा. सदस्य रोहीदास पाटील आपण कृपया उठा काका आपले शब्द मागे घेण्यासाठी उठलेले आहेत ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आता उल्लेख केला की सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेब, सभापती होते. मी या सभगृहामध्ये दावेशिर बोलतो की सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेब यांच्या शिक्षण सभापतीचा एक वर्षाचा कार्यकाल तुम्ही बघा आणि तुमच्या लोकांचे नउ वर्षाचा कार्यकाल बघा आम्हाला नंतर बोला।

**जेन्वी आल्मेडा :-**

स्वतःचे भले केले आणि डिग्री कॉलेज चालू केले.

**महेंद्रसिंग चौहान :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहब ने अपने कॉलेज को डिग्री कॉलेज बनाया। सन्मा. सदस्य रोहीदास पाटील के पास इस नगरपालिका का कितना बडा एहसान है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी शांत रहावे. सन्मा. सदस्य आपण आपले शब्द मागे घ्यावे.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांनी विनंती नाही सुचना केलेली आहे की, शब्द मागे घ्या म्हणून मा. उपमहापौर साहेब यांनी विनंती केलेली आहे मा. सभागृहाच्या भावना मी लक्षात घेतो. कारण एक सभागृह चालवते वेळी निश्चित सांगतो की, हे सभागृह आनंदाने, खेळीमेळीने चालावे. आमचे काही दुमत नाही. या सभागृहात जे चांगले निर्णय होतील ते सगळे एकमताने व्हावे. असे ही आहे. पण सत्तेच्या जोरावर आपण काहीतरी बोलतो मा. उपमहापौर साहेब यांना मला जाणीव द्यायची होती. मी तुम्हाला माहितीसाठी सांगतो की, त्यांना सकाळी आल्यानंतर सांगितले होत की, मी काहीच बोलणार नाही आणि त्यांनी सांगितले की, मी तुम्हाला जाणूनबूजून उठवेन असे त्यांनीच सांगितले होते. म्हणून मी ती संधी घेतली. मी तेवढी हिंमत नाही करणार. मा. महापौर मॅडम यांना पण बोलायची हिंमत करणार नाही. मा. आयुक्त साहेब यांनासुद्धा बोलायची हिंमत करणार नाही, मा. उपमहापौर साहेबांना सुद्धा बोलायची हिंमत करणार नाही आणि सचिव साहेब यांना पण सुद्धा बोलायची हिंमत करणार नाही ते डायस आहे ते वेगळे आहे. हे सभागृह वेगळे आहे. अन्यथा काही कोणाला मला तुम्ही सत्ताधारी पक्ष काम करतो, करत नाही, आरोप करणे हे तर आम्ही किती वर्ष झाले करतो आणि अजुन करू. याच्यात असे कोणाला वाटत असेल की,.....

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका) साहेब, तुम्ही मुद्याचे बोला.

**रोहीदास पाटील :-**

अकार्यक्षमता हा शब्द अपशब्द नाही अपमानित नाही. पण या सगळ्या सभागृहाचा मान ठेवावा अशा निष्कर्षाने जर एखाद्याची भावना दुखवण्याची फार जिवाला लागत असेल तर मी अपेक्षा करतो की, तो कार्यक्षम होईल. अकार्यक्षम हा शब्द परत बोलायची पाळी आणणार नाही आणि हा विषय इथे संपला.

**हॅरल बोर्जीस :-**

कार्यक्षम आहे. कार्यक्षम होणार नाही कार्यक्षम आहोत.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर. ठरावावर सही केलेली आहे.

**रतन पाटील :-**

सुचना द्या.

**प्रकरण क्र. ०५ :-**

प्राथमिक विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

सध्याच्या विज्ञान युगामध्ये मानवाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. माहिती व तंत्रविज्ञानमध्ये देखील प्रगती झाली आहे. चालू स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकून राहण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान ह्या बरोबरच संगणकाची देखील आवश्यकता निर्माण झाली आहे. संगणक शिक्षण घेणे ही काळाची गरज होवून बसली आहे. मिरा भाईंदर शहरातील प्रत्येक शाळेमध्ये संगणक शिक्षण सुरु झालेले आहे. मात्र महापालिकेच्या असलेल्या २९ शाळांमधील ९,६५६ शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत संगणक शिक्ष्ज्ञण मिळत नसल्याने ते विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. महापालिका विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान नसल्याने हे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडत आहेत. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य पुढील शिक्षण व उज्वल भविष्यासाठी स्पर्धेच्या युगामध्ये पुढे टिकून राहण्यासाठी प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देणे अत्यावश्यक आहे.

महापालिकेकडे संगणक तज्ञ नाहीत, संगणक शिक्षण नाहीत, संकणक दुरुस्ती करणारा स्टाफ नाही. ही कामे नियमितपणे महापालिकेद्वारे करणे अशक्य आहे. संगणक शिक्षण (ठेका पद्धतीने) देणाऱ्या नामांकित संस्था मुंबईत व इतरत्र मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा संस्थांकडे संगणक तज्ञ व संगणक शिक्षण व पुरेसा स्टाफ उपलब्ध असतो. संगणक शिक्षण देण्यासाठी प्रस्तावास नमुद केल्याप्रमाणे भांडवली व नैमित्तिक खर्च मोठ्या प्रमाणावर करावा लागणार असल्याने तो (गुंतवणूक करावा लागणारा खर्च, व्याप्ती) विचारात घेता संगणक शिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित अनुभवी संस्थेकडून १० वर्षे मुदतीसाठी ठेका पद्धतीने निविदा मागवून संगणक शिक्षण देण्यास हि सभा मंजूरी देत आहे. तसेच संगणक शिक्षण देणेसाठी प्रस्तावास नमुद केल्याप्रमाणे खालील प्रमाणे संगणक लॅब बांधणे आवश्यक आहे. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडून रितसर होणे आवश्यक आहे. त्याकरिता येणाऱ्या खर्चाचा तपशिल व अंदाजपत्रकिय खर्च खालीलप्रमाणे असून सदर खर्चास व अंदाजपत्रकांना प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे. सदर कामांसाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यांत आली आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये संगणक लॅब बांधण्यास अंदाजपत्रकीय खर्च**

| अ.क्र. | प्रभाग क्र. | शाळेचे नांव | सिव्हील वर्क | इलेक्ट्रीक वर्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३ | काशी मराठी शाळ क्र. ४ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| २ | १३ | काशी उर्दु शाळा क्र. ५ | | | |
| ३ | ०८ | नवघर मराठी शाळा क्र. १३ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| ४ | ०८ | नवघर हिंदी शाळा क्र. २९ | | | |
| ५ | ०२ | मुर्धा मराठी शाळा क्र. २२ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| ६ | ०२ | मुर्धा खाडी गुजराथी शाळा क्र. २३ | | | |
| ७ | ०२ | राई मराठी शाळा क्र. २५ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| ८ | ०२ | राई गुजराथी शाळा क्र. २६ | | | |
| ९ | १७ | भाईंदर मराठी शाळा क्र. १६ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| १० | १७ | भाईंदर गुजराथी शाळा क्र. १८ | | | |
| ११ | १७ | भाईंदर हिंदी शाळा क्र. १७ | | | |
| १२ | १० | काजूपाडा मराठी शाळा क्र. ३ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| १३ | १३ | मिरा मराठी शाळा क्र. २० | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| १४ | १२ | पेणकरपाडा मराठी शाळा क्र. १४ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |

| अ.क्र. | प्रभाग क्र. | शाळेचे नांव | सिव्हील वर्क | इलेक्ट्रीक वर्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १५ | ११ | माशाचा पाडा मराठी शाळा क्र. १९ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| १६ | १० | घोडबंदर मराठी शाळा क्र. ९ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| १७ | १० | रेतीबंदर मराठी शाळा क्र. २७ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| १८ | १० | वर्सोवा मराठी शाळा क्र. २८ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| १९ | १० | चेणा मराठी शाळा क्र. १० | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २० | १२ | मिरारोड गुजराथी शाळा क्र. २१ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| २१ | २५ | गोडदेव मराठी शाळा क्र. ८ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २२ | २४ | खारी मराठी शाळा क्र. ६ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| २३ | ०६ | बंदरवाडी मराठी शाळा क्र. १५ | रु. ४,१२,९६३/- | रु. ३०,३५१/- | रु. ४,४३,३१४/- |
| २४ | ०१ | मोर्वा मराठी शाळा क्र. २४ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २५ | १८ | उत्तन मराठी शाळा क्र. १ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २६ | १८ | उत्तन उर्दू शाळा क्र. २ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २७ | ०१ | मोर्वा मराठी शाळा क्र. २४ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २८ | ०१ | चौक मराठी शाळा क्र. ११ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| २९ | ०१ | डोंगरपाली मराठी शाळा क्र. १२ | रु. १,५१,४४५/- | रु. ३०,३५१/- | रु. १,८१,७९६/- |
| | | | | **एकूण** | **रु. ७०,५८,००६/-** |

प्राथमिक शाळांचे सन २००६-०७ हे शैक्षणिक वर्ष जून २००६ पासून सुरु होत असून ह्या वर्षापासूनच संगणक शिक्षण सुरु करणे आवश्यक असल्याने शैक्षणिक वर्ष सुरु होण्यासाठी राहिलेला कालावधी अल्प असल्याने सदर कामे युद्धपातळीवर करणे अनिवार्य ठरत आहे. ह्या सर्व तातडीच्या बाजू विचारात घेता सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावानुसार तातडीने कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. शशिकांत शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(लंच टाईम दुपारी ०२.३० वा.)**

**मा. महापौर :-**

सभेला सुरूवात करावी.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, जे काही संगणका विषयी आरोप केले होते. त्याचा पुरावा मी आपणास दिलेला आहे. त्या पत्राचे वाचन करून सगळ्या सभागृहाला संघटीत करा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये यापूर्वी पहिल्या सत्रामध्ये जी काही चर्चा सुरू होती आणि आता श्री. सन्मा. सदस्यांनी जी काही मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे मा. महापौर मॅडम यांनी दिलेल्या आदेशानुसार मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या बाबतीमध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी दि. २४/०५/२००४ ला एक पत्र पाठवले आणि त्या पत्रामध्ये असा उल्लेख केला होता की, हे जे संगणक आहे ते प्रशासन अधिकाऱ्यांनी तिथल्या मुख्याध्यापकांना जे पत्र पाठवले होते. ते पत्र मी आपल्याला वाचून दाखवतो. (पत्राचे वाचन केले.)

**शुभांगी नाईक :-**

त्याच्यामध्ये स्पष्ट दिलेले आहे की, ते शाळेमध्ये दिलेले आहे.

**केशव घरत :-**

आमदार साहेबांचे पत्र बघा.

**शुभांगी नाईक :-**

पण ते त्याच्यातुन पळवून नेलेले नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

आमदार साहेबांच्या घरी कम्प्युटर नाही. म्हणून तर ते नेले.

**केशव घरत :-**

आमदार साहेबांचे पत्र वाचून दाखवा.

**रतन पाटील :-**

तुम्ही अकार्यक्षम बोलतात ते त्या वेळेला.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या गोंधळ घालू नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभागृहामध्ये जे पत्र दिलेले आहे ते वाचून दाखवा.

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहामध्ये एकच पत्राचे वाचन झालेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

कलेक्टरच्या आदेशानुसार आलेले लेटर आहे.

**रतन पाटील :-**

पत्र वाचा अजुन चार पत्र आहेत ते पण वाचा.

**मा आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना मी विनंती करतो. मा. आमदार सितारामजी भोईर यांच्या लेटर पॅड वर दि. १२/०६/२००४ रोजी त्यांच्या सहीनिशी पत्र दिलेले आहे. (पत्राचे वाचन केले).

**शुभांगी नाईक :-**

आमदारांने शाळेला दिलेले पत्र इकडे आलेले आहे. संगणक शाळेला दिलेले ते इकडे चूकून आलेले आहे. असे त्याच्यामध्ये त्यांनी उल्लेख केलेला आहे.

**मा आयुक्त :-**

सन्मा. सदस्य माझे आधी ऐकून घ्या. याबाबतीमध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी जे आदेश काढले होते दि. २४/०५/०४ ला त्या अनुसार आमदार साहेबांचे प्रतिनिधी जवळ संगणक मिळाल्यानंतर मा. आमदार साहेबांच्या लेटरपॅडवरती त्याची पोच म्हणून हे त्यांनी पत्र दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पुढिल विषयाला सुरूवात करा. सदस्य आपण बसून घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मग तो विषय आपण काढायला नको पाहिजे होता.

**मोहन पाटील :-**

दिलेले निर्णय हे स्पष्ट झाले की, नाही. सन्मा. सदस्य मी तुम्हाला बोललो होतो की, तुम्ही शब्द मागे घ्यावे. असे शब्द......

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी चुकुन दिलेले संगणक असतील. असे आमदार साहेब, सांगत असतील तर ते त्यांच्या वैयक्तिक प्रतिनिधींकडे कशाला मागितले. शासनच्या कलेक्टरच्या ऑफिस मार्फत ही संगणक पोच झाली. शासनाची चुकी झाली. शासनाच्या मार्फतच ते मुंब्रा शाळेला द्यायला पाहिजे होते. वैयक्तिक प्रतिनिधी येवून घेवून कसा जावू शकतो.

**रतन पाटील :-**

त्या शाळेत पद्धत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

याची चौकशी झाली पाहिजे.

**रतन पाटील :-**

शासनाकडे माणूस आहेतच कुठे?

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, संगणक किंवा कोणतीही वस्तु आमच्या खात्यातून दिलेली शासकीय नियंत्रणा द्वारे दिली जाते. वैयक्तिक व्यक्तीद्वारे दिली जात नाही. त्यामुळे त्या गोष्टीची चौकशी झाली पाहिजे.

**रतन पाटील :-**

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एवढी माणसे मोकळी बसलेली नाही की ते इथे येवून चौकशी करतील.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, हे संगणक त्या शाळेला पोहोचले की नाही. ह्याची देखील चौकशी झाली पहिजे. ह्याची शहानिशा झाली पाहिजे. असे आम्ही मागणी करित आहोत. वैयक्तिक प्रतिनिधीद्वारे नेलेले आहेत. त्यामुळे संशयाला वाव आहे या गोष्टीची चौकशी व्हावी. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जर नेले असते तर आमचे काही दुमत नव्हते. ते वैयक्तिक प्रतिनिधीद्वारे नेलेले आहे. त्यामुळे संशयास वाव आहे. या गोष्टीची चौकशी व्हावी.

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०६ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो हे जे घनकचरा जवळ झोपडपट्टी आहे त्या लोकांना तुम्ही कुठे हलवणार आहात किंवा त्याचे काय करणार? जेव्हा घनकचरा प्रकल्प मंजूर झाला ते ठिकाण मंजुर झाले तेव्हा मी हा प्रश्न विचारला होता की, त्या लोकांचे तुम्ही काय करणार? आता सुद्धा तो प्रश्न तसाच आहे. तिथल्या लोकांचे तुम्ही काय करणार? एवढा जरा आम्हाला खुलासा करून द्या.

**दिपक खांबीत :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपल्याला जी मा. जिल्हाधिकाऱ्यांची जागा मिळालेली आहे ती झोपडपट्टीची जागा वगळून आपल्याला इतर जागा मिळालेल्या आहेत. ते आहेत तसेच राहणार ना?

**जोजफ घोन्सालविस :-**

तिथे तुम्ही भाईंदरचा सगळा कचरा टाकणार एखादा ढोर वगैरे मेलेले टाकणार.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, विषय १५ मिनिटाच्या रस्त्याचा विषय प्रस्तावित करणेबाबत आहे. मॅडम हा रस्त्याचा विषय आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. सभागृह नेता साहेब, तुम्ही सुद्धा तिथले जवळचेच आहेत आणि ते लोक पण तुमचेच आहेत आता रस्ता केला म्हणजे तिकडे कचरा टाकायला सुरूवात होईल.

**दिपक खांबीत :-**

प्रकल्प झाल्यावरती.

**जोजफ घोन्सालविस :-**

झाल्यावरतीच ना, ते लोक तिथेच राहणार तुम्ही तिथे एखादा ढोर वगैरे टाकणार. हे तिथे लोक वास घेत राहणार. ती लोक तिथे खरोखर वास घेत राहतील का? आम्हाला माणूसकीच्या नात्याने सांगा ना ते वास घेत कसे राहणार?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांच्या मनामध्ये जी एक शंका आहे त्या बाबतीमध्ये मी थोडेसे निरःसन करू इच्छितो की, हा जो प्रकल्प आपल्याला मा. जिल्हाधिकाऱ्यांनी जागा दिलेली आहे. त्या जागेमध्ये आपल्याला आपण एक वेगळ्या प्रकारचा प्रकल्प तयार करणार आहोत. आपण जे म्हणता की, शहराला संपुर्ण कचरा काढायचा आणि तिकडे टाकायचा आणि तिथून दुर्गंध वगैरे सुटेल आणि आजुबाजुच्या नागरिकांना त्रास होईल तर तसे काही होणार नाही. त्याठिकाणी आपण प्रकल्प तयार करतो आणि त्या प्रकल्पामध्ये आपण त्याच्यावरती प्रक्रीया करणार आहेत.

**जोजफ घोन्सालविस :-**

साहेब, असे आहे की, तुम्ही किती ही प्रकल्प प्रक्रीया करा. मी नाशिकमध्ये बघितलेले आहे. वास तो येतोच. आरोग्याच्या दृष्टीने अतिशय तिथल्या लोकांच्या आरोग्याला तो धोका आहे. आपण जरा तिथून शिफ्ट करावे, एखादी जागा द्यावी. असे तसे होत असेल तर भाईंदर शहरामध्ये का नाही केले? तिथे जाण्यात असे काय होते.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या.

**जोजफ घोन्सालविस :-**

आम्ही बसू. पण जरा माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेबांनी खुलासा केला ना.

**जोजफ घोन्सालविस :-**

आरोग्याचा प्रश्न आहे. तुम्ही मला समाधानकारक उत्तर द्या ना. त्या लोकांचे काय करायचे?

**मोहन पाटील :-**

आता विषयामध्ये तो विषय आलेला आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

विषय हाच आहे की कचरा नेण्यासाठी......

**मोहन पाटील :-**

आपण ठराव प्रस्तावित करायचा की, हा विषय त्यांना आपल्या दालनामध्ये बोलवून आपण सविस्तर माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

आपण बोललेला विषय वेगळा आहे. हा रस्त्याचा विषय आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

मा. महापौर मॅडम, मी विचारलेल्या प्रश्नाचे काय? शिंदे साहेब असताना ह्याच डायसवरुन सांगितले होते की, चारशे बाय चारशे मीटरचा प्लॉट प्रस्तावित करुन देतो. तशी तिथे काय स्थिती दिसत नाही. मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. सभागृह नेते साहेब आपण नंतर बोला.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रशासनाने उत्तर दिलेले आहे ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, आम्ही काय समजायचे? आमचे ऐकले जात नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी प्रशासनाला, तुम्हाला, मला नागरिकांच्या आरोग्याच्या विषयी अतिशय तळमळ आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या विषयी दखल घेतली नाही तर त्याचे काय दुष्परिणाम होतील, काय होणार नाहीत. ह्याचा पूर्ण प्राप्त अहवाल प्रशासनाला प्राप्त झालेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग तसे आम्हाला तेथून सांगा ना. मॅडम, काय समजायचे आम्ही? आम्हाला काहीतरी सांगा ना.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०६ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ०६ :-**

मंजूर विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मौजे-उत्तन व पाली स.क्र. ६५ स.क्र. २५ एकूण क्षेत्र ३१.४६ हेक्टर या जागेतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता मंजूर विकास योजनेत फेरबदल करुन १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणे.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि. १४/०५/९७ रोजी मंजूर झाली असून दि. १५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजुर झाली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मौजे-पाली स.क्र. ६५ क्षेत्र १०.७२ हे. व मौजे-उत्तन स.क्र. २५ क्षेत्र २०.७४ हे. असून एकूण क्षेत्र ३१.४६ हे. आहे. ही शासकीय जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता मिळणेबाबत जागा मागणी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि. २१/१२/२००२ रोजी सादर करण्यात आला होता. सदरची जागा मागणीच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र. महसूल/कक्ष-१/टे-१/एलबीपी/कवि-१५७२/२००२, दि. २६/१२/२००२ अन्वये आगाऊ ताबा देणेबाबत मंजुर झाले असून दि. ३१/१२/२००२ रोजी उपरोक्त नमुद क्षेत्रासाठी ७/१२ अभिलेखात इतर हक्कात मिरा-भाईंदर महानगरपालिका नाव नोंदविण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनविभागाने घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० तयार केले असून सदर नियमांची अंमलबजावणी करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. सदरच्या नियमानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा दि. २१/१२/२००२ पुर्वी ताब्यात असणे बंधनकारक होते. त्या अनुषंगाने विहित कालमर्यादेत महानगरपालिकेने जागा ताब्यात घेतली आहे. तथापी सदर जागेत जाणे-येणेसाठी पोहच रस्ता उपलब्ध नसल्याने मोजणी नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-उत्तन स.क्र. १७८ डी व स.क्र. ४३ सी हि.क्र. १ स.क्र.१७८सी, स.क्र.२९७ या खाजगी मालकीच्या जागेतून १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर जागेचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजूर विकास योजनेत १५.०० मी. रुंद रस्ता आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदलाची कार्यवाही करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०७ चे वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, सर्वप्रथम या ठिकाणी प्रशासन आणि महापौर, उपमहापौर यांचे अभिनंदन करतो. कारण विकास नियंत्रण नियमावली गेल्या जवळ जवळ दोन वर्षापासून आपण तयार करुन त्याच्यामध्ये आत्याधुनिक असे बदल सुचवले होते व आता तो संपूर्ण ड्राफ्ट फायनल मंजुरीला आपल्याकडे आलेले आहे. मधल्या काळामध्ये आपण जाहिर नोटीस काढून, जाहिर सुचना काढून हरकती आणि सुचना मागवल्या होत्या आणि त्या हरकती सुचनांनुसार ज्या दुरुस्त्या आहेत त्या आपण सुचवलेल्या आहेत आणि हे दोन्ही ड्राफ्ट आज सभेमध्ये याठिकाणी सभेच्या मंजुरीसाठी आलेले आहे. तत्पूर्वी या पालिकेने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष असे बदल केलेले आहेत त्याचा मी थोडासा संदर्भ देत आहे. सर्वप्रथम म्हणजे उत्तन सारख्या गोडदेव, नवघर अशा या गावठणामध्ये जेव्हा आम्हाला परवानगी घ्यायची गरज पडते. एखादे घर दुरुस्तीला आले तर आमच्याकडे कुठलेही कागदपत्रे नसतात. आमची घरं ही गावठणामध्ये असली किंवा सरकारी जागेमध्ये असली तरी पुर्वपार असल्याने त्याचे कुठलेही कागदपत्र आमच्याकडे नसतात. त्यावेळी महापालिका हे आम्हाला नविन घर बांधायला देत नाही. त्यावेळी सांगते की, आपण दुरुस्ती परवानगी घ्या आणि दुरुस्तीच्या परवानगीच्या अंतर्गत मग कसे ही आर.सी.सी. बांधा. मग त्याच्यावर तक्रारी होतात. अशाप्रकारे ह्या प्रश्नावर पडदा टाकण्यासाठी खास करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १२२ अन्वये ज्या गावातील किंवा ज्या शहरातील जे गावठण क्षेत्र आहेत ते गावठण म्हणून याठिकाणी त्यांची व्याख्या निश्चित करुन त्याची तरतुद आपण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केलेली आहे. त्याच्यामुळे यापुढे गावठणामध्ये कुठलेही बांधकाम करताना किंवा दुरुस्ती करताना किंवा नविन घर बांधताना त्याच्याकडे असलेले जे कागदपत्र उदा. घरपट्टी किंवा जर वाद असला तर आजुबाजुंच्या लोकांचे ना-हरकत दाखला ह्याच्या आधारावर ह्याला महानगरपालिका ही परवानगी देऊ शकेल. ह्याच्यानंतर महत्वाचे म्हणजे ज्यावेळी काही इमारती धोकादायक किंवा पडायला लागल्या आहेत अशा इमारतीच्या रि-कन्स्ट्रक्शनच्या बाबतीत पुर्नबांधणीच्या संदर्भामध्ये आपल्याकडे विकास नियंत्रण नियमावलीमध्यें तरतुद नव्हती. ती आपण ह्या ठिकाणी घेतलेली आहे. त्यानंतर नविन बांधकाम परवानगी देताना एखाद्या इमारतीची प्लींथ जर ठरवायची असेल तरती प्लींथ काय हाईटला असावी? कारण बऱ्याचशा इमारती आहेत. उदा. शांती पार्क आहे, सेक्टर नं. ४, ५, ६ हे दरवर्षी बुडते, पाण्यामध्ये जाते. पुर्वी जेव्हा बांधले तेव्हा असे वाटत होते की ह्या इमारती फार उंचीवर बांधलेल्या आहेत. असे चार-पाच वर्षांनी प्रत्येक नविन भाग हा पाण्याखाली जातो. त्याच्यामुळे त्यठिकाणी त्या इमारतीचा जो पाण्याचा निचरा होतो, गटाराचे पाणी किंवा पावसाचे पाणी हे इमारतीपासून निचरा होऊन जात नाही. अशावेळी ह्या इमारतींना बांधकाम परवानगी देताना कंटोम ह्यांच्या ज्या लेव्हल्स आहेत त्या लेव्हल देऊन त्यांना आपण परवानग्या देणार आहोत. अशा नविन बांधकामासाठी जर एक्सेस असेल तर तो एक्सेस कशा पध्दतीचा असावा अशा सगळ्या तरतुदी या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे फिटनेस सेंटरचेसुध्दा याठिकाणी प्रत्येक बिल्डींगमध्ये फिटनेस सेंटर असावे. त्याच्यानंतर आपल्याकडे हारवेस्टींग वॉटर ही योजना प्रत्येक बिल्डींगमध्ये असावी, पार्कींग असावे. अशा सगळ्या तरतुदी या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केलेल्या आहेत. जे आजच्या तारखेला सगळे म्हणजे मुंबईसह सर्व शहरामध्ये ज्या ज्या विकास नियंत्रण नियमावली लागू आहेत. त्याच्यामध्ये हे अत्याधुनिक आहे आणि सर्व तरतुदीने उपलब्ध अशी विकास नियंत्रण नियमावली आहे आणि ह्या विकास नियंत्रण नियमावलीला अंतिम मंजूरी देण्यास ह्या सभेने मंजूरी द्यावी असा मी याठिकाणी ठराव मांडतो व नंतर ज्या कोणाला चर्चा करायची असेल तर करु द्या. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेबाबत. ठराव, मिरा भाईंदर शहराची.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण आपल्या सुचना मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी ठराव मांडतो त्याच्यावर काय बदल असेल तर काय हरकत नाही. म्हणजे हा ठराव निगेटीव्ह नाही.

**मा. महापौर :-**

ठराव सभागृह नेते मांडतील. आपण आपली सुचना मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला जर ठराव एक्सेप्ट करायचा नसेल तर करु नका. मी कुठल्याही विरोधाने ठराव मांडत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, मी ठरावाचे वाचन करतो. त्याच्यामध्ये जर काही अतिरिक्त बदल असेल तर कृपया सन्मा. सदस्यांनी त्याच्यावर दुरुस्ती सुचवावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

सर्वांचा हा नैसर्गिक न्याय आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य या ठरावामध्ये आपल्या काही सुचना असतील तर त्या नमुद करुन घेतल्या जातील.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला वाटल्यास सुचना म्हणून घ्या. तुम्हाला वाटल्यास तो ठराव म्हणून घ्या. काही तुम्हाला वाटेल तसे तुम्ही घ्या.

**मा. महापौर :-**

सुचना म्हणून आपण ते मांडा.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रकरण क्र. ०७, ठराव, मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९६/८४७/सीआर/९६/नवी-१२, दि. १५ मे १९९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/९४१/ सीआर-८९/९८/नीव-१२, दि. २५ ऑगस्ट २००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि. १५ जुलै १९९७ व दि. १५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे. त्यानंतर दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर मिरा भाईंदर महानगरपालिकेत झालेले आहे. त्यामुळे सदर विकास नियंत्रण नियमावलीत प्रशासकीय स्वरुपाचे फेरबदल करणे आवश्यक झाल्यामुळे शासनाकडे मंजुरीसाठी विहित कार्यवाही करुन प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(५) अंतर्गत तरतूदीनुसार शासन निर्णय क्र. टीपीएस-१२०४/७११/सीआर-२१९/०५/नवी, दि. ०३ ऑगस्ट २००४ अन्वये मंजुरी दिलेली अहो. अशा प्रकारे वरीलप्रमाणे मंजूर झालेली विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सद्यस्थितीत अंमलात व अस्तित्वात आहे. सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल व काही नवी तरतुदी सामाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी मा. महासभा ठराव क्र. ०८, दि. १३/०४/२००५ रोजी प्रस्तावास मंजूरी दिलेली होती. त्या अनुषंगाने दि. २६/११/२००५ रोजी दैनिक नवशक्ती व दै. वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिर सुचना देवुन सबंधितांच्या सुचना व हरकती मागविलेला होत्या. तसेच सदर सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०८/१२/२००५ प्रसिद्ध झालेल्या होत्या. त्या अनुषंगाने काही सुचना व हरकती प्राप्त झालेल्या होत्या. सदर सुचना व हरकतदारांची सुनावणी दि. ०३/०२/२००६ रोजी घेवून प्रस्तावित फेरबदलासह विकास नियंत्रण नियमावलीची मसुदा पुस्तीका पृष्ठ क्र. (१ ते २०५) तयार करण्यात आलेली आहे. सदर पुस्तिकेत खालीलप्रमाणे दुरुस्ती / बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | विनियम क्र. | दुरुस्ती / बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ४(vi) | वगळण्यात यावे |
| २ | ८१ | ३४.२-ब | निवासी बांधकाम २५% मर्यादित ठेवणे.<br>सार्वजनिक इमारती ४०% च्या मर्यादित. |
| ३ | १६६ | अनुसूची - ए<br>ए - ९ | ४०% ऐवजी ८०% |
| ४ | ७६ | ३१(१) | सोबत जोडलेल्या पुरवणीप्रमाणे |

सोबत जी पुरवणी जोडलेली आहे त्या पुरवणीमध्ये जास्तीत जास्त एफ.एस.आय. ज्याठिकाणी बाकी आहे. त्याठिकाणी किती वापरण्यात येईल त्यासंदर्भातला उल्लेख आहे त्याचे टेबल आहे. जनरल आणि स्पेशल रेसीडेनशियल झोन आहे त्याच्यामध्ये एक एफ.एस.आय. कमीत कमी आणि जास्तीत जास्त दोन इंडस्ट्रीयल झोन आय-वन आणि आय-टू ह्याच्यामध्ये ०.७५ मिनिमम आणि जास्तीत जास्त एक. जे कन्झेस्टेड एरिया असतील त्याच्यामध्ये जर कुठलाही वापर असेल तर कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त एकच. व्यापारी वाणिज्य झोनसाठी कमीत कमी एक जास्तीत जास्त १.७५. इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी ह्याच्यासाठी कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त दोन अशाप्रकारे हे बदल सुचविण्यात येत आहेत. तसेच सदर पुस्तिकेतील टंकलेखन व तत्सम चुका दुरुस्त करुन सदर प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूरी मिळणेकरिता शासनास सादर करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, विकास डेव्हलपमेंट कंट्रोल..........

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे ठरावाचे वाचन केले त्यांच्या दृष्टीने ठराव किंवा दुरुस्ती सुचना. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी ज्या ठरावाचे वाचन केलेले आहे त्याच्यामध्ये फक्त अनु. क्र. ४ मध्ये बदल अपेक्षित केलेला आहे. पूर्ण ठराव त्यांनी ज्यापध्दतीने माझ्याकडे जो ठराव आहे, तशाचा तशा एकही शब्द ह्याच्यामध्ये मागे पुढे नाही. फक्त पाटील साहेब, अनु क्र. १ वर आपण ४ चा रोमन ५ बोलले त्या ठिकाणी ६ आहे. आपण बोलताना ५ बोललात.

**प्रफुल्ल पाटील :-**

रोमन ६ आहे. चुकीने बोललो.

**हॅरल बोर्जीस :-**

फक्त त्यांनी अनु. क्र. ४ वर पुष्ठ क्र. ७६ वर जो बदल दिलेला आहे. तो मला वाटतो दुरुस्तीच्या स्वरुपामध्ये या सभागृहासमोर या ठरावात अंतर्भूत करावा आणि पूर्ण ठराव सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी वाचलेला आहे. तशाचा तसा ठराव आहे. मी ठरावाचे वाचन करत आहे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, मागच्या मा. महासभेमध्ये ह्या डी.सी. रुल संदर्भात असाच प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळेला सभागृहाच्या मताने मा. महापौरांनी, सर्वांनी सभागृहाने विनंती केली होती की, हा डी.सी. रुल मराठीमध्ये करण्यात यावा. अशी सर्व सभागृहाने एकमताने मागणी केलेली होती. पण आज ते परत इंग्रजी भाषेमध्ये आलेले आहे. मराठीमध्ये का केले गेले नाही? त्याबद्दल मा. महापौरांनी खुलासा करावा. कारण सभागृहाने मागणी केली होती की, पुढच्या वेळेला तुम्हाला मराठीमध्ये करुन दिले जाईल. राज्य शासनाचा व्यवहार मराठीमध्ये चालतो आणि इथे मराठीची मागणी केली जाते तरीसुध्दा आपणाकडून दिले जात नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीमध्ये मी खुलासा करु इच्छितो की, डी.सी. रुल्स डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स जे आहेत ते शासनाने जे पब्लिश केलेले आहे तेसुध्दा इंग्रजीमध्येच आहे. त्याचे मराठीकरण अजुनपर्यंत झालेले नाही.

**रतन पाटील :-**

तसे करा ना. येथे सभागृहाची तशी मागणी आहे.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, मागच्यावेळी मराठीमधून आम्ही करु असा उल्लेख केलेला आहे.

**रोहीदास पाटील :-**

मागच्यावेळी सभागृहाला आश्वासन दिले होते की, हे मराठीतुन होईल.

**रतन पाटील :-**

राज्य शासनाचा कारभार मराठीमध्ये चालतो व हे मराठीमधून कारण्यात यावा असे सगळे एकमुखीय मा. महासभेमध्ये ठराव होतो तरीसुध्दा आपण हे इंग्रजीमधून देता.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आपले जे कायद्याचे नियम आहेत. लॉचा जो ॲक्ट जो आहे तो इंग्रजीमध्ये आहे. आपल्या बुध्दीच्या वरुन जाईल. फार काळजी करु नका. कळणार नाही. पण त्या सगळ्या प्रोव्हिजन इंग्रजीमध्ये आहे आणि त्याचे भाषांतर करुन जर आपण स्विकारले तर त्याचे भाषांतर केल्यानंतर शब्दाचा अर्थ बदलल्यानंतर त्यातुन वेगळा कायदा निर्माण होईल म्हणून हे असे केलेले आहे आणि मागच्या सभेमध्ये आल्यानंतर चर्चा झाली आणि भाषांतरासाठी आपण एकदा डी.सी रुल रिजेक्ट केलेले आहे. आता ठराव पारित झालेला आहे. त्याच्यामुळे तुमचा विरोध आहे अशातला भाग नाही. तुमची जी उत्सुकता आहे तर आयुक्त साहेबांना सभागृहाच्यावतीने मी विनंती करतो की, यथावकाश फक्त आपल्या माहितीसाठी त्याच्यावर आपला कायदा डिसाईड होणार नाही. फक्त आपल्या माहितीसाठी ते अनुवादीत करावे अशी विनंती करतो.

**रतन पाटील :-**

होय आणि त्याच्यामध्ये साहेब, दोन सुचना डी.सी. रुल्समध्ये नोंदवून घ्या. इमारत नकाशा पास करताना रेन वॉटर हारवेस्टींग तसेच टीम एटींग प्लान सादर करण्यात यावे तर त्यांना इमारत परवानगी द्यावी असे त्याच्यामध्ये नमुद करा. पावसाच्या पाण्याचे नियोजन कशा पध्दतीने व्हावे अशी जी योजना आहे.

मागच्यावेळेला महापालिकेने त्याबाबत केशव सृष्टीमध्ये एक शिबीर लावले होते. तर निश्चितच पुढील विकासासाठी आणि पुढील भविष्यासाठी हे निश्चितच आपल्याला फायदेशीर राहिल. कारण आज पाण्याची दिवसेंदिवस...........

**मुक्ता रांजणकर :-**

साहेब, ते फायदेशीर आहे हे सगळ्यांना माहित आहे. तुम्ही आता ते पुढचे बोलू नका.

**रतन पाटील :-**

तुम्ही बोलू नका. मी. मा. महापौरांशी बोलतोय. आम्ही सांगतोय ना. आम्हाला जे बोलायचे तेवढेच बोलतोय.

**मुक्ता रांजणकर :-**

का बोलू नका. जे झाले आहे ते सगळ्यांना माहित आहे आणि जे झाले ते चांगलेच झाले आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याला बोलायला मॅडम वेळ देणार आहेत.

**मुक्ता रांजणकर :-**

काय वेळ देणार आहेत?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या. आपल्या सुचना समाविष्ट करुन घेतल्या जातील.

**रतन पाटील :-**

मॅडम, मला बरेचसे बोलायचे आहे.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, ते सुचना सांगत आहेत. जरा ऐकून घ्या.

**रतन पाटील :-**

मी काय तुम्हाला विरोध करत नाही, सुचना करत आहे. पान क्र. १७० ह्याच्यामध्ये आर्कीटेक्ट, इंजिनियर, सुपरवायझर, सर्व्हेअर ह्या सर्वांची कार्यप्रणाली येथे दिलेली नाही. सुपरवायझर प्लान सबमिट करु शकतो का? सर्व्हेअर प्लान सबमिट करतो का? आज येथे .......

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांच्या ज्या दुरुसत्या असतील त्या कृपया त्यांनी लेखी् स्वरुपामध्ये प्रशासनाला सादर करावे ते अधिक चांगले होईल.

**रतन पाटील :-**

आपण बोलायचे आणि आम्ही आमच्या सुचना लेखी स्वरुपामध्ये द्यायच्या हा एवढा पॅराग्राफच चुकीचा आहे. जर आर्कीटेक्ट प्लान सबमिट करतोय. तर आपले सुपरवायझर आणि इंजिनियर येथे सादर करत आहे. इमारतीचे प्लान सबमिट करायला कोणी यायला पाहिजे? ओर्कीटेक्टने यायला पाहिजे. येथे सुपरवायझर आणि सर्व्हेअर येथे प्लान सबमिट करत आहेत. ही मिरा भाईंदर महानगरपालिकेची अवस्था आहे. ह्याच्यात दुरुस्ती व्हायला पाहिजे. अनधिकृत बांधकाम का निर्माण होत आहे. जर सुपरवायझर येथे प्लान सबमिट करत असतील तर ही परिस्थिती अशीच येणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार मा. विलासराव देशमुख साहेबांनी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात सदनामध्ये प्रश्न उपस्थित केला की, मिरा भाईंदरमध्ये अशी अनधिकृत बांधकामे का होत आहेत? ह्याच्यावर थोडासा विचार करा.

**नरेंद्र मेहता :-**

ह्याचा आणि डी.सी. रुल्सचा काय संबंध आहे?

**रतन पाटील :-**

झाली, त्याच्यावर चर्चा झाली.

**मोहन पाटील :-**

सन्मा. मुख्यमंत्री साहेबांनी तो प्रश्न उपस्थित केलेला नाही.

**रतन पाटील :-**

त्याच्यावर उत्तर दिले. चर्चा झाली. का चर्चा झाली? ही अवस्था कशाला झाली? मिरा भाईंदर महानगरपालिकेची अवस्था त्या सदनामध्ये येण्याची गरजच काय झाली? ह्याला जबाबदार कोण?

**मोहन पाटील :-**

आता बोलायला लावू नका.

**रतन पाटील :-**

मला साहेबांच्या वादात जायचे नाही. फक्त मला असे बोलायचे आहे की, ही जी परिस्थिती आहे, मला निर्दशनास आले की आर्कीटेक्टच हा प्लान सबमिट करु शकतो. त्याच्याकडे डिग्री आहे आणि इंजिनियर जो आहे तो सिव्हील. त्याने फक्त त्याच्या कंट्रक्शनचे प्लानिंगच करायचे आहे. बाकी सुपरवायझर आणि हे जे आहेत ते फक्त प्लान सबमिट करत आहेत. महापालिकेची ही अवस्था होईल. मॅडम हे जे दोन पॅरेग्राफ आहेत.......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या सुचना समजलेल्या आहेत. आपण लेखी स्वरुपात अजून सुचना असतील त्याही पाठवून द्या. आता आपण बसून घ्या.

**रतन पाटील :-**

मॅडम, हे दोन पॅरेग्राफ ह्यातुन वगळावे आणि निश्चितच ह्यातुन जनतेला एक चांगला संदेश जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, खरं म्हणजे डी.सी. रुल इंग्रजीत व्हायला पाहिजे. कारण समजा, एखादा शब्द असला मिस अंडरस्टॅन्डीग. तर ह्याची वाक्य रचना हाईल की, मुलगी खाली उभी आहे. आपण ट्रान्सलेट करायला गेलो तर त्यामुळे हे इंग्रजीतच असायला पाहिजे. मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बरेचसे क्षेत्र सी.आर.झेडमध्ये गेलेले आहे. सी.आर.झेड.मध्ये आपले पब्लिक रिझर्व्हेशन, प्ले ग्राऊंड रिझर्व्हेशन गार्डन रिझर्व्हेशन, आपले स्पोर्ट कॉम्प्लेक्स आणि इतर रस्ते, नाले बराचसा पार्ट सी.आर.झेडमध्ये गेलेला आहे. त्या सी.आर.झेडला येथे टी.डी.आर. देण्याची काहीच प्रोव्हीजन केलेली नाही. जे पब्लिक आरक्षण आहे ते आपल्याला नको का?

**दिलीप घेवारे :-**

डी.सी. रुलमध्ये घेता येणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तरतुद केलेली आहे. ९१०.

**नरेंद्र मेहता :-**

आपण साडे सतरा करोडचा जो रस्ता मंजुर केलेला आहे. आपण जे टेंडर कॉल केले होते त्यातला बराचसा भाग सी.आर.झेड.मध्ये आहे.

**दिलीप घेवारे :-**

ते रस्ते आपण मंजुरीकरिता गर्व्हरमेंटकडे दिलेले आहें. त्याला जर मंजुरी मिळाली तर टी.डी.आर. देता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जे आता सांगितले की, गर्व्हरमेंटकडे आपण रस्ता बनवण्यासाठी मंजुरी मागितली आहे की टी.डी.आर. देण्यासाठी, मंजुरीसाठी मागितली आहे?

**दिलीप घेवारे :-**

एकच आहे. गर्व्हमेंटकडे जर रस्त्याला परवानगी दिली म्हणजे टी.डी.आर. आले.

**नरेंद्र मेहता :-**

आपले जे एक्झस्टींग आहेत आणि सी.आर.झेडमध्ये गेलेले आहेत त्याचे काय करायचे? एक्झस्टींग रोड आहे त्याचे टी.डी.आर. किंवा कुठल्याही प्रकारचे बेनीफिट घेतलेले नाही. त्या रस्त्याचे आपण काय करणार?

**शुभांगी नाईक :-**

आरक्षणामध्ये ज्या इमारती बांधल्या गेल्या आहेत त्या काढा. त्या वगळून टाका.

**रतन पाटील :-**

ज्या जुन्या बिल्डींग आहेत त्याच्यावर आता प्लानिंगमध्ये डी.पी. रोड टाकले आहे. उद्या जर ती जुनी बिल्डींग तुटणार तर त्याची परिस्थिती काय होणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता बरेचसे रोड असे आहेत की जेथुन लोक ये-जा करतात आणि तिथे कुठल्याही प्रकारचे लॅन्डलॉर्डने किंवा बिल्डरने सी.आर.झेडच्या रस्त्यांचा फायदा घेतलेला नाही.

**दिलीप घेवारे :-**

डेव्हलपमेन्ट प्लान हा १९९७ साली मंजुर झालेला आहे. सी.आर.झेडचे प्लान हे आता २००५ साली आलेले आहे. त्याच्यामुळे ती गोष्ट नंतर झालेली आहे. परंतु, जर ठाणे व मुंबईमध्ये दोन सी.आर.झेड. झोन झाले ते येथे सी.आर.झेड. तीन झाले. जी इनवारमेंटल कमिटी असते. त्यावर प्रधान सचिव पर्यावरण विभागाचे असतात. मी तिथे गेलो होतो व त्यांनी मला सांगितले की, हा भाईंदर उत्तन जो रस्ता आहे. हा १९३० पासून ग्राऊंड नकाशावर आहे आणि त्याच्या ह्या बाजुचा भाग म्हणजे लॅन्डवेल साईडचा भाग हा सी.आर.झेड. दोन आवश्यक होता. ज्याप्रमाणे मुंबई आणि ठाण्यामध्ये झालेले आहे. पण येथे दुर्देवाने तो भाग सी.आर.झेड. तीनमध्ये टाकला गेला आहे. त्याच्यामुळे तिथे काही डेव्हलपमेन्ट नाही. वास्तविक आम्ही ज्यावेळी विकास करण्याचे नकाशे सादर केले. जसे भाईंदर स्टेशन आहे ते आपल्या माहितीनुसार शंभर वर्षापासून स्टेशन आहे. पूर्वी लोक बैलगाडीतुन स्टेशनला जायचे आणि मुंबईला जायचे. तर ते स्टेशनसुध्दा सी.आर.झेड. तीनमध्ये आहे. आपली ही इमारत आहे, जुनी इमारत आहे तीसुध्दा सी.आर.झेड. तीनमध्ये आहे. आपण एक सर्वकश प्रस्ताव तयार करत आहोत आणि हे सगळं सी.आर.झेड. तीनचे दोनमध्ये ट्रान्सलेट करण्यासाठी कनव्हरशन

करण्यासाठी गर्व्हरमेंटला पाठवत आहोत. आता एक्झस्टींगसाठी हा सगळा प्रस्ताव आणि २३३ घोडबंदर आहे त्यातलासुध्दा अर्धा भाग सी.आर.झेडमध्ये आहे. कलेक्टरांनीसुध्दा सुचना दिलेली आहे की आपण हा सगळा प्रस्ताव पाठवा. आपण सगळा सर्व्हे करुन ज्यावेळेस हा विकास झालेला आहे आणि हा सी.आर.झेड पूर्वीचा आहे किंवा नकाशे येण्याचा पूर्वीचा आहे असे दाखवून आपण ते कनव्हरशन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणार आहोत. त्यावेळेस हा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर करणार आहोत. त्यावेळेस आम्ही तुमच्यासमोर ह्या सगळ्या गोष्टी ठेवू.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, एखाद्या बिल्डरने किंवा एखाद्या लॅन्डलॉर्डने खाजगी रस्ता बंद करुन टाकला तर आपण त्यावेळी काय करणार? आज जो रस्ता लोक वापरतात तो रस्ता एखाद्या लॅन्डलॉर्डने बंद करुन टाकला. कारण आपण त्यांना टी.डी.आर. देत नाही किंवा कुठल्याही प्रकारचे कॉम्पोझिशन देत नाही. तर रस्ता बंद केला तर आपण काय करणार?

**दिलीप घेवारे :-**

अशा परिस्थितीमध्ये आपण गर्व्हरमेन्टला एक स्पेशल प्रस्ताव पाठवू शकतो. विशेष बाब म्हणून. आमची अशी-अशी अडचण झाली आहे. हे सार्वजनिक काम आहे त्याला आपण परवानगी द्यावी असे शासनाला पत्र लिहू शकतो.

**नरेंद्र मेहता :-**

कमीत कमी जे एक्झीस्टींग रोड आणि जे रिझर्व्हेशन आहे. त्यांना तरी सध्या टी.डी.आर.चा बेनिफिट देण्यात यावा.

**दिलीप घेवारे :-**

बेनिफिटचा तो वेगळा प्रस्ताव होऊ शकतो. तो डी.सी. रुलमध्ये येणार नाही. त्याचा आपण वेगळा प्रस्ताव करु आणि मान्यता आणू.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, आपण आता पावसाळ्याच्या वेळी आपण त्याच प्रॉपर्टी मधून नाले आणि गटार खोदायला जाणार त्यावेळी जाऊ देणार नाही. आतापर्यंत तशी प्रथा होती. ठिक आहे, रोड आहे. आज नाहीतर उद्या तिथे गटार बनवायचे आहे. रोड बनवायचे आहे. त्या हिशोबाने द्यायचे आता ते जाऊ देणार नाही. ते बोलतील सी.आर.झेड. आहे. तुम्हाला ती जागा नको तर आम्हालाही ती द्यायची नाही. मग त्यावेळी आपण काय करणार? आता आपण जे ऐंशी लाखाचे घेतले आहे. एक्झीस्टींग मिरा भाईंदर आणि खाडीमध्ये मशीन लावून, जे.सी.बी. लावून करणार त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात सी.आर.झेडचा भाग आहे. तर कुठलाही लॅन्डलॉर्ड तुम्हाला त्याच्यात जाऊ देणार नाही.

**मा. आयुक्त :-**

नैसर्गिक नाले जे आहेत ते नैसर्गिक नाले वाहतच राहणार आहे. त्याची साफसफाई तर आपल्याला करायचीच आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्याकडे नैसर्गिक नाले हार्डली कमीच आहेत. त्याच्यापेक्षा आपण पावसाळ्यात जसे पाहिजे तसे नाले खादेत असतो. जिकडे तिकडे डी.पी. रोड आहे त्याला लागून नाले खोदतच असतो. नैसर्गिक नाल्यामधून आपले पूर्ण पाणी जात नाही.

**मा. आयुक्त :-**

आता घेवारे साहेबांनी जो काही खुलासा केला त्या खुलासाच्या बाबतीमध्ये मागच्या आठवड्यामध्ये शासनाचे पत्र आलेले आहे की, सी.आर.झेड.च्या बाबतीमध्ये जे काही तुमचे प्रस्ताव असतील किंवा ज्या काही सुचना असतील त्या सगळ्या सुचना आपण घेणार आहोत आणि हे सन्मा. सभागृहाच्या निर्देशनाला आणून सन्मा. सभागृहाच्या ज्या सुचना ह्या बाबतीमध्ये असतील त्या सुचना आपण शासनापर्यंत कळवणार आहोत. हा विषय मी स्वतंत्र आपल्यासमोर ठेवणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे फक्त ऐवढेच म्हणणे आहे की, पावसाच्यावेळी आपल्याला अशा कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. जर कोणी एखाद्याने स्टे ऑर्डर आणली किंवा काय आणले तर सगळे भाईंदर डुबेल. त्याकरिता त्याची विशेष काळजी घेण्यात यावी.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, गेल्यावर्षी जेंव्हा आपण डी.सी. रुल्स काढले होते तेव्हा आणि आता शासनाने कन्व्हेन्स लेटरच्या बाबतीत धोरण निश्चित केले आहे. कारण बऱ्याचशा बिल्डींग अशा आहेत ज्याच्यामध्ये वर्षानुवर्ष लोक राहतात आणि ती बिल्डींग तुटल्यानंतर जो तिथला स्थानिक लॅन्डओनर्स असतो. तो कनव्हेन्स लेटर देत नाही. त्याच्यामुळे त्या पब्लिकची तारांबळ उडते. त्याच्याबद्दल शासनाचे काय धोरण निश्चित केले आहे का? कनव्हेन्स लेटरच्या बाबतीत आणि गेल्या पंधरा दिवसात ही

जिल्हास्तरीय न्यायालयामध्ये असे पास झाले की, चार महिन्याच्या आत सोसायटी झाल्यानंतर कनव्हेन्स लेटर देण्यात यावे. त्याच्याबद्दल माहिती द्यावी.

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याच्यामध्ये मेन मुद्दा असा आहे की, ह्याच्यामध्ये धोकादायक बिल्डींग आहे व त्या बिल्डींगचा लॅन्डलॉर्ड भाईंदरचा असेल किंवा इथला असेल तरी तो कनव्हेन्स लेटर देतच नाही. येथे वीस-वीस वर्षे जुनी बिल्डींग आहे आणि त्याच्यामध्ये परत कन्स्ट्रक्शन करायचे असेल........

**मुक्ता रांजणकर :-**

देतच नाही आणि खुप पैसे वगैरे मागतात. त्याच्यामुळे बिल्डींग परत निर्माण करता येतच नाही, बनवता येतच नाही.

**रिटा शाह :-**

परत कन्स्ट्रक्शन करायचे असेल तर शेवटी प्रश्न तिथे येऊन अडकतो की, तो बिल्डर आहे तो जागेचा परत मालक होऊन बसतो. आता तसे दोन प्लॉट ओपन पडलेले आहेत जे धोकादायक होते आणि तिथले रहिवासी बिचारे कोण झोपडपट्टीमध्ये जाऊन राहतात, कोण कुठे जाऊन राहतो. अशी परिस्थिती आहे. त्याच्यामध्ये डी.सी. रुलमध्ये तुम्ही.......

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, बरेचसे प्लॉट्स आहेत. दोन लाईन अजून बरेचसे मिरा भाईंदरमध्ये आहे.

**रिटा शाह :-**

संपूर्ण बिल्डींग डिमॉलिश करुन झाल्यानंतर ते काम तिथे अडकले आहे. कारण बिल्डरने कोर्टात जाऊन स्टे घेतला आहे की, ही जमीन माझी आहे आणि बिल्डींगचे रहिवासी सर्व रस्त्यावर आले.

**मा. आयुक्त :-**

जर समजा, या बाबतीमध्ये कोर्टामध्ये प्रकरण चालू असेल तर संबंधित बिल्डरच्या किंवा रहिवाशांच्या बोलण्यावरुन ते झालेले असेल तर त्याबाबतीमध्ये आता आपण वाच्यता करणे बरोबर नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, त्यांच्याबद्दल सांगत नाही. पण.........

**मा. आयुक्त :-**

जे कोणी भाडेकरु असतील त्यांना त्यांची बाजु मांडावी लागेल व त्यांनी ते कोर्टाच्या लक्षात आणून द्यावे.

**रिटा शाह :-**

साहेब, ते ठिक आहे. तुम्ही त्यांना सहकार्य करणार पण पुढे भविष्यात काय? आपण आपल्याकडे सर्व्हे करा. आपल्याकडे धोकादायक बिल्डींग भरपूर आहेत.

**मा. आयुक्त :-**

आहेत.

**रिटा शाह :-**

मग त्या लोकांना त्रास होणार नाही. कारण शेवटी कनव्हेन्स येते आणि कनव्हेन्स कुणाकडेही नाही आणि बिल्डर देत ही नाही. मग आता परत ते आपल्याकडे प्लान पास करायला येणार तर आपण प्लान सोसायटीच्या बेसवर पास करुन घ्या. तो जमीन मालक कोण? डेव्हलपर्स कोण? कनव्हेन्स कोणाचे? आणि राहणारे कोण? असा शेवटी तोत्रिक मुद्दा उपस्थित होतो.

**मा. आयुक्त :-**

याबाबतीत कायद्यामध्ये जर तशी काय तरतुद असेल व सभागृहाच्या ज्या भावना असतील त्या सभागृहाच्या भावना आपण संबंधित ॲथोरिटीजना कळवु या.

**रतन पाटील :-**

साहेब, तरतुद करावी लागेल. लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे आपल्याला तरतुद करावी लागेल. कारण धोकादायक इमारती मिरा भाईंदर शहरामध्ये शेकडोने आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

साहेब, कायद्यात तरतुद नाही असे तुम्ही सांगितले. हे चुकीचे उत्तर आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, धोकादायक इमारतीचा विषय याठिकाणी आहे. त्यावेळी त्या विषयावर चर्चा करा.

**रतन पाटील :-**

साहेब, ते डी.सी. रुलमध्ये टाकायचे आहे. ते डी.सी रुलमध्ये आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

विषय निघाला म्हणून मी बोलतोय, कायद्यात तरतुदी नसतील तर बिल्डर आपल्याकडे प्लान पास करायला येतो तेव्हा आपण त्याला आपण कायदा दाखवायला पाहिजे की नाही. जे बिल्डर कनव्हेन्स न करता

ॲग्रीमेन्टवर बिल्डींग बांधायला देतात, अशी वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे की, आज ज्याच्या नावावर बिल्डींग जुनी झाली. आत्ताच्या बिल्डींग पंधरा-वीस वर्षात जुन्या होतात. त्या तोडायला आल्यानंतर मालक तयार होतो व मालकाचे नाव आतापर्यंत नाही. ते कोणी कनव्हेन्स केले का? ॲग्रीमेंटवर आपण प्लान पास करतो आणि ह्याचा मोठा भुर्दंड या शहराला बसणार आहे आणि गर्व्हरमेंटला कलेक्टरचे लोक पैसे खाऊन प्लान पास करुन देतात. पण त्या कनव्हेन्सचे कोण विचार करत नाही. करोडो रुपये कलेक्टरचेही डुबले जातात. पण त्रास मात्र या शहरवासियांना होणार आहे. जे रहायला लोक आलेले आहेत त्यांच्याबद्दल आपल्याला सहानुभूती दाखवायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, मिरा भाईंदर शहरामध्ये शेकडोने बिल्डींग धोकादायक झालेल्या आहेत. आपण कोणाकोणाला बाहेर काढणार? आणि किती बिल्डींग तोडणार आहात? त्याच्यासाठी निश्चितच तजवीज करावी लागणार आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम, तुम्ही ह्यानाच सारखे बोलायला देणार का?

**रतन पाटील :-**

धोकादायक इमारतीचा तो प्रश्न आहे......

**मिलन पाटील :-**

मॅडम, तम्ही ह्यांना खाली बसवा.

**मुक्ता रांजणकर :-**

आम्ही शिस्त बाळगतो. आम्ही किती वेळा खाली बसायचे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मॅडम, नाहीतर त्यांना एकट्यानांच बोलू द्या.

**रतन पाटील :-**

मी मिरा भाईंदर शहराच्या धोकादायक इमारती संदर्भात बोलत आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

आपण बोलत असताना आपल्या मध्ये कोणी बोलले होते का? मग तुम्ही का बोलता? आणि अजून किती वेळा बोलणार?

**रतन पाटील :-**

धोकादायक इमारतीबाबत भाईंदरवासयिंच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आज सगळे रस्त्यावर पडलेले आहेत. तुम्ही आदेश देऊ नका. तिथे मा. महापौरांकडे बोला. आम्हाला बोलायचा तुम्हाला अधिकार नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

तुम्ही बसा.

**रतन पाटील :-**

तुम्ही पण बसा ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या. आपल्याला बोलायची संधी देऊन झाली आहे. आता आपण बसा.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, धोकादायक बिल्डींगच्या संदर्भात मला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

आपण सर्वांनीच खाली बसून घ्या.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये धोकादायक इमारतीचा मोठा गहन प्रश्न आहे. आज त्यांनी जो एफ.एस.आय. वापरला आहे त्याच्याबद्दल........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, मा. महापौरांचा सभागृहात मानसन्मान ठेवा.

**दिलीप घेवारे :-**

ज्यावेळेस प्लान पास होतो त्यावेळेस कुठलेही फ्लॅट्स विकलेले नसतात, बांधलेले नसतात. त्यांनतर तिथे बिल्डींग बांधली जाते. लोकांना विक्री केली जाते. तिथे फ्लॅट, सदनिकाधारक रहायला येतात त्याच्यानंतर त्यांची सोसायटी होते. त्याच्याआधी कनव्हेन्स होऊ शकणार नाही आणि एकदा ती सोसायटी रजिस्टर झाली की, त्या सोसायटीचे काम आहे कनव्हेन्स करुन त्या बिल्डरच्या मागे लागणे. ह्याच्यासाठी अडचण झाली तर जसे सन्मा. सदस्या मुक्ता रोजणकर मॅडम बोलल्या, तर पेपरलाही वाचले. पण शासनाचा निर्णय, आदेश मी अजून बघितलासुध्दा नाही. पेपरला लोकमतला परवा मी वाचले.

**मुक्ता रांजणकर :-**

घेवारे साहेब, आपण तशी माहिती मागवून घ्यावी.

**दिलीप घेवारे :-**

कन्व्हेन्सची ही तरतुद आहे ती महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅट ॲक्ट खाली आहे. ह्याची जी तरुतुद आहे. डी.डी.आर. बसलेले असतात. त्यांचे नियंत्रण असते. एकदा सोसायटी झाली की, त्याच्यावर त्यांचे नियंत्रण असते आणि ते बिल्डरला त्याच्यासाठी सजा करु शकतात. बरेच सदस्यांना त्याची माहिती आहे. ते अपील करुन तेथुन निर्णय आणतात. पण ती मपा ॲक्टची कार्यवाही आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जेव्हा त्याने कन्व्हेन्स केलेले नाही व जेव्हा ॲग्रीमेंट रजिस्टर करतो. तो माणूस ज्याने ब्लॉक घेतला तो तिथे साडे तीन, चार लाख रुपये टाकतो तो रजिस्टर झाला तरीसुध्दा त्याच्यावर ते शेवटी लादले जाते ना.

**मिलन पाटील :-**

सन्मा. तुळशीदास म्हात्रे साहेब, कायद्याने तो गुन्हा आहे. जर त्याने रजिस्टर, कन्व्हेन्स करुन दिले नाही तर कायद्याने गुन्हा आहे. सोसायटीने त्या बिल्डरकडे मागणी करावी की, तु आम्हाला कनव्हेन्स करून द्या आणि त्या मालकाने जर कन्व्हेन्स करून दिले नाही तर फौजदारी गुन्हा होऊ शकतो. साहेब, हे बरोबर आहे ना. हा फौजदारी गुन्हा होऊ शकतो. कायद्यामध्ये तशी तरतुद आहे. आपण सोसायटीची तशी मागणी करायला पाहिजे. सोसायटीने जर मागणी केली नाही तर कसे होणार?

**शशीकांत शाह :-**

इसके बारे मे जो बिल्डिंग बनाते है और रहनेके लिए आने के बाद मे सोसायटी को, बिल्डर्स को नोटीस देके वह कनव्हेन्स करना चाहिए बाकी का कोई उपाय होनेवाला नही है। इसतरह के हजारो बिल्डिंग मिरा भाईंदर मे नही तो बम्बई मे है और महाराष्ट्र मे है यह नियम है की, सोसायटी को बिल्डरको नोटीस देकर हॅन्डओव्हर करके जब बिल्डर वह टाईम पे बोलते है सोसायटी होल्डरको के कन्व्हेन्स करके लो। उनको स्टॅम्प ड्युटी भरणी पडती है। वह करते नही है। उसीके वजहसे वह डरते है। बाकी कोईभी हमने सोसायटी वालोको जागृत करना चाहीए और वह कन्व्हेन्स करेंगे तो ही होनेवाला है। हम उसके उपर बंधन नही डाल सकने वाले है।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, मिरा भाईंदर शहरामध्ये जेवढ्या जुन्या इमारती आहेत त्या जुन्या इमारतीमध्ये एन.ए., यु.एल.सी. किंवा प्लॅन सॅक्शन ह्या बाबी नाही. जेव्हा सोसायटी निर्माण झाल्यानंतर आपण जेव्हा कन्व्हेन्स करतो त्या कन्व्हेन्ससाठी ज्या अटी आहेत. यु.एल.सी. पाहिजे, एन.ए. पाहिजे आणि ह्या दोन्ही बाबी त्या नसतात. त्याच्यामुळे बिल्डरकडून, त्या लॅन्ड ओनरकडून कन्व्हेन्स होत नाही आणि त्याच्या माथी ते प्रश्न येतात. म्हणून त्या बिल्डींग कन्व्हेन्स झाल्या नाहीत तो प्रश्न महत्वाचा आहे. म्हणून त्या बिल्डींगमध्ये एन.ए. व यु.एल.सी. असायला पाहिजे. मिरा भाईंदरमध्ये ५० ते ७० टक्के अशा इमारती आहेत की त्याच्यामध्ये एन.ए. आणि यु.एल.सी. नाही. म्हणून त्या बिल्डींग कन्व्हेन्स झाल्या नाहीत.

**रतन पाटील :-**

जुन्या इमारतीला कशासाठी मागता? जुन्या इमारतीला गरजेचे नाही.

**मिलन पाटील :-**

मॅडम, आपण जी नियमावली बनवलेली आहे. ती इतकी उत्कृष्ट आणि चांगली आहे. ही नियमावली कायद्याच्या चौकटीत बसून ही नियमावली बनवलेली आहे. याच्यामध्ये सर्वसाधारण नागरिकांचा फायदा आहे आणि महानगरपालिकेचासुध्दा फायदा आहे. या अशा पध्दतीने ही नियमावली बनवलेली आहे आणि श्री. घेवारे साहेबांसारखे जानकार असे चांगले अधिकारी मिळालेले आहेत आणि त्यांनी चांगली नियमावली बनवलेली आहे. त्यांनी जे सी.आर.झेड.च्या बाबतीमध्ये आपल्याला सांगितलेले आहे तर त्याच्याबद्दल आपण शासनाकडे आपली बाजू मांडून सी.आर.झेड. दोनमध्ये आपले वर्गीकरण करावे ही मी त्यांना विनंती करतो.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ७ चा ठराव सभागृह नेते हॅरल बोर्जीस ह्यांनी मांडलेला ठराव तसेच सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी मांडलेली उपसुचना घेऊन त्यांना विनंती करण्यात येते की, सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस हे सुचक व सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हे अनुमोदक राहतील. ठराव एकमताने मंजुर.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, मला ह्याच्यावर बोलायचे आहे. आता मा. महासभेमध्ये ठराव क्र.६६ च्या वर झालेला होता. त्याच्यावर अजूनपर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. गाळे संदर्भातला आपल्या महासभेचा एक ठराव आहे. आम्हाला बोलू द्या. आम्हाला बोलायचे आहे. आम्ही अजुनपर्यंत बोललेलो नाही.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**रोहीदास पाटील :-**

चर्चा करायची नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला प्रायव्हसी आहे. असे काय करता? ठराव क्र.६६ वर कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

**मा. महापौर :-**

बसून घ्या. सकाळपासून तुम्ही खुप बोललात. आता तुम्ही बसा. सचिवजी पुढील विषयाचे वाचन करा.

**रोहीदास पाटील :-**

डी.सी. रुलमध्ये सुचना द्यायच्या नाहीत? ज्या त्रुटी असतील त्या सांगतो. तुम्ही चुकीच्या सुचना नाही दिल्या.

**मा. महापौर :-**

सचिव विषयाला सुरुवात करा.

**प्रकरण क्र. ०७ :-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह काही भाग वगळून शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९६/८४७/सीआर/९६/नवी-१२, दि. १५ मे १९९७ अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/९४१/ सीआर-८९/९८/नवी-१२, दि. २५ ऑगस्ट २००० अन्वये शासनाने मंजूर केलेली आहे. सदर विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दि. १५ जुलै १९९७ व दि. १५ ऑक्टोबर २००० पासून अंमलात आलेली आहे.

त्यानंतर दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी मिरा भाईंदर नगरपरिषदेचे रुपांतर मिरा भाईंदर महानगरपालिकेत झालेले आहे. त्यामुळे सदर विकास नियंत्रण नियमावलीत प्रशासकीय स्वरुपाचे फेरबदल करणे आवश्यक झाल्यामुळे शासनाकडे मंजुरीसाठी विहित कार्यवाही करुन प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१(५) अंतर्गत तरतूदीनुसार शासन निर्णय क्र. टीपीएस-१२०४/७११/सीआर-२१९/०५/नवी, दि. ०३ ऑगस्ट २००४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. अशा प्रकारे वरीलप्रमाणे मंजूर झालेली विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सद्यस्थितीत अंमलात व अस्तित्वात आहे.

सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल व काही नवी तरतुदी सामाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करण्यासाठी मा. महासभा ठराव क्र. ०८, दि. १३/०४/२००५ रोजी प्रस्तावास मंजूरी दिलेली होती. त्या अनुषंगाने दि. २६/११/२००५ रोजी दैनिक नवशक्ती व दै. वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिर सुचना देवुन सबंधितांच्या सुचना व हरकती मागविलेला होत्या. तसेच सदर सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०८/१२/२००५ प्रसिद्ध झालेली होत्या. त्या अनुषंगाने काही सुचना व हरकती प्राप्त झालेल्या होत्या. सदर सुचना व हरकतदारांची सुनावणी दि. ०३/०२/२००६ रोजी घेवून प्रस्तावित फेरबदलासह विकास नियंत्रण नियमावलीची मसुदा पुस्तीका पृष्ठ क्र. (१ ते २०५) तयार करण्यात आलेली आहे. सदर पुस्तिकेत खालीलप्रमाणे दुरुस्ती / बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | विनियम क्र. | दुरुस्ती / बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ४(vi) | वगळण्यात यावे |
| २ | ८१ | ३४.२-ब | निवासी बांधकाम २५% मर्यादित ठेवणे.<br>सार्वजनिक इमारती ४०% च्या मर्यादित. |
| ३ | १६६ | अनुसूची - ए<br>ए - ९ | ४०% ऐवजी ८०% |
| ४ | ७६ | ३१(१) | सोबत जोडलेल्या पुरवणीप्रमाणे |

सोबत जी पुरवणी जोडलेली आहे त्या पुरवणीमध्ये जास्तीत जास्त एफ.एस.आय. ज्याठिकाणी बाकी आहे. त्याठिकाणी किती वापरण्यात येईल त्यासंदर्भातला उल्लेख आहे त्याचे टेबल आहे. जनरल आणि स्पेशल रेसीडेनशियल झोन आहे त्याच्यामध्ये एक एफ.एस.आय. कमीत कमी आणि जास्तीत जास्त दोन इंडस्ट्रीयल झोन आय-वन आणि आय-टू ह्याच्यामध्ये ०.७५ मिनिमम आणि जास्तीत जास्त एक. जे कन्झेस्टेड एरिया असतील त्याच्यामध्ये जर कुठलाही वापर असेल तर कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त एकच. व्यापारी वाणिज्य झोनसाठी कमीत कमी एक जास्तीत जास्त १.७५. इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी ह्याच्यासाठी कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त दोन अशाप्रकारे हे बदल सुचविण्यात येत आहेत.

तसेच सदर पुस्तिकेतील टंकलेखन व तत्सम चुका दुरुस्त करुन सदर प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूरी मिळणेकरिता शासनास सादर करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०८ चे वाचन केले.)

**रोहीदास पाटील :-**

ठरावात तुम्ही मांडू दिले असते तर. या ठरावामध्ये आम्हाला सुचना द्यायच्या आहेत का नाही द्यायच्या आहेत?

**मा. महापौर :-**

सुचना लेखी पाठवून द्या.

**रोहीदास पाटील :-**

ते प्रोसिडींगला आले पाहिजे. लेखी अनेक पत्रे दिलेली आहेत त्याची उत्तरेच तुम्ही देत नाही. असे का म्हणता?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या ठरावाचे पालन झालेले नाही. ह्या ठराव क्र. ६६ वर प्रशासनाने काय कार्यवाही केली?

**रोहीदास पाटील :-**

या ठरावाला आम्ही मंजुरी देत नाही. आपण हा ठराव मतदानाला टाका.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला टाका.

**मा. महापौर :-**

आपला विरोध नोंदवून घेतला जाईल.

**रोहीदास पाटील :-**

आमच्या सुचना घेणार नाही म्हणजे काय? आमच्या सुचना घ्यायला लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

चला, ठराव मतदानाला टाका.

**रतन पाटील :-**

सभागृह नेते साहेब, आपण आमच्या सुचना घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला टाका.

**रतन पाटील :-**

ठराव मतदानाला टाका. आम्ही मागणी केली आहे.

**मा. महापौर :-**

पुढच्या विषयाला सुरुवात झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे होत नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. आपण मतदानाची कार्यवाही चालू करा.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला टाका. चारच्या वर सदस्यांनी मागणी केली आहे.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, ठराव तुम्हाला घ्यायला लागेल.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्यांदा ठराव क्र. ०७ मतदानाला घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, या ठरावाला आम्ही मंजुरी देणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर आमचा विरोध नोंदवून घ्या.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही जरी कितीही बोललात तरी आमचे प्रोसिडिंगला येते ना.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन करण्यास सुरूवात केली असता सभागृहात गोंधळ.)

**रतन पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही कोर्टात जाऊ हे तुम्ही लक्षात ठेवा. या प्रकरणी घाईगर्दी करु नका. आम्हाला कोर्टात जायला लागेल. हे नागरिकांच्या हिताचे काम आहे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

आपण आमच्या सुचना घ्या ना, आम्ही कुठे विरोध दर्शवितोय. आपण आमच्या सुचना घ्या.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ०८ वर ठराव झालेला आहे आणि अनुमोदन ही झालेले आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही विरोध कुठे दर्शविला आहे का?

(सभागृहात भारतीय जनता पार्टी व जनता दलाचे नगरसेवक डायसच्या समोर आले.)

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपण कोणाची लायकी काढता?

**हॅरल बोर्जीस :-**

विषय नाही तो ठराव आहे. आपण मा. महापौरांचा अपमान केला.

**मा. महापौर :-**

सभागृहामध्ये मिलन म्हात्रे तुम्ही माफी मागितल्याशिवाय जायचे नाही. माफी मागायची. तुम्हाला अधिकार नाही डायरेक्ट बोलण्याचा.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, ह्या मिलन म्हात्रेला तुम्ही माफी मागायला लावा.

**मा. महापौर :-**

मिलन म्हात्रे यांनी गैर शब्द वापरल्याबद्दल त्यांना आजच्या कामकाजातुन बाहेर काढले जात आहे.

**एस. ए. खान :-**

निलंबित करा.

**मा. महापौर :-**

आपल्याला बोलण्याचा अधिकार नाही. आपण बाहेर निघून जा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर साहेबा, सभागृहाच्या कामकाजाबद्दल त्यांना निलंबित केले तर त्यांना बोलण्याचा अजिबात अधिकार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

निलंबित करण्याचा अधिकार आहे का? आम्हाला बोलायला देता का तुम्ही? लोकशाही आहे उगीच बोलता. उगीच बोलता आम्ही मेयर पदाचा मान राखतो ह्याचा अर्थ असा नाही.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, हे सभागृहामध्ये दादागीरी करतात.

**मिलन म्हात्रे :-**

मी सभागृहाच्या बाहेर जाणार नाही. कोणती तरतुद आहे हे तुम्ही मला दाखवा. सदस्यांना बोलू न देणे ही कोणती तरतुद आहे ती दाखवा आणि मग मी जाईन सभागृहाच्या बाहेर. तुम्ही काय, तुमच्या मेयरकडे वेळ भरपुर आहे. पॉवर भरपुर आहेत. तुमचे ठराव तुम्ही कायम केलेले नाहीत. सोडून द्या.

**आसिफ शेख :-**

लोकशाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

लोकशाहीनुसार मला जे बोलायचे आहे ते मी बोलणार.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौर मॅडम, ह्यांना तुम्ही बोलू देऊ नका.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृह म्हणजे स्वतःची खाजगी मालमत्ता नाही हे नोंद करुन घ्या.

**हेलन गोविंद :-**

तुम्ही नेहमी विषयाला सोडून कशाला बोलता?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मला ह्याच्यावर बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही कोणाच्या घरची मालमत्ता नाही.

**हेलन गोविंद :-**

घरच्या मालमत्तेचा प्रश्न येत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

त्यांनी सभागृहामध्ये आपल्याबद्दल जे वक्तव्य केलेले आहे ते आपण सगळ्यांनी ऐकलेले आहे.

**हेलन गोविंद :-**

मा. महापौरांचा अपमान आम्ही कधीही सहन करुन घेणार नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापोर साहेबा, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे सांगतात की महापौरांना सभासदाला बडतर्फ करण्याचा अधिकार नाही. हे किती सभागृहाची दिशाभूल करतात असे अधिकार अनंत आहेत. पिठासीन अधिकाऱ्याला असे अधिकार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कोण बोलले.

**लिओ कोलासो :-**

अशा पध्दतीने सभागृहाला गुमराह करण्याचा........

**मिलन म्हात्रे :-**

आमचे म्हणणे मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे. बाकी आम्ही काही बोललेलो नाही. ह्या विषयामध्ये आपण बाकीचे विषय घालू नका.

**जेन्वी अल्मेडा :-**

ह्यांच्या हाताला पकडून बाहेर काढण्यात यावे.

**मोहन पाटील :-**

त्यांनी जे अर्वाच्य अपशब्द वापरले आहेत त्यांनी महापौरांचा अवमान केला असेल तर त्यांना येथे बोलण्याचा अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला बसण्याचा अधिकार नाही. आपण सभागृह सोडून बाहेर निघून जा. गैर वर्तणूक केल्यामुळे आपण सभागृह सोडून आपण ताबडतोब बाहेर जावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण जेव्हा विरोधी पक्ष आपल्याकडे ठराव मांडायला येतात तर आम्ही सुचना मांडायची नाही का?

(सभागृहात गोंधळ)

**ग्रिटा फॅरो :-**

लायकी काढतो तर ह्याची लायकी केवढी आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

ह्याची जास्त आहे. मिलन म्हात्र येथे जास्त दादागीरी चालली आहे. तुझ्या घरी शिकव ही दादागीरी येथे नको शिकवू.

**हेलन गोविंद :-**

सभागृहामध्ये जास्त तुमची दादागीरी चालणार नाही. ह्यांना दादागीरी करण्याची सवय झाली आहे. हा असा तो तसा ह्या चेंबरमध्ये असे केले, त्याने भ्रष्टाचार केला. जसे काय ह्याच्यात हे सर्व सच्चे आहेत.

**जेन्वी अल्मेडा :-**

महापौर मॅडम, मिलन म्हात्रे यांना तुम्ही ह्या सदनातुन बाहेर काढा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, गलत शब्द वापरनेवाले को आप.......

**मोहन पाटील :-**

सन्मा. आयुक्त महोदय, या ठिकाणी सभागृहामध्ये लोकशाही पध्दतीने काम चालत असताना असे प्रकार होत असतात हे मान्य आहे. परंतु, जर एखाद्या लेडी महापौरांना एखाद्या सदस्यानें जर अवमानकारक शब्द बोलला असेल आणि ते सर्व सदस्यांना बोललेले आहे. त्याच्यावर उचित कार्यवाही झाली पाहिजे. एक लेडीज महापौर आहेत आणि लेडीज महापौर असताना असे अर्वाच्य शब्द बोलणे योग्य आहे की अयोग्य आहे? आणि अयोग्य जर असेल तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे असे आमचे आग्रही मत आहे.

**प्रभात पाटील :-**

समस्त स्त्री वर्गाची अब्रु ही वेशीवर टांगलेली आहे ह्याचा आम्ही निषेध करतो. महिलांचा हा सरासर अपमान आहे. हे आम्ही अजिबात चालू देणार नाही.

**हेलन गांविंद :-**

हा महिलांचा सरासर अपमान आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

उन्होने जो शब्द युज किया वह बहुत गलत शब्द युज किया है। महापौर मॅडम की लायकी नही है ऐसा शब्द उन्होने युज किया है।

**जेन्वी अल्मेडा :-**

बाहेर काढा ह्याला उघडा करुन.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, मिलन म्हात्रे यांना आपण बाकीच्या कामकाजातुन आजच्या सभागृहापुरते निलंबित केलेले आहे. ह्यांना तशी तुम्ही विनंती वजा सुचना सुध्दा केलेली आहे. ते जर सभागृहाच्या बाहेर जात नसतील तर संबंधित पोलिस खात्याला तुम्ही संपर्क करा आणि पोलिस बोलावून त्यांना तुम्ही सभागृहातुन बाहेर काढा.

**मिलन म्हात्रे :-**

मला ते कबुल आहे. माझी मतदानाची घटनात्मक मागणी तुम्ही फेटाळली आहे. मला हेच पाहिजे आहे पोलिसांनी येऊन मला नेले पाहिजे. पोलिस येऊन मला घेऊन गेले पाहिजे. मला हेच पाहिजे. हे सभागृह आहे. मी जाणार नाही. पोलिसांना बोलवा पोलिस येऊन घेवून जातील. हेच पाहिजे मला.

**प्रभात पाटील :-**

विषयाचे विषयांतर नको. विषय हाच आहे की त्यांनी सभागृह सोडावे. महिलेचा अपमान झालेला आहे. त्यांनी हे सभागृह सोडावे.

**मिलन म्हात्रे :-**

महिलांबद्दल मान आम्हाला कोणी शिकवू नये. महिलेचा मान करणेसुध्दा आम्हाला चांगले माहित आहे. आम्हाला हेच पाहिजे पोलिस आले पाहिजे सभागृहामध्ये.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, त्यांनी पुकारलेले शब्द मी सभागृहामध्ये बोलू शकत नाही. नाहीतर ते शब्दसुध्दा बोलून दाखवले असते. त्यांनी काय बोलले ते शब्द सभागृहामध्ये मी तुमच्यासमोर बोलू शकत नाही. अशाप्रकारचे शब्दप्रयोग त्यांनी केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी काहीही बोललेलो नाही. माझ्या तोंडातुन काही...... पोलिस आणा, मला पोलिस येऊन घेवून जातील मी काहीही बोललेलो नाही. पोलिसांना बोलवा पोलिस येऊन मला घेऊन जातील.

**जेन्वी अल्मेडा :-**

जागा सोडून, सभागृह नेते बोलत असताना मिलन म्हात्रे ह्यांनी माईक फेकला.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, आज पाच साल मे ये चौथा साल चल रहा है। इसके अंदर मिलन म्हात्रे ने हमेशा पिठासीन अधिकारी को किसको जेल मे बिठाया किसको किधर बिठाया......

**मिलन म्हात्रे :-**

औकात ही वैसी थी ना। अरे उनकी औकात वैसी थी। जेल मे बिठाया ना, औकात देखके हे सब जेल मे बैठता है। ऐसा नही कोई बैठता है।

**जेन्वी अल्मेडा :-**

सगळ्या अधिकाऱ्यांना भिती दाखवतो.

**रिटा शाह :-**

मॅडम, उसको बाहर निकालो।

**मिलन म्हात्रे :-**

आप होश मे रहकर बात करो। और किसी औरत को बदनाम करनेका मेरा इरादा नही है मैने ऐसा कुछ भी नही बोला है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

माफी मांगनेको बोलो।

**मिलन म्हात्रे :-**

कायके लिए तुम बोला इसके लिए माफी मांगनेका क्या? अपनी औरत की इज्जत करते हो क्या तुम?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, विषय पटलावरती इतर सभागृहातील कामकाज सुरळीत चालण्याकरिता कृपया सन्मा. सदस्यांना निलंबित आपण केलेले आहे. त्यांना सदनातुन बाहेर काढण्याची आपण विनंती करा.

**मिलन म्हात्रे :-**

मी अगोदरच्या तात्कालीन महापौर असताना आम्ही कधी असे वागलो नाही. कारण त्यांनी आम्हाला न्याय दिला. आमचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांची तशी इज्जत केली आम्ही. आता तुम्ही त्या इज्जतीच्या लायकीच्या नाही आहात.

**जेन्वी अल्मेडा :-**

ये बस झाली तुझी दादागिरी.

**हेलन गोविंद :-**

आता महापौर मॅडम बद्दल चांगले बोलायला लागले नाहीतर गिल्बर्ट शेट असा आणि गिल्बर्ट शेट तसा.

**जेन्वी अल्मेडा :-**

नेहमी सांगतो ॲन्टी चेंबरमध्ये जातात ॲन्टी चेंबरमध्ये ह्यांचे काय लिहून घेतले. ॲन्टी चेंबरमध्ये आम्हाला कसली भिती आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेबांना ताबडतोब सुरक्षा रक्षकांना बोलावून मिलन म्हात्रेंना सभागृहातुन बाहेर काढावे.

**मिलन म्हात्रे :-**

पोलिसांना बोलवा ना. पोलिसांना का बोलवत नाही? पोलिसांना बोलवून घ्या. सगळे नियमानुसार होऊन जाईल.

**आसिफ शेख :-**

हा उध्दटपणा आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पूलिस को बूला सकते तो पूलिस को बूलाओ।

**हॅरल बोर्जीस :-**

महापौर मॅडम, सभागृहामध्ये ज्या पध्दतीने वक्तव्य त्यांनी केलेले आहे ते त्यांनी स्वतःचे नैतीक अधिकार गमावून बसलेले आहेत. ह्या सभागृहामध्ये वक्तव्य करत असताना ........

**मिलन म्हात्रे :-**

आमचे स्वातंत्र जेव्हा तुम्ही हिरावता तेव्हा आम्ही बोलतो हे तुम्ही लक्षात ठेवा.

**हॅरल बोर्जीस :-**

वाटेल ते बोलणार ते थोडेच कोणी ऐकून घेणार आहे का?

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, हा महिलांची लायकी विचारतो. ह्याची लायकी काय इथे बसायची?

**रोहीदास पाटील :-**

या सुरक्षारक्षकांना कोणत्याही नगरसेवकाला हात लावण्याचा अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

सुरक्षारक्षकांनी मिलन म्हात्रेला बाहेर घेऊन जावे.

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही अजुन धीर धरा. या सुरक्षारक्षकांना सदस्याला हात लावण्याचा अधिकार नाही. महापौर मॅडम, चुकीचे निर्णय घेऊ नका.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील (काका), मिलन म्हात्रेंनी सन्मा. सभागृहादेखत महापौरांचा अवमान केलेला आहे.

**रोहीदास पाटील :-**

आम्हाला जेवढे माहिती आहे तेवढे आम्ही सांगतो की, ह्या सुरक्षारक्षकांना त्या नगरसेवकाला हात लावायचा अधिकार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हात थोडे लगा रहे है बाहर निकाल रहे है।

**जेन्वी अल्मेडा :-**

एका नगरसेवकांना, मिलन म्हात्रेंना, महापौर मॅडमला तुमची लायकीच नाही असे बोलण्याचा अधिकार आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

पोलिसांना बोलवा.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, एखाद्या नगरसेवकाला आपला सेक्युरिटी गार्ड हात लावू शकतो का? ते नगरसेवक तुम्हाला ओरडून ओरडून हजार वेळा बोलले की, तुम्ही पोलिस स्टेशन वरुन पोलिस मागवा मग तुम्ही का नाही पोलिस मागवत?

**ग्रिटा फॅरो :-**

आपण स्वतःहून बाहेर जा.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, आपण निमानुसार पोलिस बोलवा. हमको हात कौन लगाता है वो हम देखता है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

देखनेका है तो देखो।

**मिलन म्हात्रे :-**

बुलाओ पुलिस को। होके जाने दोना पुलिस क्यु आयी थी सदन के अंदर बादमे हम बाहर जायेंगे। हमने हमारा वोटींग की माँग किया है। और यह सुरक्षारक्षक हमारे पास आयेगा तो उनको भी हम देख लेंगे।

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम आम्हाला सभागृहात व्यवस्थित बोलू देत नाहीत. आम्ही मतदानाची मागणी केली तर मतदान करु देत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जब तक पुलिस नही आयेगी तब तक हम बाहर नही जायेंगे। है हिंमत तो पूलिस वाले को बुलाओ।

**आसिफ शेख :-**

मॅडम, आपले सुरक्षारक्षक काय करतात त्यांना आपण बोलवा आणि सांगा. सुरक्षारक्षकाला बोलवा.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना ते मार्शल नाही. ते खाली सिक्युरिटी करित बसले आहेत. तुमच्या सिक्युरिटी करिता नाही. पोलिसांना बोलवा. पोलिसांचे काम आहे. लॉ ॲण्ड ऑर्डर खराब झाली आहे. आम्ही त्यांचा अवमान केला आहे ना तर पोलिसांना बोलवा. सगळे पुरावे होऊनच द्या.

**मोहन पाटील :-**

एवढं कोण बोलू शकते. जेव्हा तुम्ही एखादे कृत्य केले ते कृत्य समर्थन करता.

**मिलन म्हात्रे :-**

शंभर कृत्य तम्ही दिवसाला करता. आम्हाला कृत्याच्या गोष्टी शिकवू नका. पोलिसांना बोलवा. एवढी हिंमत असेल तर पोलिसांना बोलवा आणि घेऊन जाऊ दे आम्हाला.

**मोहन पाटील :-**

तुम्ही पिठासीन अधिकाऱ्याला बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

पिठासीन अधिकाऱ्याने पिठासीन अधिकाऱ्यासारखे राहिले पाहिजे. आम्ही मतदानाची घटनात्मक मागणी केली आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांचा अपमान आपल्याला करता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

अपमान कसले आले. मान दिला तर मानाने रहायचे असते माणसाने.

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, हा सभासद केव्हापासून महिलांची लायकी काढतो त्याची लायकी नाही येथे बसण्याची.

**नयना म्हात्रे :-**

अहो आम्हाला लायकी शिकवू नका. तुम्ही गप्प बसा.

**रिटा शाह :-**

अहो, तुम्ही सोडा हो. तुमची काय लायकी आहे हे आम्हाला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुझी लायकी बघ. तुमच्यासारखे व्यवहार नाही उखडत आम्ही.

**रिटा शाह :-**

अहो, तुम्ही काय व्यवहार करता ते आम्हाला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

लायक्या आमच्या नाही काढायच्या. तुमच्या लायक्या काय आहे हे जरा तपासून बघा.

**रिटा शाह :-**

तुमची लायकी जाऊन बघा. दुसऱ्याची लायकी काढण्याच्या अगोदर.

**मुक्ता रांजणकर :-**

घरातपण तशी सवय झाली आहे वाटते लायकी काढायची. तेव्हा येथे पण लायकी काढता. त्यामुळे त्यांच्या तोंडातुन अचानक निघून जाते.

**मा. महापौर :-**

पोलिस विभागाच्या अधिकाऱ्यांने येथे येऊन मिलन म्हात्रे ह्या सदस्याला सभागृहातुन बाहेर काढावे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांनी सांगितले आहे. आपण पुढे या.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, संबंधित पोलिस खात्याचे जे दोन पोलिस आलेले आहेत तर सभागृहामध्ये सन्मा. महापौर मॅडमच्या अवमान प्रकरणी सभागृहामध्ये महापौरांनी रुलिंग दिल्याप्रमाणे ते सभासद या सभागृहामध्ये बसून पुढील कामकाजामध्ये भाग घेऊ शकत नाही. मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे. त्यांनी महापौरांचा अवमान केलेला आहे. अवमान होईल असे कृत्य त्यांनी याठिकाणी सभागृहामध्ये केलेले आहे आणि जे शब्द त्यांनी बोललेले आहे ते सन्मा. महापौरांनी, सभागृहाने ऐकलेले आहे. त्यामुळे त्यांना तुम्ही येऊन सभागृहातुन बाहेर काढा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, आपण पोलिसांना सांगा की, कुठल्या नियमाने कार्यवाही करता येते ते सांगा.

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेब आपण तो नियम सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

कुठल्या नियमामध्ये आहे ते सांगून करा ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये सन्मा महापौरांनी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाप्रमाणे आपण कार्यवाही करावी.

**मिलन म्हात्रे :-**

सी.आर.पी.सी नुसार तुम्ही पहिले विचारायचे की, मी काय केले आहे? मी मतदानाची घटनात्मक मागणी केली. पंधरा नगरसेवक उभे होते.

**आसिफ शेख :-**

जी काही चौकशी करायची ती सभागृहाच्या बाहेर करावी. त्यांना सभागृहातुन बाहेर काढावे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांचा आदेश आहे.

**लिओ कोलासो :-**

पोलिसांशी भांडण्यात काही अर्थ नाही. मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे. सभागृहाच्या कामकाजाप्रमाणे महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहाच्या बाहेर, त्यांना आपल्याला बरोबर बाहेर घेऊन जा.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे काम नाही आता. आता त्यांचे झाले. महापौरांचेही राहिले नाही. आता कायदा आणि महापौर हे अलग. आता पोलिस आणि आम्ही बघू काय ते. तुमचा रोल संपला. तुम्ही गप्प बसा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सदस्य म्हात्रे ह्याना आपण दोन वेळा विनंती वजा सुचना केली.

**मिलन म्हात्रे :-**

कुठलीही सुचना केलेली नाही. खोटे बोलायचे नाही. नसेल ते तोंडात घालू नका. बोलण्याचा आमचा अधिकार आम्ही डावलणार नाही.

**आसिफ शेख :-**

दोन नाही तीनदा सुचना केलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

पोलिसांना जर दाद देत नसतील तर संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याचे तुम्ही निर्देश द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या तोंडात काय घालायचे नाही. बोला ना तुम्ही मतदान करु दिले नाही. ते बोलायचे दादागिरी केली, मतदान करु दिले नाही. बाकी पुढे समर्थ आहोत आम्ही बघायला. नसते धंदे नाही करायचे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, तुमचा अपमान झालेला आहे. आपण स्वतः जाऊन तक्रार करा आणि ॲक्ट्रासिटीचा ॲक्ट लावा त्यांना. आम्ही सर्व सभासद यायला तयार आहोत.

**संगिता म्हात्रे :-**

फोनवरुन सुध्दा तक्रार घेतात.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, पोलिस खात्याचे जे दोन लोक आलेले आहेत. मला वाटते फोनवर त्यांच्या सिनियरबरोबर काहीतरी बोलणे चालू होते तर त्यांचे त्यापध्दतीचे बोलणे झाले असेल आणि वरिष्ठांचे आदेश जर त्यांना आले असतील तर कृपया त्यांना पुढील कार्यवाही करण्यास आपण सुटसुटीत करावे.

**मा. महापौर :-**

सदस्य मिलन म्हात्रे आपण स्वतःहून बाहेर जाता का? मला पुढील कार्यवाही करण्यास आपण भाग पाडता.

**मिलन म्हात्रे :-**

पोलिस आलेले आहेत ना ठरवतील ते.

**मा. महापौर :-**

पोलिसांनी आपल्याला दिलेले आदेश पाळावेत.

**मिलन म्हात्रे :-**

पोलिस आम्हाला आदेश देऊ शकत नाही. सभागृह नेते बोलले ना तसा जी.आर. येऊ दे ना.

**मा. महापौर :-**

पिठासीन अधिकारी ह्यांनी तुम्हाला आदेश दिलेले आहेत आणि कायद्यामध्ये तरतुद आहे की, पोलिस उचलूनसुध्दा सभागृहाबाहेर निलंबित करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

जाऊ दे ना. मी कुठे नाही बोलतो? पोलिसांनी करावे ते. मी तेच बोलतो.

**मोहन पाटील :-**

पिठासीन अधिकाऱ्यांनी निर्देश दिल्यानंतर आयुक्त साहेब आपल्या प्रशासनातर्फे कार्यवाही झाली पाहिजे. अशा पध्दतीचे काम आपण केले पाहिजे. सुरक्षारक्षकांना आपण निर्देश दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौरांनी सभागृहामध्ये जे आदेश दिलेले आहेत तर त्या आदेशाप्रमाणे आपण संबंधितांना बोलावलेले आहे आणि त्याप्रमाणे खरं म्हणजे पिठासीन अधिकाऱ्यांनी निर्देश दिल्यानंतर प्रत्येक सन्मा. सदस्याची जबाबदारी असते की, पिठासीन अधिकाऱ्यांनी जे आदेश निर्देशित केलेले आहे तर त्याचा आदर राखला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा पिठासीन अधिकाऱ्यांनी पोलिसांना आदेश दिलेले आहेत. आता पोलिस येतील आणि तसे ठरवतील. मला आदेश दिलेले नाहीत.

**हॅरल बोर्जीस :-**

दोन वेळा त्यांना विनंती केली.

**मिलन म्हात्रे :-**

आणि हे बघा मी स्पष्ट सांगतो मी काही बोललेलो नाही. आमचा मतदानाचा अधिकार तुम्ही हिरावलात. जे लोकशाही मार्गाने करायचे आहे ते आम्ही केले आहे. कुठल्याही प्रकारे काहीही केलेले नाही. पुरावे दाखवा.

**मा. महापौर :-**

आपण विषयांतर करु नका. आपण चुकीचे बोलता आणि आपण सभागृहासमोर खोटं बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

मला काही हे नाही. तुम्हाला काय करायचे आहे ते तुम्ही करा. मला जे करायचे आहे ते मी करतो. मी कशाला विषयांतर करणार? काही गरज नाही. आपण दादागिरी करता. आमची मतदानाची मागणी फेटाळता.

**मोहन पाटील :-**

एका महिला महापौरांना तुम्ही ......

**मिलन म्हात्रे :-**

महिला महिला सोडा हो.

**जेन्वी अल्मेडा :-**

महिला सोडा म्हणजे कसल्या महिला सोडा.

**मोहन पाटील :-**

तुम्ही त्यांचा अवमान केलेला आहात आणि तुम्हाला बी.पी.सी.एल. ॲक्ट पिठासीन अधिकारी या नात्याने आपण सभागृह सोडायला पाहिजे.

**जेन्वी अल्मेडा :-**

वाचलास तु आज.

**मिलन म्हात्रे :-**

वाचलास म्हणजे काय करणार होता.

**जेन्वी अल्मेडा :-**

एका महिलेचा अपमान करतो म्हणजे काय?

**मिलन म्हात्रे :-**

हे रेकॉर्ड करुन घ्या. वाचलास म्हणजे काय? माझा जीव घ्यायला निघाला होता की काय? म्हणजे जीव घेणार का तुम्ही? म्हणजे तुम्ही जीव घेणार होते. वाचलास म्हणजे काय? अहो तुमची लायकीच ती आहे. दुसऱ्याला मारण्याशिवाय काय ......

**रोहीत सुवर्णा :-**

वाचलास म्हणजे काय?

**हॅरल बोर्जीस :-**

महापौर मॅडम, त्यांनी आता पोलिसांच्या समोरच महिलांची लायकी काढली आहे.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, जर हे सगळ्यांची लायकी काढतात तर ह्यांची लायकी काय आहे. ह्यांची स्वतःची लायकी काय आहे हे त्यांनी महासभेत सांगावे.

(सभागृहात गोंधळ)

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी माझे सगळं...........

**शशिकांत शाह :-**

जब पोलिसको कोई ॲक्शन नही लेने का है तो आप उनको बाहर जानेके लिए बोलिए। यह अच्छा नही है महासभेमे। जब उनको ॲक्शन नही लेने का है तो वह क्यो आते है इधर।

**मुक्ता रांजणकर :-**

कायद्यामध्येपण आहे की, तुम्ही बाहेर जा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मला बोलण्याची परवानगी मिळावी. सभागृहाचे कामकाज थांबलेले आहे आणि सभागृहामध्ये जी परिस्थिती आहे मा. महापौर साहेबा मी पिठासीन अधिकाऱ्यांना विनंती करतो की.......

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, अभी बहोत हो गया अगर पोलिस स्टेशन मे ॲक्शन नही लिया तो हम उपोषण के लिए बैठेंगे, पोलिस स्टेशन के बाहर।

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, सगळ्या महिला नगरसेविका उपोषणाला बसतील.

**रिटा शाह :-**

सर्व महिला पोलिस स्टेशनच्या बाहेर उपोषणाला बसतील.

**मुक्ता रांजणकर :-**

त्याला बाहेर इकडून जावेच लागणार आहे. तो आमची लायकी दाखवतो ना. त्याची लायकी दाखवतो केवढी आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सगळ्यांची लायकी काढत रहा. ह्याची लायकी किती आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

ह्याचीपण रोज काढतात म्हणून सवय झाली आहे जिभेला.

**मा. महापौर :-**

सभागृह चालत असताना पिठासीन अधिकाऱ्यांना अर्वाच्य शब्दगाळी करणारा आणि एक पिठासीन अधिकारी, महापौर, ही महिला आहे आहे आणि ती ही मागासवर्गीयची महिला आहे. याचा गैरफायदा घेऊन नगरसेवक मिलन म्हात्रे ह्यांनी तुमची लायकी काय? महापौर आहात तुमची लायकी काय? अशा प्रकारचे शब्द वापरलेले आहे. हे गैर शब्द वापरल्याबद्दल मी येथे पोलिसांना आणि सुरक्षारक्षकांना पाचारण केलेले आहे. त्यांनी पिठासीन अधिकारी जेव्हा आदेश देतात तेव्हा ते आदेश प्रत्येकाने ऐकावे त्यांनी आदेशाचे उल्लंघन केलेले आहे आणि अर्वाच्य एका लेडीजला शिवीगाळी केलेली आहे असा हा त्यांचा स्वतःचा अपमान आहे. महापौर महिलेला जर उध्दटपणे बोलू शकता तर त्यांच्या अंगी किती शिस्त आहे ते बेशिस्तपणे कसे वागता हे त्यांनी सभागृहाला दाखवून दिलेले आहे, शिस्तीच उल्लंघन करुन.

**मिलन म्हात्रे :-**

महापौरांची दादागिरी..... कुठलाही अपशब्द वापरलेला नाही. आमचे जे हक्क आहेत ते आम्ही मागत आहेत. महापौरांना कुठल्याही भाषेत काहीही बोललेलो नाही. हे लक्षात ठेवा.

**प्रभात पाटील :-**

ह्यांना बाहेर जायला सांगा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर, आपण सभागृहाचे कामकाज अशा पध्दतीने इथल्या तिथे नेऊ नका. जे महापौरांच्या हक्काचे आहे जे नगरसेवकांच्या सन्मानाचे आहे. कायद्यामध्ये छापीत आहे हे छापलेले आहे आणि हे आपल्यावरती बंधनकारक आहे. महापालिकांच्या सभांचे कामकाज हे महापालिकेच्या मंजुर उपविधी नुसार होत आहे. मी आपल्या सभागृहाचे मुद्दामहून उपविधीकडे लक्ष वेधू इच्छित आहे आणि मी तो उपविधी जो आहे जो राजपत्रकात प्रसिध्द झालेला आहे ते कृपया आपल्याला वाचून दाखवत आहे. त्याच्यातुन जो निष्कर्ष लागेल त्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व इतर समंजस सदस्य सगळे लोक मंजूरी देतील अशी मला पूर्णपणे खात्री आहे. यामध्ये मी बी.जे.पी.च्या लोकांचा मी मुद्दामहून उल्लेख करिन, काकांसारखा एक जेष्ठ सदस्य या ठिकाणी आहे आणि अशा परिस्थितीमध्ये काका तदनूप भूमिका घेत आहेत हे काका आपल्यालासुध्दा शोभणारे दिसत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काकांनासुध्दा तुम्ही माफी मागायला लावली. तुमची काय दादागिरी आहे का? दादागिरी तुम्ही करायची आणि माफी आम्ही मागायची का? काकांनासुध्दा माफी मागायला लावली आहे. अगोदर सगळ्यांनी माफी मागायची आणि तुम्ही सगळ्यांनी दादागिरी करायची.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, उपविधीमध्ये काय सांगितले ते आपण कृपया शांतपणे ऐकाल अशी माझी आपल्याला विनंती आहे. पिठासीन अधिकारी सभागृहामध्ये सुव्यवस्था राखील आणि त्यास आपला निर्णय अंमलात आणण्यासाठी सर्व अधिकारी असतील. आपल्या निर्णयाचे पालन करण्यास नकार देणारा किंवा त्यांच्यामध्ये ज्याचे वर्तन अक्षम्य गैर शिस्तीचे असेल त्या कोणत्याही पालिका सदस्यास सभेतुन निघून जाण्याबद्दल निर्देश देता येईल आणि अशा रितीने निघून जाण्याचा निर्देश दिलेला कोणताही पालिका सदस्य तात्काळ तसे करिल आणि दिवसभराच्या उर्वरीत सभेत तो अनुपस्थित राहिल, सभेतुन निघून जाण्यास पालिका सदस्यास तो नकार देईल किंवा अशारितीने तो निघून गेल्यावर पिठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय पुन्हा सभेमध्ये उपस्थित राहील तर पिठासीन अधिकाऱ्यास सभेच्या जागेतुन उक्त व्यक्तीस सुरक्षारक्षकांच्या मदतीने काढून टाकण्याचा, लावण्याचा अधिकार पिठासीन अधिकाऱ्याला राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

आणि मतदानाचा अधिकार डावलल्यानंतर काय होते ते ही वाचा.

**लिओ कोलासो :-**

तो गेला बाराच्या भावात.

**मिलन म्हात्रे :-**

चार अधिकाऱ्यांनी, चार नगरसेवकांपेक्षा जास्त लोकांनी मतदानाची मागणी केल्यानंतर ते मतदानाला टाकले पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

मॅडम, दोन मिनिटांच्या अंतरावर पोलिस स्टेशन असताना......

**मा. आयुक्त :-**

सभागृहात सन्मा. महापौरांनी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाचे पालन जर पोलिस करत नसतील तर त्यांनी सभागृहाच्या बाहेर जावे.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, आपण जे बोललात ते बरोबर आहे. पण उपविधीमध्ये चार नगरसेवकांनी मागणी केली असताना मतदान झाले नाही त्याचे काय?

**लिओ कोलासो :-**

ते आम्हाला मान्य आहे. मतदान घ्या ना. पण तुम्ही मागणी केली नाही. तुम्ही मतदानाची मागणी केली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागणी केलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

ठराव दिलेला नाही. कुठे ठराव दिलेला आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, दोन मिनिटांच्या अंतरावर पोलिस स्टेशन असताना सब इन्सपेक्टरला येथे यायला अर्धा तास लागत असेल तर ही दुर्देवाची बाब आहे.

**संगिता म्हात्रे :-**

त्या पोलिसांची बदली करा.

**रिटा शाह :-**

बदली कशाला, सस्पेन्ड करा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौरांनी जो आदेश सभागृहामध्ये पारित केलेला आहे, दिलेला आहे. त्या आदेशाचे पालन सुरक्षारक्षकांनी ताबडतोब करावे.

**शशिकांत शहा :-**

आप बाहर जाईए और हम मेयर को भी रिक्वेस्ट करेंगे के आपके साथ मे बात करके फिर इसका निर्णय लायेंगे। मेहरबानी करके इसको प्रेस्टीज इश्यु न बनाके आप हमारी माँग को मानकर बाहर जाईए और इतनी बिनती हमारी मानिए। यह अच्छा नही है, मा. महासभा के लिए और अपने मिरा भाईंदर महानगरपालिका के लिए।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे, सभागृहामध्ये पिठासिन अधिकाऱ्याच्या खुर्चीवरुन जो काही मा. महापौरांनी आपल्याला आदेश दिलेला आहे. या शहराला एक वेगळी परंपरा आहे. या शहरामध्ये शहरीकरण झपाट्याने होत आहे. यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांचा सिंहाचा वाटा आहे आणि सभागृहाची जी काही परंपरा आहे. त्या परंपरेचा आदर राखून महापौरांनी जे पदावरुन, खुर्चीवरुन जे काही निर्देश दिले आहेत त्या निर्देशाचे कृपया आपण पालन करावे आणि सभागृहामध्ये मघापासून जी काही चर्चा सुरु आहे किंवा जी काही वंगळ सुरु आहे ती कृपया संपवावी अशी मी तुम्हांला पुन्हा एकदा विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा आपण इतरत्र बोलू नका. आम्ही जी मतदानाची मागणी केली ती आपण का फेटाळली?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये पिठासिन अधिकाऱ्यांचा निर्णय हा अंतिम निर्णय आहे. सन्मा. सदस्य माझे दोन मिनिटे ऐकून तर घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

चार नगरसेवकांनी मतदानाची मागणी केली आहे.

**मा. आयुक्त :-**

मला जे माहिती आहे तेच मी तुम्हांला सांगतोय.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा अधिकार जेव्हा डावलला तेव्हा आम्ही पुढे बोललो आहे.

**मा. आयुक्त :-**

पिठासिन अधिकारी ह्यानी दिलेला निर्णय हा अंतिम निर्णय आहे. सन्मा. सदस्यांनी एखाद्या गोष्टीची मागणी केली आणि ती......

**मिलन म्हात्रे :-**

नियमाने ती मागणी मान्य केली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ती मागणी मान्य करायलाच पाहिजे असे बंधनकारक महापौरांना नाही.

**मिलन म्हात्रे :-**

केलीच पाहिले आणि येथे आमची मतदानाची मागणी होती.

**मा. आयुक्त :-**

असे बंधन महापौरांवर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी येथे बोलत होतो तेव्हा.....

**मा. आयुक्त :-**

आणि आपण जे काही वक्तव्य केलेले आहे ते वक्तव्य सगळ्या सभागृहाने ऐकलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मतदानाची मागणी केली आणि आपण ती मागणी फेटाळली. पंधरा नगरसेवक उभे होते.

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे महापौरांनी दिलेल्या निर्देशाचे कृपया आपण पालन करावे.

**आसिफ शेख :-**

विषयांतर करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

मी कुठलेही चुकीचे काही बोललो नाही.

**मा. आयुक्त :-**

आणि शहराच्या विकासासाठी जे विषयपत्रिकेवर विषय आहेत ते मंजुर करण्याला आपण सहकार्य करावे.

**मिलन म्हात्रे :-**

मला मान्य नाही. मी जाणार नाही. मला हे आरोप केलेले मान्य नाही. मी काही बोललेलो नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

आयुक्त साहेब, सिक्युरिटी गार्ड तेथे उपलब्ध आहेत. कृपया आपण त्यांना आदेश द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

व्यक्तिगत दृष्टीकोनातून माझ्यावर आरोप केलेले आहेत. मला मान्य नाही. मी स्वतः जाणार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनका हाथ पकडो और बाहर बिठा दो।

**मिलन म्हात्रे :-**

नही, नही। हम जानेवाले नही है। क्या बात कर रहे हो? हमने कुछ किया ही नही, तो हम जायेंगे किस लिए? हमने कुछ किया ही नही है, हम जायेंगे नही।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

बेकार रुल मत करिए। महापौर ने कहा है की, इनको हाथ पकडके बाहर निकाल दिजीए, तो निकाल दिजीए।

**मा. आयुक्त :-**

सुरक्षा रक्षक जो यहाँ पर मौजुद है, महापौर मॅडमने बुलाया है, तो उनको जैसे आदेश दिये है, वैसे वह आदेश का पालन करे।

**मिलन म्हात्रे :-**

ज्या नियमानुसार सुरक्षा रक्षक बोलावले आहेत त्या उपविधीला अंतिम मंजुरी आहे का हे लक्षात ठेवा.......

**मा. महापौर :-**

धमकी देत आहेत, धमकी?

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, तुम्हांला जो शब्द सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी जे आत्ता बोलले ते टेप झालेले आहे का? ते आम्हांला दाखवा. मिलन म्हात्रे असे बोललेच नाही. टेप वाजवून आम्हांला दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

सदस्य गजानन भोईर ह्यांच्यावेळी कॅसेट कशी वाजवली?

**मा. महापौर :-**

यहाँ पर मौजुद सुरक्षा गार्ड को मै आदेश देती हूँ, वह सीधे तरिके से नही आते है तो उनको उठाकर बाहर लेके जाओ।

**नयना म्हात्रे :-**

मॅडम तुम्ही आम्हांला टेप वाजवून दाखवा, मिलन म्हात्रे असे बोलले का?

**मिलन म्हात्रे :-**

पहिले कॅसेट वाजवून दाखवा.

(सुरक्षा रक्षकांनी सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे ह्यांना सभागृहाच्या बाहेर नेले.)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांना आमची विनंती आहे की, ज्या पद्धतीने आपण हे कामकाज चालवता, या सभागृहात सर्व सन्मा. सदस्य मान्यवर आहेत. प्रत्येकाची क्षमता आहे. बोलण्याचे पण प्रत्येकाला भान राहते. पण ज्या पद्धतीने वातावरण तयार करुन ह्या सभागृहाचे वातावरण बिघडवून आज जो हा प्रसंग आला ह्याचा आम्ही

निषेध व्यक्त करतो. आपण चांगले काम करा. आम्ही भारतीय जनता पार्टी या सभागृहाच्या बाहेर जात आहे.

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, आम्ही देखील बाहेर चाललो आहे.

**रोहिदास पाटील :-**

शिवसेनेचे सर्व सदस्यही बाहेर जात आहेत.

(भारतीय जनता पार्टी, शिवसेना व जनता दल सेक्युलर सर्व सदस्यांनी सायं. ०५.२५ वा. सभात्याग केला.)

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी लोकशाही मार्गाने सर्व कामकाज चालत असतांना गोंधळ निर्माण करुन ही परिस्थिती निर्माण केली आणि आत्ता पुढील कामकाजाला सुरुवात होतांना निषेध करुन जाणे हे निंदणीय आहे. त्यांच्याने कुठले कामकाज होत नाही म्हणून हे बाहेर चालले आहे. ह्यांचा आम्ही निषेध करतो. आत्तापर्यंत गोंधळ केला तेव्हा हे बाहेर गेले नाही आणि पुढील कामकाज चालू होतांना हे बाहेर जात आहेत. त्यांचा आम्ही निषेध करतो आणि पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ०८ सर्वानुमते मंजुर. सचिव पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ०८ :-**

जकात प्रारुप नियमांना मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी स्थापन झाली असून जकात विभागाचा कारभार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अधिनियमाच्या तरतुदी नुसार व महाराष्ट्र नगरपालिका जकात (नियम) १९६८ नुसार चालू आहे. तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदी नुसार महापालिकेस स्वतःचे जकात नियम करणे अनिवार्य आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रारुप जकात नियमावली मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९ चे पोटकल (१), कलम १२७ चे पोटकलम (२) खंड (अ) आणि कलम ४५५ व कलम ४५७ च्या खंड (७) चा पोट खंड (क) द्वारे प्रादान करण्यांत आलेल्या अधिकारांचा आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेत वापरात असणाऱ्या महाराष्ट्र नगरपालिका (जकात) नियम १९६८ आणि त्या संबंधी लागू असणाऱ्या अन्य सर्व नियमांना अध्क्रिमित करुन उक्त अधिनियमाच्या कलम १४९ चे पोट कलम (२) अन्वये उक्त महानगरपालिकेच्या क्षेत्रातील जकातीची आकारणी, मुल्यांकन व संकलन यांचे नियमन करण्याकरिता केलेल्या प्रारुप नियमांना सदस्यांनी सुचविलेल्या व मा. महासभेने मान्य केलेल्या आवश्यक त्या सुचना/दुरुस्त्या प्रारुप नियमांत समाविष्ट करण्यास ही महासभा मान्यता देत आहे.

मा. महासभ्न्नेच्या मान्यतेनंतर अधिनियमांतील तरतुदीप्रमाणे उक्त नियमांना पूर्व प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. पूर्व प्रसिद्धी नंतर आलेल्या आक्षेप व सुचनांवर मा. महासभा पुन्हा एकवार विचार करुन त्यास अंतिम स्वरुप देईल. मा. महासभेने यानंतर अंतिम केलेल्या नियमांना राज्य शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने मा. महासभेच्या अंतिम मंजुरीच्या ठरावासह विषय राज्य शासनाच्या मान्यतेकरीता सादर करावेत.

तसेच जकात वसुली करीता ''जकात अभिकार्ता : नेमणुक बाबतची उदा. (निविदा पत्रक, करारनामा प्रत वृत्तपत्रामध्ये निविदा मागविण्याच्या जाहिराती प्रसिद्ध करणे (मराठी, इंग्रजी व हिन्दी), फॉर्म ऑफ लेटर ऑफ एक्सेपटन्स ऑफ ऑफर, वर्क कमेन्समेंट ऑर्डर, वगैरे) प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीस ही सभा मंजुरी देत असून सदर कार्यवाही मध्ये मा. महासभेने व मा. स्थायी समितीने तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार जकात निविदा मागविण्याच्या दृष्टीने कार्यवाही प्रस्थावित करुन प्रति वर्षी जकात निविदा मागविण्यांत याव्यात.

उक्त ''प्रारुप जाकत नियमांबाबत'' व ''जकात अभिकर्ता नेमणूकीबाबत'' निर्देशित केलेली कार्यवाही करणेकरिता ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०९ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता ह्यांच्या ज्या सुचना आहेत त्या लेखी सुचना द्या. त्या सुचना ह्याच्यामध्ये समाविष्ट करुन घेतल्या जातील.

**नरेंद्र मेहता :-**

गोषवारा कशाला पाठवता? लेखी उत्तर आम्ही पाठवून देऊ. सकाळपासून आम्ही सुचना मांडायला बसलो आहे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ०९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ०९ :-**

महानगपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती मंजूर करणे बाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या १) श्री. हेमंत पांडूरंग पाटील, स.का. २) श्री. जितेंद्र रा. कांबळे, लिपिक, ३) श्री. कैलास दा. शेवंते, लिपिक या तीन कर्मचारी यांच्या कुटूंबियांना शासन निर्णया अंतर्गत मोडत असलेल्या पाच गंभीर आजारा अंतर्गत आजारांवर उपचार घेतले असून शासन निर्णयाचे अधिन राहून अग्रिम मंजूर केले होते. त्या मंजूर केलेल्या अग्रिमापेक्षा प्रत्यक्ष कमी / जास्त खर्च झालेला आहे. तो पुढील प्रमाणे.

१) श्री. हेमंत पांडूरंग पाटील, (स.का.) यांनी त्यांची मुलगी कु. रुची हेमंत पाटील, करीता लोकमान्य टिळक, महापालिका रुग्णालय, मुंबई येथे ह्रदयावर शस्त्रक्रिया करण्याकरीता **रु. २०,०००/-** अग्रिम घेतले आहे व प्रत्यक्ष खर्च **रु. ५०,०००/-** झालेला आहे.

२) श्री. जितेंद्र रा. कांबळे, लिपिक यांनी त्यांची मुलगी कु. जानव्ही जितेंद्र कांबळे, करीता के. ई. एम. रुग्णालय येथे ह्रदयाची झडप बदलणे करीता **रु. ४५,०००/-** अग्रिम घेतली आहे व प्रत्यक्ष खर्च **रु.७३,७००/-** झालेला आहे.

३) श्री. कैलास दा. शेवंते, लिपिक यांनी त्यांची पत्नी श्रीम. अर्चना कैलास शेवंते, करीता नायर रुग्णालय, मुंबई येथे ह्रदय शस्त्रक्रिया करण्यासाठी **रु.४५,०००/-** अग्रिम घेतले आहे व प्रत्यक्ष खर्च **रु.३४,२१९/-** झालेला आहे.

शासन निर्णय क्र. MAG/१०९५/CR-४५/९५/आरोग्य-३, दि. ०४/०७/२००० अन्वये उक्त क्र. १ व २ येथील कर्मचारी यांनी उचल केलेल्या अग्रिम रकमेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती त्यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बिलाप्रमाणे करणेस मान्यता देण्यात येत असून क्र. ३ येथील कर्मचायाचा खर्च उचल केलेल्या अग्रिम रकमेपेक्षा कमी झालेला आहे. त्याचे समायोजन करुन घेणेस मान्यता असुन केलेल्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कार्यभार हा महाराष्ट्र शासनाचे धोरण व नियमानुसार व देखरेखीखाली करण्यात येतो. त्यानुसार महानगरपालिका कर्मचायांना तत्कालीन नगरपालिकेपासून महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू आहेत व ते लागू असल्याबाबत मा. सर्वसाधारण सभा दि. २७/१२/१९९५ ठराव क्र. ५२८ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार नगरपालिकेची महानगरपालिका झाल्याने जे नियम व अटीशर्ती नगरपालिका कर्मचायांना लागू आहेत तेच महानगरपालिका कर्मचाऱ्याना लागू होतात. त्यानुसार शासनाचे निर्णय हे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू आहेत. सद्यस्थितीमध्ये महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अथवा त्यांचे कुटूंबातील अन्य सदस्य जे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. त्यांना शासन निर्णय क्र. एमएजी/१०९९/प्र.क्र.२४०/९९ आरोग्य-३ दि.३०/८/१९९९ अंतर्गत नमूद २७ आजारांना व महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील तरतुदीनुसार मा. स्थायी समिती सभा दि.२८/५/२००३ ठराव क्र. ४९ अन्वये कर्मचाऱ्यांस रु. २०,०००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येत आहे. परंतू सदरचा वैद्यकिय प्रतिपुर्तीचा लाभ महानगरपालिकेच्या ठराविकच कर्मचाऱ्यांना जे मागणी करतात त्यांना मिळत आहे. याकरीता वैद्यकिय प्रतिपुर्तीचा लाभ सर्व कर्मचाऱ्यांना मिळावा अशी महानगरपालिका प्रशासनाची धारणा असून तशी महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटनांनी सुद्धा मागणी केलेली आहे. या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिका शेजारील ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका तसेच नवी मुंबई महानगरपालिका या महानगरपालिकांमध्ये कोणत्या पद्धतीने वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती केली जाते याबाबत माहिती उपलब्ध केली आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका सर्व कर्मचाऱ्यांना (वर्ग १ ते वर्ग ४) रु. २७००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती वर्षातून समान दोन हप्त्यामध्ये देत आहे. भिवंडी महानगरपालिका वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी कर्मचाऱ्यांना वेतनात दरमहा रु. २००/- देत आहे. तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका त्यांची स्वतःची रुग्णालये असल्यामुळे खाजगी रुग्णालयात तातडीचे वेळी खर्च केल्यास एकूण खर्चाच्या ७५%

परंतू वेतनश्रेणी नुसार जास्तीत जास्त रु. २५,०००/- च्या मर्यादेत देत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेकडून माहिती उपलब्ध झालेली नाही.

त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका शेजारील महानगरपालिकांनी सुरु केलेली पद्धत ही या महानगरपालिका स्थायी कर्मचाऱ्यांना लागू केल्यास त्याचा फायदा सर्व कर्मचाऱ्यांना होणार असल्याने तत्पुर्वी मा. स्थायी समिती सभा दि. २८/०५/२००३ ठराव क्र. ४९ नुसार सुरु असलेली वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बंद करुन यापुढे महानगरपालिकाचे आस्थापनेवरील स्थायी कर्मचाऱ्यांना आकस्मिक आजाराचे प्रतिपुर्ती पोटी (वर्ग-१ ते वर्ग ४) वार्षिक रु. २७००/- इतकी रक्कम एक रक्कमी वैद्यकिय खर्चाकरीता देऊन या देण्यात येणाऱ्या रकमेतून कर्मचाऱ्यांनी परस्पर मेडीक्लेम योजना स्वतःचे कुटूंबासह घ्यावयाची आहे. त्यामुळे ठरावाचे दिनांकापर्यंत प्राप्त वैद्यकिय प्रतिपुर्तीचे अर्ज वगळून या योजने अंतर्गत प्रत्येकी वर्ग-१ ते ४ मधील कर्मचारी / अधिकारी यांना वैद्यकिय खर्चाकरीता अर्थसंकल्पात प्रतिवर्षी स्थायी कर्मचायांचे प्रमाणात स्वतंत्र लेखाशिर्षाखाली आर्थिक तरतूद ठेवून त्या तरतूदीनुसार वैद्यकिय खर्चाकरीता येणाया खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता आहे. तसेच शासन निर्णय क्र. एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३ दि.१९/३/२००५ अंतर्गत परिशिष्ट ''अ'' मधील भाग-२ मधील पुढील पाच गंभिर आजार अनुक्रमे (१) ह्दय शस्त्रक्रियाची प्रकरणे (Heart Surgery), (२) ह्दय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye Pass Surgery), (३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, (४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation), (५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer)

यांना महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी व त्याच्या कुटूंबियानी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभिर व विशिष्टोपचारावरील खर्चाची शासकिय तसेच खाजगी रुग्णालयात घेतलेल्या संपूर्ण औषधोपचाराची प्रतिपुर्ती फक्त वैद्यकिय देयके शासकिय रुग्णालयात औषधोपचार घेतल्यास त्यांना नमुना ''अ'' व ''ब'' मध्ये प्रमाणपत्रे व खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतल्यास वैद्यकिय सेवाकरीता आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती देयके ''क'' व ''ड'' नमुन्यात सादर केल्यानंतर कर्मचारी / अधिकारी किंवा त्यांचे कुटूंबियांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती प्रदानास येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यात येत असून मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना गंभीर आजारांना येणाया खर्चाची प्रतिपुर्ती करुन देण्याचे अधिकार याद्वारे देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १० चे वाचन केले.)

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम की परवानगीसे बोलना चाहती हूँ। मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. १०, ह्याच्यामध्ये वॉर्ड क्र. २३ मध्ये ज्या कर्मचाऱ्यांची नेमणुक केलेली आहे आणि गाडी नमुद केलेली आहे, मी आयुक्त साहेबांनाही सांगितले होते की, आमच्या वॉर्ड क्र. २३ मध्ये कचरा खुप जास्त असतो. तर एक डंम्परने काम पुर्ण होणार नाही. तरी येथे एक डंम्पर लिहिले आहे. त्याच्यामध्ये दोन डंम्पर करा अशी माझी मागणी आहे आणि कर्मचाऱ्यांचीही वाढ करुन पंचवीस किंवा तीस कर्मचारी करुन घ्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. १४ और १५ मे भी दो डंम्पर है तो चार-चार करने के लिए मै विनंती करता हूँ और कर्मचारी बढाने की विनंती करता हूँ। बारीश मे मिरा रोड मे ज्यादा तकलिफे आती है।

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, सदर आरोग्याचा ठराव आपण या ठिकाणी मांडण्यापुर्वी ज्यांच्या ज्यांच्या प्रभागामध्ये जेवढे मजुर वाढवायचे असतील, त्यांच्या सुचना घेऊन ठराव करु या.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रभाग क्र. १३ मध्ये ही दोन डंम्पर आणि मजुर वाढवा.

**चंद्रकांत मोदी :-**

एक डंम्पर नही मैने चार डंम्पर की मागणी की है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रभाग क्र. २१ मध्ये दहा मजुर आणि एक डंम्पर वाढवावा.

**नुरजहाँ नझर हुसेन :-**

प्रभाग क्र. १४ व १५ मध्ये डंम्पर आणि मजदुर वाढवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण हे जे आत्ता दिलेले आहे हे काम पावसाच्या आधी साफ करायचे आहे. त्यासाठी आहे का, आपण हे अगोदर नेमलेले आहे, प्रभाग निहाय साफसफाई त्याच्यासाठी आहे?

**मोहन पाटील :-**

पावसाच्या अगोदर.

**मुक्ता रांजणकर :-**

प्रभाग क्र. २४ ही समाविष्ट करुन घ्यावा. कारण ह्या प्रभागात इंडस्ट्रीयल एरिया भरपुर असल्या कारणाने तिथे कचरा जास्त असतो.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. २६ मध्ये आणखीन पाच मजुर जास्त वाढवा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, ज्यांच्या ज्यांच्या प्रभागात मजुर वाढवायचे आहेत, त्यांना लेखी द्यायला सांगा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, १७, १८ व १९ वॉर्डामध्ये २५ कर्मचारी वाढवायला पाहिजे. आमच्या भागाकडे नेहमी दुर्लक्ष करण्यांत येत आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, १०, ११, १२, १३ या प्रभागांचा ह्याच्यात उल्लेख नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

१०, ११, १२, १३ या प्रभागांचा उल्लेखच नाही.

**लिओ कोलासो :-**

वॉर्ड क्र. १८ व १९ चा ही उल्लेख आलेला नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

वॉर्ड क्र. १८ व १९ करिता सन्मा. कोलासो साहेबांनी जी दुरुस्ती मांडलेली आहे त्या दुरुस्तीशी मी सहमत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य केशव घरतजी, ठरावामध्ये आपला जो प्रभाग आहे तो अंतर्भुत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. ७ आणि २४ हे दोन्ही जॉईन्ट प्रभाग आहेत. त्याकरिता तिथे मजुरांची संख्या वाढवावी हे नमुद करावे.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग क्र. ७ आणि २४ हे दोन्ही एका वेळेला का जॉईन्ट करतात हे कळत नाही. संख्यासुद्धा वीस ठेवली आहे. ७ आणि २४ प्रभाग हा औद्यागिक पट्टा आहे आणि असे असतांना दोन्ही जॉईन्ट ठेवतात आणि ठेवतात तर ठेवतात, तिथे मजुर संख्या बघा किती आहे? म्हणजे रेसिडेन्स एरिया असो, इंडस्ट्रीयल एरिया असो आणि दोन्ही वॉर्डाचे मिळून वीसच मजुर का?

**प्रेमनाथ पाटील :-**

चाळीस मजुर करा.

**मा. आयुक्त :-**

याबाबतीमध्ये आपल्या ज्या काही सुचना असतील....

**आसिफ शेख :-**

मजुरांची संख्या वाढवून द्या.

**मा. आयुक्त :-**

मजुरांच्या संख्या वाढवण्याबद्दल आपल्या ज्या काही सुचना असतील त्या आपण स्वतः लिहून द्याव्यात.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्या अगोदर आम्ही त्यांच्याशी बोललो होतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे कालावधी कमी असल्यामुळे आपल्याला बाकीची प्रोसीजर लवकर सुरु करावी लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. १०, ११, १२, १३ या प्रभागासाठी शंभर मजुर वाढीव पाहिजे. तसेच सहा डंम्पर वाढवून पाहिजे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते, प्रभाग क्र. ९ मध्ये दोनच डंम्पर आहेत. तिथे अजुन दोन वाढीव करावी आणि मजुरांची संख्याही पंचवीसने वाढवावी.

**हंसूकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. ८ मे ४५ हजार से ज्यादा जनसंख्या है। इसलिए वहाँ कुछ मजदुर बढाया जाना चाहिए और पच्चीस से पचास मजदुर कम से कम होना चाहिए। क्योंकी हमारा प्रभाग सबसे बडा है। उसमे एक ही डंम्पर है तो डंम्पर भी दो होना चाहिए।

**अशोक ब. पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. २ मध्ये झोपडपट्टी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कर्मचारी अपुरे पडत चालले आहेत. काही नगरसेविकेला तिथे गटारावर उभे राहावे लागते. तिथे कर्मचारी, मजुर वाढवावे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे की, सध्या आरोग्याचा ठराव येथे पास होत आहे. साहेब, मी सांगतोय त्या सुचना घ्या ना आणि आज मंजुरी दिल्यानंतर काम किती दिवसात सुरु होईल? साहेब, टेंडर कधी काढणार आणि टेंडर काढतांना एक महिना जाईल व पावसाळा सुरु होईल तर आपण काय करणार? साहेब, या महिन्या अखेरपर्यंत काम सुरु होईल का?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, अत्यावश्यक बाब असल्यामुळे ह्या कामाला तातडीने सुरुवात करावी.

**हंसुकुमार पांडे :-**

आयुक्त साहेब, प्रभाग क्र. ८ मध्ये डंम्पर वाढवा. एक डंम्पर आहे तिथे आम्हांला दोन डंम्पर पाहिजे.

**जयाबाई भोईर :-**

आमच्या प्रभागामध्ये दोन डंम्पर आणि वाढीव कामगार पाहिजे.

**अशोक ब. पाटील :-**

शेख साहेब, आमच्या वॉर्ड क्र. २ मध्ये मुकादम कमी आहेत. तिथे नगरसेविकेला स्वतःला गटारावर उभे राहावे लागते, साफसफाई करुन घेण्यासाठी. त्यामुळे तिथे मुकादमाची ही संख्या वाढवा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नगरसेविका कोण आहेत ते जरा विचारा.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांनी कदाचित प्रभारीचार्ज दिलेला असेल.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १०, आरोग्य विभागातील विविध कामांना प्रशासकीय मंजुरी देणेबाबत. पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करणे, कचरा सपाटीकरण करण्यासाठी डोझर मशीन भाड्याने घेणे, महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालय, खाजगी इमारतीचे सेफ्टी टँक सफाईसाठी व्हॅक्युम टँकर खरेदी करणे. वरील कामी प्रशासनाच्या गोषवाऱ्याच्या अंतर्गत सभागृहाला जी टिपणी सादर झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर विषयास सन्मा. सदस्यांनी वाढीव कामगारांच्या बाबतीमध्ये दुरुस्तीच्या ज्या ज्या सुचना दिल्या आहेत त्या सर्व सन्मा. सदस्यांच्या दुरुस्ती सुचना लक्षात घेऊन वाढीव कामगारांच्या संख्येमध्ये नोंद करुन सदर विषय आजची ही मा. महासभा मंजुर करत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. १० सर्वानुमते मंजुर. सन्मा. सभागृहातील सदस्यांनी दिलेल्या सुचनांसह, सुचना समाविष्ट करुन ठराव सर्वानुमते मंजुर व ठराव कायम करण्यांत यावा.

**प्रकरण क्र. १० :-**

आरोग्य विभागातील विविध कामांना प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

**अ) पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करणे बाबत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी नाले सफाई करण्याबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याचे अवलोकन केले असता शहरातील कच्चे पक्के नाले साफसफाई करण्यासाठी आवश्यक लागणारे मनुष्यबळ व डंपरच्या संख्येत खालीलप्रमाणे वाढ करणे आवश्यक आहेत.

| गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजुर | आवश्यक वाहने | | गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजुर | आवश्यक वाहने |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १, २ | ४० | ०२ | - | ९ | ७, २४ | ४५ | ०२ |
| २ | ३, ४, २० | ९० | ०२ | | १० | २२, २३ | ४० | ०२ |
| ३ | १८, १९ | ५० | ०३ | | ११ | १०, ११ | ५० | ०३ |
| ४ | ५, २१, १६ | ५५ | ०२ | | १२ | १२ | ५० | ०३ |

| गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजुर | आवश्यक वाहने |
|---|---|---|---|
| ५ | २६, १७ | ३५ | ०२ |
| ६ | ६ | ३५ | ०२ |
| ७ | ८ | ५० | ०२ |
| ८ | ९ | ४० | ०२ |

| गट क्र. | प्रभाग क्र. | आवश्यक मजुर | आवश्यक वाहने |
|---|---|---|---|
| १३ | १३ | ५० | ०३ |
| १४ | १४ | ७० | ०४ |
| १५ | १५ | ७० | ०४ |
| १६ | २५ | ५० | ०४ |

सदरचे मनुष्यबळ व डंपर सध्या कार्यरत असलेल्या प्रभाग निहाय साफसफाई करणाऱ्या मंजूर निविदाकाराकडून मंजूर दरानुसार त्या त्या गटातील नलो सफाईसाठी लागणारे जादा मजुर व डंपर ठेका पद्धतीने उपलब्ध करणेस ही सभा मान्यता देत असून या कामी जादा खर्च होणार असल्याने वॉर्ड सफाई व नाले सफाई कामी केलेली तरतुद अपुरी पडल्यास सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून करण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

मनपा क्षेत्रातील मोठे कच्चे पक्के नाले व खाडी लगत असलेले नाल्यातील गाळ माती काढण्याकामी भाड्याने पोकलन, बोटीसह पोकलन, जे.सी.बी. मशिन घेणे कामी खालील अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

| क्र. | विभागाचे नांव | पोकलन, बोटीसह पोकलन व जे.सी.बी. कामी येणारा अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम विभागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| २ | मुर्धे ते उत्तन या भागातील नाले सफाई करणे. | रु. १०,०५,०००/- |
| ३ | नवघर, खारीगाव या भागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| ४ | मिरारोड भागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |
| ५ | मिरा ते चेना, घोडबंदर आदी विभागातील नाले सफाई करणे. | रु. २०,१०,०००/- |

सदर नाले सफाईची कामे अत्यावश्यक बाब असल्याने तसेच सदरची कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण होण्याच्या दृष्टीने या कामाच्या तातडीने निविदा मागवून कमी दराच्या निविदाकारास कामाचा कार्यादेश देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत असून सदरचे दर एका वर्षासाठी मंजुर करण्यांत येत आहेत.

**ब) कचरा सपाटीकरण करण्यासाठी डोझर मशीन भाड्याने घेणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती, गृह संकुलने, इमारती, तसेच औद्योगिक क्षेत्र त्याचप्रमाणे शहरात मोठ्या प्रमाणावर उघड्यावर भरणारे भाजी मार्केट आदी मधून दररोज सुमारे २६० टन कचरा निर्माण होत असतो. सध्या महापालिकेच्या उत्तन पाली नियोजीत डंपिंग ग्राउंड येथे खत प्रकल्प उभारणेची कार्यवाही सुरु असून

सदर खत प्रकल्प सुरु होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यान काळात आरोग्य विभागामार्फत सध्या विकास आराखड्यातील डी.पी. रस्ते, मैदाने इत्यादीच्या आरक्षण जागेत कचरा टाकण्यात येतो. सदरची जागा नागरी वस्ती पासून जवळ असल्याने त्या भागातील कचरा तातडीने सपाटीकरण करणे आवश्यक असल्याने भाड्याने चेन डोझर उपलब्ध करणे आवश्यक असल्याने मनपा क्षेत्रातील दररोज निघणाऱ्या कचऱ्याचे सपाटीकरण करण्याकरिता डोझर भाड्याने घेणे कामास ही सभा मान्यता देत असून या कामी केलेली तरतुद अपुरी असून सदरचा खर्च घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**क) मनपा क्षेत्रातील सार्वजनीक शौचालय व खाजगी इमारतीच्या सेफ्टी टँक सफाई करण्यासाठी व्हॅक्युम टँकर खरेदी करणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राती लोकसंख्या सुमारे सहा ते साडे सहा लाख असून शहरात मोठ्या प्रमाणात इमारती, गृह संकुलने, औद्योगिक वसाहती आहेत. महानगरपालिका मालकीची सार्वजनीक शौचालय सेफ्टी टँकची संख्या १०३ आहेत. मनपा क्षेत्रातील खाजगी इमारती, ग्रामीण भागातील घरे तसेच औद्योगिक परिसरातील वसाहतीतील सेप्टीक टँकची संख्या अंदाजे ८० ते ९० हजार असून सदर बाबींचा विचार करता सध्या आरोगय विभागाकडे असलेल्या एकमेवर व्हॅक्युम टँकर मार्फत शहरातील खाजगी व सार्वजनिक शौचालयांच्या सेफ्टी टँक सफाई करणेचे कामात मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे.

शहरातील खाजगी व सार्वजनिक शौचालय सेफ्टी टँक सफाई करण्यासाठी नवीन तीन व्हॅक्युम टँकर खरेदी करणे आवश्यक आहे. या साठी चेसीज व त्यावर बॉडी बांधणे कामी येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत असून सदर कामास तरतुद अपुरी पडल्यास घनकचरा व्यवस्थापन या शिर्षातून खर्च करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. सन्मा. सभागृह नेते बोर्जीस साहेब, ३७ अन्वये तो विषय मंजुर करुन घ्या.

**प्रभात पाटील :-**

सभागृह नेते, महापौर मॅडम, सार्वजनिक रस्ते घोषित करतांना माशाच्या पाड्याकडे जाणारा रस्ता आहे. तिथे काही लोकांच्या स्वतःच्या मालकीच्या काही जागा आहेत. तर त्या जागेचा मोबदला देणे, टी.डी.आर. देणार, काय देणार ह्याचा विचार करुन हा ठराव करण्यांत यावा. ती स्वतःच्या मालकीची जागा आहे.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ११ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

बोर्जीस साहेब, त्याच्यात काही रस्ते राहिले आहेत. चेन्याला बेलकरीपाड्याकडे जाणारा रस्ता.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य केशव घरत व रविंद्र माळी हे जे रस्ते प्रस्तावित करत आहेत. ते रस्ते ह्या ठरावात अंतर्भुत करावे अशी मी आपणांला विनंती करतो.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ११, सार्वजनिक रस्ते घोषित करणेबबात सन्मा. सदस्य ह्यांनी मांडलेल्या सुचनांसह ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ११ :-**

सार्वजनिक रस्ते घोषित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि. १४/०५/१९९७ रोजी मंजुर झाली असून दि. १५/०७/१९९७ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजुर झालेली असून दि. १५/१०/२००० पासुन अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या पुर्वेकडील मौजे काशि, मौजे घोडबंदर स्थित आदिवासी पाडे आहेत. सदर आदिवासी पाडे दाचकुलपाडा, माशाचा पाडा, बाभळीची भाट क्र. १ व २ नावाने ओळखले जातात. १) दाचकुल पाड्याकडे जाण्याकरीता लक्ष्मीबाग ते दाचकुलपाडा हा रस्ता, १) माशाचा पाड्याकडे जाण्यारीता काशि जनता नगर ब्रीज ते मंदिरापर्यंतचा रस्ता, ३) बाभळीचा भाट क्र. १ व २ कडे रा.म.क्र. ८ पासुनचा रस्ता हे रस्ते विद्यमान अस्तित्वातील रस्ते असुन सदर रस्ते उपरोक्त मंजुर विकास योजनेत अंतर्भुत करण्यात आलेले नाहीत व त्या ठिकाणी विकास योजनेत नियोजित रस्ते दर्शविण्यात आलेले नाहीत. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता सदर आदिवासी पाड्याकडे जाणारे अस्तित्वातील रस्ते हे खाजगी मालकीच्या जागेतून तर काही भाग वन विभागाच्या जागेतुन जात आहेत. सदर आदिवासी पाड्याकडे जाण्याकरीता पक्क्या स्वरुपात रस्ते विकसित करणे / बांधणे आवश्यक आहे. सदर तीन्ही रस्त्याबाबत सर्व्हे करुन मोजणी नकाशा तयार करण्यांत आलेला असून त्यानुसार ९.०० मीटर रुंदीचे रस्ते प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचा व जागेचा वापर सार्वजनिक प्रयोजनार्थ करावयाचा असल्यामुळे मंजुर विकास योजनेत ९.०० मीटर रुंद रस्ता आरक्षण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मंजुर विकास योजनेत फेर बदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

प्रकरण क्र. १२ मध्ये २२ नंबरला दुल्हन बी महल असे नांव टाकले आहे, ते नांव चुकीचे आहे. त्या बिल्डींगचे नांव दुल्हन बी चाळ असे आहे. त्यामध्ये दुल्हन बी महल केलेले आहे. तो बदल करुन घेण्यांत यावा ही विनंती.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. १२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**चंद्रकांत मोदी :-**

या ठरावाला अनुमोदन आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते, ह्याच्यामध्ये ज्या धोकादायक इमारती अर्धवट तोडल्या आहेत त्याचा गैरवापर काही गुंडप्रवृत्तीचे लोक करत असतात आणि आमच्या प्रभागामध्येही तशी एक बिल्डींग आहे. तरी त्यांचेपण ह्याच्यामध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, स्टेशन रोडवर रेड रोझ म्हणून बिल्डींग आहे. ती अर्धी पडलेली आहे आणि अर्धी उभी आहे. तर ती बिल्डींग ताबडतोब पाडण्यांत यावी.

**आसिफ शेख :-**

ती बिल्डींग पाडण्यापुर्वी त्या लोकांची पर्यायी व्यवस्थाही करण्यांत यावी.

**रिटा शाह :-**

तिथे कोण रहात नाही.

**आसिफ शेख :-**

तिथे लोक राहतात.

**रिटा शाह :-**

नाही. ती बिल्डींग रिकामी आहे. तिथे कोण राहत नाही. सगळे भाड्याने राहतात. एकदम खाली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारे प्रभाग का है, हमे मालुम है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चौहाण साहेब, वहाँपर लोग रहते है।

**आसिफ शेख :-**

वहाँ पर रहनेवाले की सोय होनी चाहिए। उसके बाद मे वह बिल्डींग तोडो।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतोय की, ज्या धोकादायक बिल्डींग आपण ह्याच्यात नमुद केलेल्या आहेत त्यात राहणारे रहिवासी हे गरीब आणि मध्यमवर्गीय असल्या कारणाने आणि ज्या विकासकर्त्यांनी जी इमारत बांधली तो आपण जो एफ.एस.आय. देतो त्याच्यापेक्षा चार ते पाच एफ.एस.आय. घेऊन बांधलेले आहे. अशा इमारतींना आपण काय आणि कोणते संरक्षण देणार ह्याच्या बाबतही आपण निवेदन करावे. कारण तिथे गरीब आणि मध्यमवर्गीय राहत असल्या कारणाने त्यांना पुर्नवसनासाठी आपण जागा कुठे देणार? त्यांना आपण तात्पुरती कुठेतरी सोय करुच. पण त्यानंतर ते कुठे राहतील? अशा जागेत जर त्यांना राहायचे असेल तर एफ.एस.आय.चा देखील विचार करावा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपण ठरावामध्ये असे मांडलेले की, हाऊसिंग, री-हाऊसिंग त्यासाठी त्या आरक्षणाखाली असलेली जागा सध्या सेंट्रल गव्हर्नमेंटकडे आहे. ते आरक्षण ओपन जागेमध्ये दुसऱ्या मालकी जागेमध्ये नाही आणि आपण ठरावामध्ये हे ही नमुद केले आहे की, त्यांना राहण्याची व्यवस्था केल्यानंतर आपणाला त्याच्यावर कार्यवाही करायची आहे. ती जागा पुर्णतः ताब्यात आली तर आपण करु. कारण एकेका इमारतीमध्ये दोनशे-दोनशे रहिवासी आहेत. उदा. आमच्या विभागामध्ये दत्ता अपार्टमेंट म्हणून बिल्डींग आहे. त्यात २५२ रुम आहेत. त्या ठरावामध्ये नमुद केले आहे त्यांची राहायची व्यवस्था झाल्यानंतर कार्यवाही झाली पाहिजे.

**आसिफ शेख :-**

कार्यवाही झाली पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

व्यवस्था करा. एफ.एस.आय.चा देखील विचार करा.

**आसिफ शेख :-**

व्यवस्था झाल्यानंतर कार्यवाही केली पाहिजे. त्याला माझे समर्थन आहे.

**शशिकांत भोईर :-**

विकासकर्त्याने जास्त उशिर केला आहे, त्याबद्दल काय?

**रिटा शाह :-**

साहेब, आम्हांला मान्य आहे की, त्या लोकांची पर्यायी व्यवस्था करुनच ती बिल्डींग तोडायला पाहिजे ते आम्हांला मान्य आहे. पण एखादी बिल्डींग अशी धोकादायक आहे की, ती बिल्डींग केव्हाही पडणार आणि त्याच्यामध्ये राहणाऱ्या लोकांची जिवीतहानी झाली तर त्याला जबाबदार प्रशासन राहणार. मग त्याची जबाबदारी तुमच्यावर घ्यावी लागेल.

**मा. आयुक्त :-**

अत्यंत धोकादायक ज्या इमारती असतील त्या बाबतीमध्ये आपण पोलिसांचे संरक्षण घेऊन त्या खाली करुन काढू. परंतु, ज्या अत्यंत धोकादायक नाही त्याबाबतीमध्ये........

**आसिफ शेख :-**

नसतील. त्याच्यामध्ये लोक राहतात त्यांना पर्यायी व्यवस्था करुन ट्रान्झीस्ट कॅम्पची व्यवस्था करा.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे ट्रान्झीस्ट कॅम्प नाही.

**मोहन पाटील :-**

पुढचा विषय पुकारण्याच्या अगोदर आम्हांला अशी माहिती पाहिले की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांना आपण सभागृहातून बाहेर काढले आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहात शांतता राखावी.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अधिनियम १९४९ च्या ॲक्टमध्ये अशी तरतुद आहे की, त्या सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचे आपण निलंबन किती वेळ करु शकतो असे १९४९ च्या प्रांतिक कायद्यामध्ये तरतुद आहे त्याचा खुलासा सचिवानी करावा.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या निलंबनाचा खुलासा करण्या अगोदर, मा. महापौर मॅडमना सांगितले आहे. त्याचे निवेदन करावे की, त्यांनी एफ.एस.आय. चार ते पाच वापरला आहे त्या इमारतींचे काय? त्यांना आपण एफ.एस.आय. किती देणार?

**अशोक ब. पाटील :-**

सन्मा. सदस्यांचा प्रश्न बरोबर आहे. ग्रामपंचायत काळात चार एफ.एस.आय. वापरला आहे. नगरपालिकेच्या काळात चार एफ.एस.आय. वापरला आहे. त्यांना तुम्ही किती एफ.एस.आय. देणार? प्लान पास आहे दोन एफ.एस.आय.चे आणि बांधले चार एफ.एस.आय. का डबल देणार, का हाच एफ.एस.आय. देणार काय?

**मा. आयुक्त :-**

एका सभेपुरते निलंबन असते.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी ज्या विकासकर्त्यांनी चार ते पाच एफ.एस.आय. वापरला आहे. त्या इमारतींना आपण किती टक्के एफ.एस.आय. देणार आहात? आपण अडीचचा ठराव केलेला आहे. पण त्यानंतर जास्त एफ.एस.आय. असेल तर ते लोक कुठे जातील? गरीब, मध्यमवर्गीय आहेत, मग असे कुठेतरी भाईंदरमध्ये झोपडपट्टी वाढतील नाही तर बेघर होतील. त्याच्यावर आपण विचार करावा.

**मा. महापौर :-**

आपण अडीच टक्के एफ.एस.आय. दिला आहे ना?

**मा. आयुक्त :-**

अडीच टक्क्याचा प्रस्ताव आपण गव्हर्नमेंटकडे पाठवला आहे. शासनाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवलेला आणि शासनाकडे आपल्या महापालिकेची जी अडचण आहे की, जो अडीच एफ.एस.आय. प्रस्तावित केलेला आहे. त्याच्यापेक्षा जास्त एफ.एस.आय. ऑलरेडी आहे त्या बाबतीमध्ये शासनाकडून मार्गदर्शन मागवलेले आहे, ते मार्गदर्शन अजुनपर्यंत प्राप्त झालेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

धन्यवाद.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. १२, सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारती बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत सद्यस्थितीत खालील प्रमाणे धोकादायक इमारती आहेत. सदर इमारतीना महानगरपालिका प्रशासनामार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ (१) (२) (३) अन्वये इमारती रिकाम्या करून तोडून टाकणे बाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | लता को. ऑ. हौ.सो. | खारीगांव भाईदर (पू) |
| २ | शैला उद्योग भवन | नवघर रोड, भाईदर (पू) |
| ३ | दत्ता निवास चाळ | नवघर गांव, भाईदर (पू) |
| ४ | स्वानंद गणेश | खारीगांव भाईदर (पू) |
| ५ | केतकी निवास | बी.पी.रोड भाईदर (पू) |
| ६ | सिल्व्हर लाईन को. ऑ.हौ.सो. | रेल्वे समांतर रस्ता भाईदर (पू) |
| ७ | कल्याण कॉटेज | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| ८ | राम अवतार सदन अे | बी.पी.रोड भाईदर (पू) |
| ९ | दळवी चाळ | नवघर रोड,भाईदर (पू) |
| १० | भरत बी पाटील व इतर (घर) | नवघर रोड,भाईदर (पू) |
| ११ | रेल व्हयु को. ऑ.हौ.सो. | रेल्वे समांतर रस्ता, भाईदर (पू) |
| १२ | नविन अपार्टमेंट | खारिगांव भाईदर (पू) |
| १३ | आर.के.पेठी /अग्रवाल | व्यापार आळी, भाईदर (प.) |
| १४ | नुरजहॉ अपार्टमेंट | नयानगर मिरारोड पूर्व |
| १५ | रोझ को. ऑ. हौ. सो. | नयानगर मिरारोड पूर्व |
| १६ | तुळशी निवास | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| १७ | चंदू निवास | बी.पी.रोड, भाईदर (पू) |
| १८ | कांचन कॉटेज | बी.पी. रोड, भाईदर (पू) |
| १९ | अल्पेश बिल्डीग | स्टेशन रोड, भाईदर(प) |
| २० | न्यु रेड रोज को.ऑ.हौ.सो. | स्टेशन रोड, भाईदर (प.) |
| २१ | दुल्हन बी.महल | पोलिस स्टेशन बाजूला भाईदर (प) |
| २२ | महेश नगर बिल्डींग नं.१ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग भाईदर (प) |
| २३ | लता कॉ. ऑ. हौ.सो. | खारिगांव भाईदर (पू) |
| २४ | स्वानंद गणेश | खारिगांव भाईदर (पू) |
| २५ | सिल्व्हर लाईन कॉ.ऑ. हौ.सोसायटी | भाईदर (पू) स्टेशन रोड |
| २६ | रॉयल कॉ.ऑ.हौ.सोसायटी | मिरारोड (पू) |

वरील इमारती मधील रहिवाशी / भाडे करु व मालकांना वारंवार नोटीसा देवुन सुध्दा संबधितानी इमारती रिकाम्या करुन तोडलेल्या नाहीत. वरील प्रमाणे अ.क्र. १ ते २६ इमारती बाबत सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या शासकीय संस्थेमार्फत तपासणी, टेस्टींग करुन त्यांच्या अहवालानुसार इमारती धोकादायक असल्याबाबत घोषित केलेल्या आहेत, तसेच सदर संस्थेमार्फत खालील इमारतीची तपासणी टेस्टींग करून त्यांच्या अहवालानुसार इमारत दुरूस्ती / मजबुतीकाम करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव / ठिकाण |
|---|---|
| १ | चंद्रलोक बिल्डींग बी.को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (प) |
| २ | पितृछाया भाईदर (पूर्व) |
| ३ | प्रिमियम बिल्डींग, मिरारोड (पूर्व) |
| ४ | चैतन्य बिल्डींग खारीगांव, भाईंदर (पूर्व) |
| ५ | शास्त्री नगर नं.१ कॉ.ऑ.हौ.सोसायटी भाईदर (प) |
| ६ | नटवर हाउुस को.ऑ.हौ.सो. नवघर भाईदर (पू) |
| ७ | सुदंरा को.ऑ.हौ.सो.लि. भाईदर (पू) |
| ८ | मिना बिल्डींग, भाईंदर (प) |
| ९ | मंगलनगर,ई आणि एफ मिरारोड |
| १० | महेश नगर बिल्डींग नं.५, भाईंदर (प) |

| अ.क्र. | इमारतीचे नाव / ठिकाण |
|---|---|
| ११ | महेश नगर बिल्डींग नं.४, भाईंदर (प) |
| १२ | निराज पार्क को.ऑ.हौ.सो.लि., भाईदर (पू.) |
| १३ | नटवर हाउुस को.ऑ.हौ.सो.लि., भाईदर (पू.) |
| १४ | शांतीधाम श्री गणेश को. ऑ.हौ.सो. मिरारोड (पू) |
| १५ | यमुना निवास, भाईंदर (पू) |
| १६ | मातृछाया, भाईंदर (पू) |
| १७ | ठाकूर बिल्डींग, भाईंदर (प) |
| १८ | साई व्हिला भाईदर (प) |
| १९ | अमिना मंजिल, भाईंदर (प) |
| २० | किट्टी कृपा, भाईंदर (प) |
| २१ | गणेश कृपा, भाईंदर (पू) |
| २२ | चितारी निवास, भाईंदर (पू) |
| २३ | वृदांवन (स्वस्तिक इंडस्ट्रीयल इस्टेट), भाईंदर (पू) |
| २४ | चंदनबाला इमारत, भाईंदर (प) |
| २५ | न्यु यशोदिप को. हाउुसिंग सोसायटी, भाईंदर (प) |
| २६ | शातीनगर, भाईंदर (पू) |
| २७ | अरिहंत अपार्टमेंट, भाईंदर (प) |
| २८ | चंद्रभागा लक्ष्मण पाटील, भाईंदर (प) |
| २९ | मनिच्छा को.हाउसिंग सोसायटी, भाईंदर (पू) |
| ३० | बाबू मिस्त्री चाळ नं.ए/१, भाईंदर (प) |
| ३१ | बाबू मिस्त्री चाळ नं.बी/२, भाईंदर (प) |
| ३२ | के.जी.महल, भाईंदर (प) |
| ३३ | निर्विकार सोसायटी, भाईंदर (पू) |
| ३४ | भाग्यश्री निवास, भाईंदर (पू) |
| ३५ | जामा मस्जिद,भाईदर(प) |
| ३६ | रामा निवास, भाईंदर (पू) |
| ३७ | व्हीनस कॉर्नर, मिरारोड (पू) |
| ३८ | हिरा-पन्ना, भाईंदर (पू) |
| ३९ | शुभम करोती , भाईंदर (प) |
| ४० | ओम गणेश कृपा, भाईंदर (प) |
| ४१ | पाटील बंद्रर्स इंडस्ट्रीयल इस्टेट , भाईंदर (पू) |
| ४२ | लवडेल को.ऑ.हौ.सो, भाईंदर (पू) |
| ४३ | तोदी उद्योग नगर , भाईंदर (प) |
| ४४ | साई निवास, भाईंदर (पू) |
| ४५ | जय वृषभ को.ऑ.हौ.सो, भाईंदर (प) |
| ४६ | नवकिर्ती प्रिमायसेस, भाईंदर (पू) |
| ४७ | चंद्रलोक -अे., भाईंदर (प) |
| ४८ | आराधना को.ऑ.हौ.सो. लि., भाईंदर (पू) |
| ४९ | संध्यागुप्ता भवन भाईदर (पू) |

वरील प्रमाणे सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या संस्थेच्या अहवालनुसार धोकादायक इमारती म्हणून घोषित केलेल्या इमारतीचे मालक, भाडे करुन विकासक रहीवाशी यामध्ये पुर्नबांधणी बाबत तडजोड होत नसल्याने तसेच पुर्नबांधणी करीता उपलंब्ध होणाऱ्या चटईक्षेत्रातून सर्वाना जागा उपलंब्ध होउु न शकत असल्याने सुध्दा इमारती तोडण्यास विलंब होत आहे. सदर धोकादायक इमारती या ग्रामपंचायत काळातील असुन सदर इमारतीनी १.५० ते ५ पेक्षा जास्त चटईक्षेत्र व्यापलेले आहे .

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर असलेल्या विकास नियंत्रण निमावलीनुसार चटईक्षेत्र १ (एक) अनुज्ञेय असून पुर्नविकासाच्या इमारतीसाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावालीतील परिशिष्ठ II नियम ३२ (७) नुसार अशा इमारती जर दि. ०१/०६/१९८५ पुर्वीच्या असतील तर त्यासाठी ०.२५ जादा चटईक्षेत्र जे की १.५० चटईक्षेत्राच्या मर्यादेत देण्याची तरतुद आहे. सदर धोकादायक इमारती हया रहीवास व्याप्त असल्यमुळे या इमारतीच्या भुखंडाच्या हद्दी निश्चित करणे शक्य होत नसल्यामुळे विदयमान जो त्याच्या क्षेत्राचे मोजमाप करून चटईक्षेत्र निर्देशांक विचार घेण्यात आला असून सदर इमारतीचे विदयमान क्षेत्र १.५०

चटई पेक्षा जास्तीचे आहे. मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या दि.१३/०४/२००५ च्या महासभेत पुर्नविकासाच्या इमारतीना अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र व जास्तीचे चटईक्षेत्र निर्देशांक १.०० इतके बांधकाम क्षेत्र देण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ठराव पारीत झालेला आहे. सदर फेरबदल शासनाकडून अंतिम झाल्यानंतर त्यानुसार पुर्नबांधणी परवानग्या देता येतील प्रशासनाने याबाबत मा. प्रधान सचिव, नगर सचिव विभाग, मंत्रालय, मुबंई -४०००३२ यांना पत्रान्वये सर्व इमारतीची माहिती देउुन पुर्नविकास परवानगी देणे बाबत मार्गदर्शन मागविलेले आहे. पंरतु सदर मार्गदर्शन शासनाकडून मिळालेले नाही.

धोकादायक इमारतीबाबतची वरील प्रमाणे परिस्थिती पाहता त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांची तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी व्यवस्था करण्याकरीता मंजूर विकास योजनेतील Housing for Dishoused आरक्षित जागा ताब्यात घेण्याबाबत नगररचना विभागाने त्वरित कार्यवाही करावी  अतिधोकादायक इमारतीबाबत महानगरपालिकेने तातडीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८ (१) (क), (४) (५) अन्वये पोलीस विभागाचे सहकार्य घेउुन धोकादायक इमारती खाली करून द्याव्यात सदर रिकामी केलेल्या इमारती संबधित इमारत मालक / रहिवांशानी न तोडल्यास महानगरपालिकेमार्फत इमारतीचे मुल्यांकन करून लिलाव द्वारे इमारती तोडण्यात याव्यात. नगररचना विभागामार्फत धोकादायक इमारती तोडण्यापुर्वी जागेचे क्षेत्रफळ प्रमाणित करून घ्यावे. ज्या इमारतीना दुरूस्ती / मजबुती कामाबाबत कळविण्यात आलेले असेल अशा इमारतीना तीन नोटीसा देउुन सुध्दा दुरूस्ती / मजबुतीकाम करून सक्षम दाखला सादर न केल्यास व आवश्यकता भासल्यास पुन्हा इंजिनिअरींग कॉलेज मार्फत तपासणी व टेस्टींग करून इमारती धोकादायक आढळल्यास तसेच घोषित करून पोलीस बंदोबस्तात रिकाम्या कराव्यात सदर प्रस्तावात नमुद केल्या व्यतिरिक्त प्रशासनामार्फत सर्व्हे करून आवश्यकता भासल्यास मा.स्थायी समिती सभा दि. १३ /११ / २००३ ठराव क्र. १५२ अन्वये मंजूर दरानुसार यापुढे सुध्दा सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिरिअरिंग या संस्थेमार्फत तपासणी व टेस्टींग करून पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. १३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**केशव घरत :-**

साहेब, आपण ठराव केल्यानंतर मंत्रालयाकडून आपल्याला त्यांचा निर्णय कधी कळणार आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

सामान्य माणुस कशाला मंत्रालयामध्ये जाईल?

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, मंत्रालयात गेल्यावर शासनाची मान्यता कधी मिळणार आणि हे कधी करणार?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबतचे आपल्याला अधिकार असायला पाहिजे. कृपया आयुक्त साहेबांनी आम्हांला ह्याच्यावर मार्गदर्शन करावे. या सभागृहाला ते अधिकार आहेत की नाही हे स्पष्ट करा. शासनाचा जी.आर. स्पष्ट करावा ना.

**मा. उपमहापौर :-**

मालमत्ता हस्तांतरण करण्या संदर्भातली माझी माहिती अशी आहे की, शासनाचा जी.आर. आहे. त्या जी.आर. प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेची एन.ओ.सी. असल्याशिवाय मालमत्ता हस्तातरण होत नाही आणि स्थानिक स्वराज्य संस्था केव्हा एन.ओ.सी. देते जेव्हा ती इमारत अधिकृत असते. १९८० सालचे आहेत ती केली नाहीत. परंतु, येथे काही प्रकरणे अशी झाली आहेत, त्याच्या कॉपीज माझ्याकडे आहेत. त्याही मी आयुक्त साहेबांना देतो. असा अधिकार नसतांना आपल्याकउे असे ट्रान्सफर झालेले आहेत. हस्तांतरणाचे अशी अनेक प्रकरणे झालेली आहेत. ती मी सर्व सदस्यांना देखील दाखवू शकेन.

**आसिफ शेख :-**

मग करायचे काय?

**मा. उपमहापौर :-**

शासनाचा जी.आर. आहे. असे हस्तांतरण करता येत नाही. आपण मंत्रालयातून त्याच्याबद्दल मागवले आहे तेच बरोबर आहे. तसा आपल्याला ठराव करता येत नाही. तसा शासनाचा जी.आर. आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, ठाणे महानगरपालिकेने ठराव पारित केलेले आहेत आणि ठाणे महानगरपालिकेने अशी जी प्रकरणे आहेत ती हस्तांतरित केलेली आहेत.

**याकुब कुरेशी :-**

त्या अनुषंगाने आपणही करावे.

**आसिफ शेख :-**

एखादे प्रकरण जर आपल्याला हस्तांतरित करायचे असेल तर त्या लोकांना तुम्ही नोटीस द्या ना. कोणाचे ऑब्जेक्शन आले नसेल तर हस्तांतरण करायला हरकत नाही.

**केशव घरत :-**

जर ठाणे महानगरपालिका करु शकत असेल तर आपण का करु शकत नाही?

**आसिफ शेख :-**

पानपट्टे साहेब, प्रभाग समिती क्र. ०१ मध्ये सहा वॉर्ड आले. भाईंदर वेस्टपासून ते उत्तनपर्यंत. बऱ्याच मालमत्ता अजुन हस्तांतरीत झाल्या नाही. आमच्या सन्मा. सदस्या नेहमी वारंवार तक्रार करतात व आमच्या प्रभाग समितीच्या सभेतदेखील हा विषय आला. परंतु, अजुनपर्यंत मालमत्ता ट्रान्सफर झाली नाही. यासाठी आपण एक ठराव घेऊ या. जसे ठाणे महानगरपालिकेने ठराव केला आहे, त्या धर्तीवर आपण एक ठराव घेऊ या आणि नंतर पेपर नोटीस देऊन जर ऑब्जेक्शन आले नाही तर आपण हस्तांतरित करु या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, शासनाला ते विचारावे लागेल. ठाणे महानगरपालिकेनेही हे बेकायदेशीर केले आहे. शासनाला न विचारता त्यांनी केलेले आहे, शासनाची स्टँम्प ड्युटी बुडवून. आपल्याला तसे करता येणार नाही.

**केशव घरत :-**

साहेब, बरोबर आहे. पण असा पण आपला महसुल शेवटी बुडतोय ना?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

महसुल मिळते म्हणून बेकायदेशीर करता येत नाही. ह्याच्यामधून आपल्याला दहा-बारा लाख रुपये महसुल मिळेल. पण शासनाचे स्टँम्प ड्युटी बुडवून केले तर महानगरपालिकेवर ठपका ठेवतील.

**केशव घरत :-**

मग आपण पुढे काय करायचे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

शासनाकडून मार्गदर्शन मागवू या.

**आसिफ शेख :-**

ठराव करुन घ्या आणि शासनाला पाठवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठिक आहे. तसे करु या.

**केशव घरत :-**

साहेब, त्याला परत वर्ष जाईल आणि लोकांची आमच्या मागे बोंबाबोंब राहिलच.

**आसिफ शेख :-**

अशी पेपरला नोटीस द्या.

**मा. महापौर :-**

मालमत्ता हस्तांतरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबतचा ठराव स्लम एरिया झोपडपट्टी यासारख्या एरियामध्ये घरांचा ट्रान्सफर होत नाही. म्हणून ही विषय मा. महासभेसमोर आणलेला आहे. मा. महासभेने विचार विनिमय करुन योग्य तो निर्णय घेणे गरजेचे आहे. कारण कित्येक वर्षे झाली महानगरपालिकेचे ट्रान्सफर, जो उत्पन्नाचा स्त्रोत आहे तो बराच लाखो रुपयांनी बुडत आहे. मा. महासभेला अधिकार आहे की, स्लम एरिया आणि झोपडपट्टी एरियातले प्रकरण ट्रान्सफर करुन त्यांना टॅक्स लावणे आणि ते कायदेशीर करणे. अशा प्रकारे या सभागृहाने ह्याच्यावर पुन्हा एकदा विचार करुन ठराव मांडण्यात यावा.

**रिटा शाह :-**

मॅडम, जेव्हा पुर्वी नाईक साहेब होते तेव्हा ट्रान्सफर करते वेळी रजिस्ट्रेशन कम्पलसरी नव्हते. स्टँम्प ड्युटी कंम्पलसरी होते.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, या प्रश्नामध्ये लोकांची कामं व्हायला पाहिजे. ट्रान्सफर फास्ट व्हायला पाहिजे. परंतु, ज्या झोपड्या किंवा जी घरं सरकारी जमिनीवर आहेत त्या ठिकाणी रितसर आणि कायदेशिर मार्गदर्शन घेतल्यावर त्याचा निर्णय घ्यायला पाहिजे. अशा पद्धतीने भरमसाठ आपण प्रत्येकाचे ट्रान्सफर करु शकणार नाही.

**रिटा शाह :-**

झोपडपट्टीचे काय? झोपडपट्टीचे नाही बिल्डींगचे सांगते.

**केशव घरत :-**

खाजगी जागेचे आहे त्यांचे काय? गावठण परिसरात आहे त्यांचे काय?

**अशोक ब. पाटील :-**

आयुक्त साहेब, १९९५ पुर्वीचे जे फोटोपास शासनाने दिलेले आहे त्याच्यामध्ये स्पष्ट आहे की, त्या झोपड्या हस्तांतरित होऊ शकत नाही. जे फोटोपास दिले आहेत ते हस्तांतरित होऊ शकत नाही. शासकीय जमिनीबाबत जे सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी सांगितले की, जे फोटोपास दिले आहेत ते शासकीय जमिनीवरील झोपडपट्टींना दिले आहेत. ते हस्तांतरित होऊ शकत नाही असे शासनाचे परिपत्रक आहे. नियमानुसार ते होऊ शकत नाही.

**प्रकरण क्र. १३ :-**

मालमत्ता हस्तांतरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १३ :-**

मनपा क्षेत्रातील झोपडपट्टी व गावठण विभागातील मालमत्तांचे हस्तांतरण होत नाही. सदर मालमत्तंचे दस्त ऐवज (करारनामे) दुय्यम निबंधक, ठाणे - २ यांचे कडे नोंदणीकृत होत नाहीत. यामुळे मनपा अशा मालमत्तांचे हस्तांतरण करत नाही. हस्तांतरण न केल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या मालमत्तांचे हस्तांतरणास ही सभा मंजुरी देत आहे. परंतु, या ठरावाच्या अनुषंगाने अशा मालमत्तांच्या करारनाम्याबाबत दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालय व नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडून मार्गदर्शन मागून हस्तांतरणाची कार्यवाही मनपाने करावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी पुरक घोषणा क्र. १४ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा विषय आहे. ते सभागृहात गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. १४ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०६/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - अंध व अपंगांसाठी जागा देण्याच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शा.नि. क्रमांक मि.भा.पा. २००४/१४४८/प्र.क्र.१९८/०४/नवि-२८ नियमावलीतील नमूद केलेल्या अटी/शर्तींच्या अधीन राहून जोडलेल्या नियमावलीतील अ, ब, क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(अ) अन्वये मान्यता देण्यात आलेल्या नियमावलीचे पालन करण्यांबाबत.

(सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

(नगरसचिव ह्यांनी पुरक घोषणा क्र. १५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा ह्यांनी प्रकरण क्र. १५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा ह्यांनी जो प्रस्ताव मांडला. तर कृपया प्रशासनाला त्याच्यावर खुलासा करायला सांगा.

**मा. महापौर :-**

''ज'' मध्ये आलेला प्रस्ताव समसमान कर आकारणीबद्दल प्रशासनाने या संदर्भात थोडासा खुलासा करावा.

**आसिफ शेख :-**

२००६ पर्यंत टॅक्स भरु नये.......

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाने यापुर्वी जो निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाच्या अंमलबजावणीचे काम प्रशासनाने सुरु केलेले आहे आणि आजच्याच म्हणजे नवशक्ती आणि मुंबई दैनिक संध्या या वर्तमानपत्रामध्येसुद्धा अशा प्रकारे आपण नागरिकांच्या माहितीसाठी जाहिर नोटीस पब्लिश केलेली आहे आणि त्याच्यामध्ये एक महिन्याची

मुदत दिलेली आहे. तर एक महिन्यामध्ये जेवढे अर्ज आपल्याला प्राप्त होतील त्या बाबतीमध्ये आपण विचार विनिमय करुन समान कर आकारणीच्या बाबतीमध्ये निर्णय घेण्यांत येईल.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपके परवानगी से बोलना चाहती हूँ, यह जो एक महिने का समय दिया है वह बहुत कम समय दिया है। वह समय को बढाइए। एक महिनेका समय बहुत कम है। एकदम ही कम है। कम से कम छह महिने का समय आप दिजीए।

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण आत्ता एक महिन्याचा पिरिएड देणार. पण त्याच्या आधीचे प्रकरण प्रलंबित आहे. म्हणजे अगोदर आपण दिलेले आहे, महापालिकेने एक समान कर देण्यासाठी, तर त्यांचे आपण कधी करणार?

**मा. आयुक्त :-**

आपण ते सगळं एकत्र करणार आहोत.

**शशिकांत भोईर :-**

कार्यकाळ वाढवावा.

**सुधा गोयंका :-**

तरी पण आपण कार्यकाल वाढवावा. त्यांना सहा महिन्याचा कार्यकाल द्या.

**एस्. ए. खान :-**

अजुनपर्यंत बऱ्याच केसेस पेंन्डींग आहेत ना?

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना तुम्ही अवधी द्या ना.

**शशिकांत भोईर :-**

बऱ्याच केसेस पेंन्डींग असल्या कारणाने त्यांचा कार्यकाळ वाढवावा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, आपण आत्ता जो निर्णय घेतलेला आहे ना, समसमान कर आकारणीचे......

**शशिकांत भोईर :-**

आपण एक महिन्याचे दिले आहे आणि आपण उद्याला बोलणार की, आम्ही नोटीस दिली आहे.

**सुधा गोयंका :-**

आणि तुम्ही एक महिन्यामध्ये आले नाही आणि त्यांचे काम पेंन्डींग दाखवाल.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आत्ता लोक घराबाहेर गेले आहेत. गावाला गेले आहेत. तर हा कार्यकाळ दोन महिन्याचा वाढवावा.

**शशिकांत भोईर :-**

कार्यकाळ सहा महिन्याचा करावा. सुचनावारी सहा महिने करावा.

**सुधा गोयंका :-**

सहा महिने करावा.

**शशिकांत भोईर :-**

सहा महिने करावा. एक महिन्याची सुचना देऊ नये.

**सुधा गोयंका :-**

साहेब, जागेवर अधिकारी भेटत नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, तीन महिने करावा.

**शशिकांत भोईर :-**

सहा महिन्याचा करावा. माझी सभागृहाला विनंती आहे की, सहा महिन्याचा कार्यकाळ करावा.

**मिलन पाटील :-**

तीन महिने करावे.

**सुधा गोयंका :-**

कधी प्रभाग अधिकारी भेटत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, जुन्या इमारतीमध्ये जे लोक आहेत तर समसमान कर आकारणी करण्याचा आपण निर्णय घेतला आहे. तर त्यांना कोणत्या वर्षापासून आपण समसमान आकारणी करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

जो आहे त्यापासून.

**आसिफ शेख :-**

चालू, ते म्हणतात की, मागच्या वर्षाचे घेऊ नका म्हणून.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ज्या मालमत्ता धारकांना २००५......

**आसिफ शेख :-**

मागची थकबाकी घ्यायची का नाही घ्यायची? त्याचा आपण खुलासा करत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ज्या मालमत्ता धारकाने सन २००५-०६ पर्यंत जो मालमत्ता थकीत रक्कम भरली त्यांनाच इफेक्ट मिळेल.

**आसिफ शेख :-**

हो, मग त्याचा खुलासा पाहिजे ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

आणि ज्यांनी अगोदर अर्ज केले त्यांचे काय? २००४ ला अर्ज केले आहेत, २००५ लाही अर्ज केले आहे व आत्तापर्यंत २००४, ०५, ०६ पर्यंत टॅक्स भरलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांना इफेक्ट मिळणार.

**एस्. ए. खान :-**

पानपट्टे साहेब, ह्याच्यामुळे लोक पैसे भरत नाही. म्हणजे ज्यांचे प्रॉब्लेम आहेत. अजुनपर्यंत दोन दोन वर्षापासून पेंन्डींग आहेत, ते पैसे भरत नाही. ते म्हणतात की, आमचे अगोदर क्लिअर करा.

**आसिफ शेख :-**

मग नव्याने अर्ज करायचे का?

**मोहन पाटील :-**

पानपट्टे साहेब, अशा पद्धतीने केसेस केल्याने, माझ्या माहितीप्रमाणे ९० टक्के लोकांनी पैसे भरले व त्यांना रिफन्ड करणार की, नाही त्याचा खुलासा करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

रिफन्ड नाही करणार.

**मोहन पाटील :-**

रिफन्ड नाही करणार ना. त्यांनी पैसे भरले आहे.

**सुधा गोयंका :-**

नाही करत तर काही तरी करा. पुढे ते लेव्हल करा.

**आसिफ शेख :-**

थकबाकी आपल्याला भरायचीच आहे. थकबाकी त्यांच्याकडून घ्यायची आहे आणि नवीन वर्षापासून, आर्थिक वर्षापासून त्यांच्याकडून समसमान आकारणी करणार आहोत.

**सुधा गोयंका :-**

साहेब, रिफन्ड करु नका, पण कार्यवाही करा.

**आसिफ शेख :-**

आणि ज्यांनी अर्ज केले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, पानपट्टे साहेब हे असे सांगतात. बरोबर आहे आणि ज्या लोकांनी आमच्या ह्या प्रकरणाचा निकाल लागेल म्हणून दोन-दोन, तीन-तीन वर्षापासून वाट बघत आहेत, त्यांना आपण बेनिफीट देणार का नवीन कमी आकारणीने आकारणी करुन? म्हणजे ज्यांनी भरला त्यांच्यावर अन्याय आणि ज्याने भरला नाही त्यांना तुम्ही सवलत देणार? असा अन्याय होऊ द्यायचा नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

चालू आर्थिक वर्षापासून असलेले........

**प्रभात पाटील :-**

ज्यांची प्रकरणे पेंन्डींग आहेत त्यांना २००६ पर्यंतचा पुर्ण टॅक्स लावलेल्या कराने करुन घेण्यांत यावा आणि २००६ नंतरच्या टॅक्सला तुम्ही नविन आकारणी करा. ह्या बाबतीमध्ये कोणावरही अन्याय होता कामा नये.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपले प्रभाग ३, ४, आहे व १ ते ४ असे प्रभाग आहेत. त्याच्यामध्ये हस्तांतरणाची किती प्रकरणे प्रलंबित आहेत त्याचा खुलासा करावा. कारण भरपूर लोक वारंवार आपल्या कार्यालयामध्ये चकरा मारत असतात.

**मा. आयुक्त :-**

हस्तांतरणाची जी काही प्रकरणे वगैरे असतील तर मध्यंतरी आपला मार्च अखेर होता आणि मार्च अखेरच्या १२, १३ तारखेपर्यंत प्रोग्राम पुढे ढकललेला होता आणि ह्या संबंध महिन्यामध्ये आपण वसुलीच्या फार पाठी लागलेलो होतो. संपूर्ण कर्मचारी वसुलीसाठी लागलेले होते आणि त्यामुळे सन्मा. नगरसेवक जेव्हा जेव्हा माझ्याकडे आले तेव्हा तेव्हा मी त्यांना सांगितले की, आपण एप्रिल महिन्याच्या साधारणतः दुसऱ्या आठवड्यापासून, तिसऱ्या आठवड्यापासून ह्या प्रकारची कामे आपण करणार आहोत. प्रपोझ करणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग समिती क्र. ३ मध्ये माझ्या मते साडे तीन वर्षा अगोदरची हस्तांतरणाची प्रकरणे अजुनही प्रलंबित आहेत.

**मा. आयुक्त :-**

प्रभाग समितीकडे अशा प्रकारचे अधिकार देण्याबाबत सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्याच्यानंतर आपण प्रभाग समित्यांना ते अधिकार दिले.

**सुधा गोयंका :-**

वर्ष अगोदर ॲप्लीकेशन दिलेले आहे, त्यांचे काय? आत्ता वाढीव केलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ह्यांनी मांडलेल्या सुचनांसह तसेच सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी मांडलेल्या सुचनांसह ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १५ :-**

सन्मा. सदस्य श्री. शशीकांत आर. शाह यांचे दिनांक ०७/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतीमधील विविध दराने झालेली कर आकारणी समान दराने करणे बाबत.

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत काही इमारतीमधील सदनिका / दुकाने यांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झालेली आहे. वास्तविक एकाच इमारतीमध्ये सर्व सदनिका / दुकाने / गाळे यांना एकाच वाजवी भाडे मुल्य दराने झालेली आकारणी होणे क्रमप्राप्त आहे. त्याप्रमाणे कर आकारणी झालेली नाही याकरीता कर आकारणीमध्ये सुसूत्रता येण्यासाठी ज्या इमारतीमधील सदनिकांना / दुकाने / गाळे प्रथम कर आकारणी ज्या वाजवी भाडेमुल्य दराने झालेली आहे त्या वाजवी भाडेमुल्य दराने त्याच इमारतीमधील इतर सदनिकांना कराची आकारणी व्हावी या बाबतची मागणी नागरीकांकडून सतत होत आहेत. तसेच अशा सदनिका / दुकाने / गाळे यांना सन २००५-२००६ वर्षापर्यंत जादा दराने कर आकारणीची बिले नगरपपालिकेकडून देण्यात आलेली आहे या करीता असा मालमत्ता धारकांकडून सन २००५-०६ पर्यंतचे कर वसूल करण्यांत येऊ नये व ज्या इमारतीमधील मालमत्तांना जादा दराने कर आकरणी झालेली आहे अशा मालमत्तांना प्रथम झालेल्या वाजवी भाडेमुल्य दराने कराची आकारणी होण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत शहा.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १६ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर ह्यांनी मांडलेला प्रश्न आहे आणि ते गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. १६ :-**

सन्मा. सदस्य श्री. गजानन लक्ष्मण भोईर यांचे दिनांक ३०/०१/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०७/२००५ रोजीचा ठराव क्र. ९४)

(सन्मा. सदस्य श्री. गजानन भोईर हे गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा ह्यांनी प्रकरण क्र. १७ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला आमचेही अनुमोदन आहे. पण या अगोदर आम्ही भाईंदर पुर्वेचा ना-फेरीवाला क्षेत्रामध्येही फेरीवाल्यांना उचलायला सांगितले होते. तरीही अजुनपर्यंत कार्यवाही झालेली नाही. त्यांना मजुर वर्ग वाढवून पाहिजे होता तो वाढवून पण दिला. तरी आपल्या प्रशासनातर्फे काही कार्यवाही होत नाही. एक दिवस होते तर दुसऱ्या दिवशी होतच नाही. ताबडतोब त्याच्यावर कार्यवाही करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कालच स्थायी समितीकडे हा विषय झालेला आहे आणि खतगांवकर साहेबांनीसुद्धा हे मान्य केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जैन मंदिर हे माझ्या प्रभागामध्ये येतो. तिथे भाविकांना फार त्रास होतो. तरी आपण अतिक्रमण विभागाला निर्देश द्या. आम्ही किती वेळा तक्रार करुनही काही होत नाही.

**एस्. ए. खान :-**

महापोर महोदया, मला एवढेच सांगा, ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाले बसतात त्याच्यासाठी आम्ही दररोज तक्रार करायची का?

**आसिफ शेख :-**

नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**हंसूकुमार पांडे :-**

ना फेरीवाला बोर्ड के निचेही फेरीवाला बैठता है।

**प्रभात पाटील :-**

हा एका विभागाचा विषय मांडला. त्यांनी त्यांच्या पत्रातून एका विभागाचा विषय मांडला. हा प्रत्येक विभागाचा विषय आहे. तो एक होऊ शकत नाही ना? त्यांनी त्यांच्या विभागाचा मांडला. येथे बोलणारे दहा सदस्य आहेत. कालच हा विषय स्थायी समितीमध्ये झाला. सगळ्या विभागांची ही समस्या आहे. ह्यावर एक निर्णय व्हायला हवा. केवळ त्यांच्या निर्णयावर राहून आपल्याला एका विभागाचे करता येणार नाही.

**शशिकांत शहा :-**

माझ्या विभागाचेच मी मांडणार ना.

**प्रभात पाटील :-**

आपण मांडले ते बरोबर आहे. पण त्यांना माझी विनंती आहे.

**शशिकांत शहा :-**

पण मला बोलू द्या ना.

**एस्. ए. खान :-**

आपण सांगा, आम्ही दररोज करायची तर आम्ही दररोज तक्रार करायला तयार आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य शशिकांतजी शहा ह्यांनी जो विषय मांडला आहे, त्या विषयाला आमचे अनुमोदन आहे आणि ही कारवाई संपूर्ण मिरा भाईंदर परिसरात झाली पाहिजे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, शिवपुजा येथे ना फेरीवाले बसत आहेत आणि प्रभाग क्र. १४ मध्ये ना फेरीवाला क्षेत्र असतांनासुद्धा फेरीवाले बसत आहेत.

**शशिकांत शहा :-**

मा. महापौर मॅडम, इसके लिए आपके कमिशनरने चार गार्ड रखे थे। हसने की बात यह है की, वह गार्ड वह काम नही करते हूए वहाँ पर हम पुछने जाते है तो कहते है की, हम इसका संकलन करने के लिए बैठे है। इसके लिये महापालिका का पैसाही दुर्देव होता है। दुसरी बात बोलता हँ, मुझे यह परसो लेटर मिला वह मै पढता हूँ, आप सुनो की, कितनी दुर्देवी बात है। (बावन जिनालय मंदिर, देवचंद परिसरातील घोषित ना फेरीवाले कार्यवाहीसंबंधी मा. शशिकांत शहा ह्यांचेकडील दि. ०८/०४/२००६ च्या पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.) कम से कम मैने एक साल से उपर रोज पत्रव्यवहार परिसर के पाच हजार लोगो को साईन मारके पत्र दिया हुआ है। लेकिन अभी तक आज तक कोई भी कार्यवाही नही हुई है। मुझे खेद है, यह बाब बरोबर नही है। उसके बाद मे भी हम लोगो ने दि. ०७/०४/२००६ को दिया है की, इसकी कार्यवाही ४८ घंटे मे नही हुआ तो हम लोग मोर्चा लायेंगे। मगर आज तक कोई पत्र आता नही है। यह खेद की बाब है। उसके लिए जरुरी फैसला लेना चाहिए। ऐसी मेरी विनंती, आप महापौर साहेबा और कमिशनर साहब को है।

**एस्. ए. खान :-**

ना फेरीवाला क्षेत्रामध्ये जे फेरीवाले बसतात त्यांच्याकडून पैसे वसुल केले जातात म्हणून ते सांगतात की, आम्ही पैसे देत आहोत तर का आम्हांला उचलतात?

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मिरा रोड मे जैन मंदिर के यहाँ भी यही हालत है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण ह्याच्यावर निवेदन करा, रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण सर्वांनी जरा शांत रहा. मिरा भाईंदर पुर्ण शहरामध्ये ना फेरीवाला क्षेत्र असूनही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसतात, अतिक्रमण वाढते. तर हे पुर्णपणे अतिक्रमण हटवले गेले पाहिजे. ह्याच्यासाठी सन्मा. सदस्य एस्. ए. खान साहेबांनी मांडलेला प्रश्न जो आहे तो पुढील मा. महासभेमध्ये घेऊन त्याच्यावर फेरीवाला क्षेत्र आणि ना फेरीवाला क्षेत्र असे झोन करुन पुढच्या वेळेस हा विषय.......

**हंसूकुमार पांडे :-**

मॅडम, झोन हो गया है। झोन मे बोर्ड लगा है और बोर्ड के निचे फेरीवाले बैठते है।

**चंद्रकांत मोदी :-**

झोन हो गया है। ठराव पास हो गया है, लेकिन काम नही हुआ है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, झोन घोषित आहे.

**सुधा गोयंका :-**

पण कारवाई होत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाले बसतात व त्यांच्यावर कारवाई होत नाही तर त्यांच्या कारवाई झाली पाहिजे. अशा पद्धतीची नोंद करुन घेण्याऐवजी कारवाई करावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापोर महोदया, जहा बोर्ड लगाए है उसके ही निचे बैठते है।

**मा. महापौर :-**

ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाले बसत असतील तिथे कारवाई नक्कीच व्हायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

अंमलबजावणी झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

तसेच, संबंधित खात्याला ना फेरीवाला क्षेत्रातील अतिक्रमण हटविण्याचे आदेश देत आहे. त्वरीत कारवाई केली जावी.

**एस्. ए. खान :-**

ना फेरीवाला क्षेत्रामध्ये जे फेरीवाले बसतात, त्यांच्याकडून बाजार फी घेतली जाऊ नये. कारण ते बोलतात की, आमच्याकडून पैसे घेतात.

**प्रकरण क्र. १७ :-**

सन्मा. सदस्य श्री. शशीकांत आर. शाह यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. – ''जैन मंदिर बावन जिनालय'' भाईंदर (प.) सभोवती ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित होऊनही त्या ठिकाणी फेरीवाल्यांना बसण्यास सहाय्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत.

**ठराव क्र. १५ :-**

भाईंदर पश्चिम भागात डॉ. आंबेडकर रोड लगत जैन मंदिर आहे. सदर जैन मंदिरात दर्शन घेण्यासाठी नियमित शहरातील व शहरा बाहेरील भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. बऱ्याच वेळा मोठ मोठ्या बसेस मधून भाविक येत असतात. जैन मंदिरात सतत मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने जैन मदिर परिसरात सभोवती फेरीवाल्यांना बसण्यांस मनाई केली आहे. त्या दृष्टीने सदरहू परिसर ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणून घोषित केला आहे. तसेच बाजार लिलावाच्या अटी शर्तीमध्ये देखील त्या ठिकाणी फेरीवालायाना बसण्यास प्रतिबंध केला आहे.

मा. महासभा, मा. स्थायी समिती यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही अंमलबजावणी संबंधित विभागाची बसते. असे असतांनाही जैन मंदिर सभोवती बिनधास्तपणे फेरीवाले बसतात. त्यामुळे देवळात येणाऱ्या भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. अशा प्रकारे फेरीवाल्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरीक, देवस्थान लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी लेखी स्वरुपात करुनदेखील त्याकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले जात आहे.

वास्तविकतः महापालिकेने चारही विभागासाठी स्वतंत्र अतिक्रमण पथक, क्षेत्रिय अधिकारी व उपायुक्त यांची नेमणुक केलेली आहे. असे असतांना फेरीवाल्यांना हटविण्याच्या कामी कोणताही अधिकारी लक्ष देत नाही. अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरीकांना त्रास होत आहे. महापालिकेने आदेश

देऊनही कार्यवाही न करण्याची व फेरीवाल्यांना त्या ठिकाणी बसण्यास सहाय्य, प्रोत्साहन देणाऱ्या अशा अधिकाऱ्यां विरुद्ध कडक कार्यवाही करण्यांत यावी असा मी ठराव मांडतो.

**सुचक :- श्री. शशिकांत शहा.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १८ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, सन्मा. सदस्या श्रीम. शुभांगी सिताराम नाईक यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. सन्मा. सदस्या ह्या सभेला गैरहजर आहेत.

**प्रकरण क्र. १८ :-**

सन्मा. सदस्य श्री. शुभांगी सिताराम नाईक यांचे दिनांक १२/०४/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हॉस्पीटल होणेबाबत.

(सन्मा. सदस्या श्रीम. शुभांगी सिताराम नाईक ह्या गैरहजर असल्याने मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरची पुरक घोषणा फेटाळण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून आपणा सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०६.१५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**